# जीवनगौरव




ज्येष्ठ स्वा. सेनानी

मा. पोशट्टीदादा उनग्रतवार गौरविका



माजी पंतप्रधान
मा.व्ही.पी. सिंग
यांच्या समवेत
मा. पोशट्टीदादा
उनग्रतवार व बाजूला
प्रा. उत्तमकुमार कांबळे



माजी गृहमंत्री
मा. शंकररावजी
चव्हाण यांचे स्वागत
करताना
मा. पोशट्टीदादा



काँग्रेसच्या
व्यासपीठावर
मा. विलासराव देशमुख,
मा. सुशिलकुमारजी
शिंदे व चित्रपट
अभिनेते अमिताभजी
बच्चन यांच्या समवेत
मा. पोशट्टीदादा


# जीवनगौरव



ज्येष्ठ स्वा. सेनानी
मा. पोशट्टीदादा उनग्रतवार गौरविका

'जीवनगौरव'
**मा. पोशट्टीदादा उनग्रतवार गौरविका**
*
**ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी मा. पोशट्टीदादा उनग्रतवार गौरविका समिती :**

**संयोजक :**
प्राचार्य डॉ. अशोक वाकोडकर
*
**सदस्य :**
प्रा. सर्जेराव रणखांब
श्री.शेख एम.एच. (माजी प्रबंधक)
प्रा. उत्तमकुमार कांबळे
श्री. गंगाधरराव जोशी
*
**प्रकाशक :**
प्राचार्य, डॉ. अशोक वाकोडकर
देगलूर महाविद्यालय, देगलूर.
*
**संपादन साहाय्य :**
प्रा. आर. एम. दुडूकनाळे
*
**प्रकाशन :**
४ जानेवारी २००४
*
**छायाचित्रे :**
रूपाली फोटो, देगलूर.
*
मुद्रक :
**मुद्रा ऑफसेट,** नांदेड. ✆ : (०२४६२) २४२१०९


दिव्यत्वाची जेथ प्रचिती ।
तेथ कर माझे जुळती ॥



मा. पोशट्टीदादा,
पत्नी सौ. सरस्वतीबाई यांच्या समवेत



मा. आ. सुभाषराव साबणे यांच्याशी जिव्हाळ्याच्या गोष्टी करताना - दादा




मा. अमिताभ गुप्ता (पोलीस अधीक्षक, नांदेड) यांचा सत्कार करताना मा. पोशट्टीदादा




आपल्या कुटुंबासमवेत दादा हवन करताना.



दादांच्या
अमृतमहोत्सवी
समारंभात त्यांना
शुभेच्छा देतांना
मान्यवर

मा.आ. गंगारामजी
ठक्करवाड समवेत-दादा





मा. सावकशाजी
जिल्ला यांना भेटताना-
दादा

# संपादकीय

मराठवाडा मुक्ति संग्रामातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी व अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. पोशट्टीदादा उनग्रतवार यांच्या नव्वदीनिमित्त 'जीवनगौरव' ही गौरविका प्रकाशित करताना आनंद होतो आहे.

कर्तृत्ववान माणसांविषयी आदर व्यक्त करणं ही आमची भारतीय संस्कृतीच आहे. परंपरेनं निर्माण केलेला वारसा नव्या पिढीपर्यंत पोहचवणं हे आजच्या व्यवस्थेत महत्त्वाचं कार्य झालेलं आहे. दादांच्या जीवनावरील ही गौरविका याच हेतूने प्रकाशित करीत आहोत.

दादांच्या सहवासातील नातेवाईक, अनुयायी व त्यांच्या चाहत्यांनी आपल्या 'स्मृती' यात शब्दबद्ध केल्या आहेत. त्यात बराचसा पुनरावृत्तीचा भाग आहे याची जाणीव संपादक मंडळास आहे.

दादांचे प्रतिनिधीक व्यक्तिमत्त्व यातून साकारले आहे. दादांची सर्व माहिती यातून आली नसली तरी कुठेही चुकीची माहिती येणार नाही याची दक्षता घेण्याचा प्रयत्न आम्ही प्रामाणिकपणे केला आहे.

या गौरविकेतील सर्व मान्यवर लेखकांचे मन:पूर्वक आभार मानून दादांच्या पुढील आयुष्यासाठी आम्ही सुयश चिंतितो.



**प्राचार्य डॉ. अशोक वाकोडकर**
संयोजक
गौरविका समिती

## अनुक्रमणिका


**शुभेच्छा**
- मा. सुशीलकुमार शिंदे (मुख्य मंत्री, महाराष्ट्र राज्य) ५

**शुभेच्छा**
- मा. अशोक चव्हाण (मंत्री परिवहन, बंदरे, सांस्कृतिक कार्य राजशिष्टाचार, महाराष्ट्र राज्य) ६

**शुभेच्छा**
- मा. अमरिश पटेल (मंत्री शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, महाराष्ट्र राज्य) ७

**शुभेच्छा**
- डॉ. गोपाळराव पाटील (Ex Member of Parliament) ८

**शुभेच्छा**
- कुसुमावती दे. रसाळ ९

**शुभेच्छा**
- चंद्रशेखरमहाराज देगलूरकर, १०

**पोशट्टीदादा उनग्रतवार : कर्मवीर आर्य**
- डॉ. नागनाथ कोत्तापल्ले ११

**पोशट्टीदादा : एक सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्व**
- कुसुमावती दे. रसाळ १४

**असे घडले दादा ...**
- बी.जी. गुरूडे (गुरूजी) १६

**आमचे काका**
- डॉ. भूषण जोरगुलवार १८

**ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी मा. पोशट्टीदादा उनग्रतवार**
- शं.ल. अंजनीकर, नांदेड २०

**ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी व जाणते समाजसेवक पोशट्टीदादा उनग्रतवार**
- प्रा. हरिश्चंद्र मानकरे २३

**मी पाहिलेले दादा**
- शेख एम.एच. २५

**देगलूरचे सेवाव्रती : पोशट्टी दादा**
- प्रा. शशिकांत सेलूकर २७

**असे ज्यांचा मार्ग वेगळा.....**
- प्रा. गणेश मोहरीर ३०

**सर्वांचे दादा – पोशट्टीदादा**
- डॉ. ब्रम्हमुनि वानप्रस्थी (डॉ.सु.ब.काले, बीड) ३२

**गांधी विचारांचे पाईक म्हणजेच दादा**
- श्री बळवंतराव चव्हाण ३४

**निराधारांचे समर्थ आधार – काका**
- प्रा. डॉ. एन.टी. भागवत ३५

**देगलूर महाविद्यालयाचे बिंदूत सिंधू पोशट्टीदादा**
- प्रा. बी.एन. जाधव ३६

**कर्मयोगी ' दादा '** - श्री.बी.एस. भालेकर ३७

**स्वातंत्र्य सैनिक पोशट्टीदादा स्वातंत्र्या नंतर ही सैनिकच !**
- एस.जी. चांडोळकर ३९

**आमचे काका श्री पोशट्टीदादा** - प्रा. ई.आर. मठवाले ४१

**सन्माननीय पोशट्टी दादा उनग्रतवार नांदेड जिल्ह्यातील एक मातब्बर व्यक्तिमत्त्व** - वि.रा.कोल्हे गुरूजी ४४

**प्रबोधनातील बहुरंगी व्यक्तिमत्त्व**
- एन.एम. देवकत्ते (मु.अ.) ४६

**शिक्षण क्षेत्रातील कर्मयोगी पोशट्टीदादा**
- प्रा.ता.भ. पवार ४७

**दादांविषयी ...** - प्रा. सि.डी. चिद्रावार ४८

**एक निस्पृह निगर्वी – सेनानी** - डॉ. हसंराज बाहेती ४९

**एक सुविद्य व्यक्तिमत्त्व**
- प्रा. डॉ. शरदचंद्र एकनाथमहाराज ५०

**एक सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व**
- श्री बी. के. गुजे (गुरुजी) ५१

**माझ्या जीवनातील काकांचे स्थान**
- सौ. एस.पी. उनग्रतवार ५१

**'पोशट्टीदादा एक असामान्य व्यक्मितत्त्व'**
- प्रा. किशन पाटील ५२

**मा. पोशट्टी दादा–एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व...**
- प्रा. येरगीकर आर. के ५३

**ध्येयवादाने भारावलेले अजोड व्यक्तिमत्त्व स्वा.सै.पोशट्टीदादा उनग्रतवार**
- प्रा.बा.रा. कणत्तुरवार ५६

**शुभेच्छा** - श्री. व्ही. जी. चिंतावार ५७

**पोशट्टी दादा** - गंगाधर पांचारे भायगावकर ५८

**थोर समाज सेवक, श्री पोशट्टी दादा**
शिवाजीराव बोधगीरे ६०

**दादा–एक आदर्श व्यक्तीमत्व**
- श्रीमती अनुसयाबाई शंकरराव कळसकर ६१

**शुभेच्छा** - सौ. कमलबाई प्रकाशराव पाटील बेम्बोकर ६२



सत्यमेव जयते

# मुख्य मंत्री

महाराष्ट्र राज्य

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दूरध्वनी : २२०२५१५१, २२०२५२२२, फॅक्स : २२०२९२१४

दिनांक : १५ डिसेंबर २००३

## शुभेच्छा

देगलूर येथील स्वातंत्र्य सैनिक पोशट्टीदादा उनग्रतवार यांना ९० वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल त्यांचा गौरव समारंभ आयोजित करण्यात आल्याचे समजून आनंद वाटला.

श्री. उनग्रतवार यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामात आणि गोवा मुक्ती आंदोलनात हिरीरीने सहभाग घेतला होता. स्वातंत्र्यानंतर त्यांनी स्वतःला शैक्षणिक कार्यात वाहून घेतले होते. सहकार, शिक्षण आणि दारूबंदी या क्षेत्रातही त्यांनी चांगले काम केले आहे. सामाजिक क्षेत्रात निरलसपणे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान होत आहे ही चांगली घटना आहे.

गौरव समारंभास माझ्या हार्दिक शुभेच्छा देऊन पोशट्टीदादा उनग्रतवार यांना मी दीर्घायुरारोग्य चिंतितो.

( सुशीलकुमार शिंदे )



मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
परिवहन, बंदरे, सांस्कृतिक कार्य
राजशिष्टाचार
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक :
२/१२/२००३

देगलूरचे वयोवृध्द स्वातंत्र्य सैनिक तसेच देगलूर कॉलेजचे अध्यक्ष श्री. पोशट्टीदादा उनग्रतवार यांच्या वयाला ९० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून त्यांच्या कार्याचा गौरव करणा-या ग्रंथाचे प्रकाशन होत आहे, हे वाचून आनंद झाला.

हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या वेळी स्वयंसेवकांचे पथक निर्माण करुन या संग्रामात तसेच देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात हिरीरीने कार्य करुन त्यात सक्रीय सहभाग देणा-या श्री.उनग्रतवारांच्या कार्याची माहिती या गौरव ग्रंथाव्दारे होत आहे, हे एक सामाजिक बांधिलकीचे कार्य आहे, असे मी समजतो.

स्वातंत्र्य सैनिक श्री.उनग्रतवार यांना दीर्घायुरारोग्य लाभो, ही सदिच्छा.

( अशोक चव्हाण )

मंत्री
शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक :

२४.१०.२००३

## शुभ संदेश

देगलूरचे वयोवृध्द स्वातंत्र्य सैनिक श्री. पोशट्टीदादा उनग्रतवार यांच्या वयास ९० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या कार्याचा गुणगौरव म्हणून गौरव ग्रंथ काढण्यात येणार असल्याचे वाचून आनंद झाला.

ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक श्री. पोशट्टीदादा उनग्रतवार यांचे कार्य आजच्या पिढीसाठी निश्चितच मार्गदर्शक करणारे आहे.

पोशट्टीदादा उनग्रतवार यांच्या वाढदिवसानिमित्त प्रकाशित करण्यात येणा-या "पोशट्टीदादा गौरव " या ग्रंथास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

( अमरिश पटेल )

Dr. Gopalrao Patil
Ex Member of Parliament
106, South Avenue, NEW DELHI-110 001. • Tel.: 011 3793704
2/23, Tilak Nagar, LATUR-413 512 • Tel.: 02382-42945
E-mail : patilgv@.parlis.nic.in • Fax : (011) 3793704

'पोशट्टीदादा उनग्रतवार'

देगलूर परिसरात ज्यांच्या कर्तृत्वाच्या पाऊलखुणा जागोजागी चमकतात असे व्यक्तिमत्त्व म्हणजे पोशट्टीदादा ! हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. अशा कर्तृत्वान पुरुषाच्या पाऊलखुणा शोधत समाज वाटचाल करीत असतो.

ते एक कर्मठ आर्यसमाजी, देशाच्या स्वातंत्र्याकरिता सर्वस्वाचा त्याग करुन 'वंदे मारतम्' म्हणत राष्ट्रध्व फडकावून जेलमध्ये जाणारे खरे देशभक्त, हैद्राबाद मुक्तिसंग्रामात अग्रेसर राहून स्वामी रामानंद तीर्थांना आधार देणारे, गोवा मुक्तिसंग्रामात स्वयंसेवक पथक तयार करुन प्रत्यक्ष उडी घेणारे 'स्वातंत्र्यसेनानी' आहेत. असे हे दादांचे नेतृत्व गरिबीच्या आगीफुफाट्यातून तावूनसुलाखून निघून समृद्ध अशी अनुभवाची शिदोरी घेऊन नि:स्वार्थ त्यागी वृत्तीने स्वराज्याचे-राज्य करण्याच्या तळमळीने कृतीशील जीवन जगत आहे.

माणसाचे खरे शहाणपण व त्यांची योग्यता तो किती शिकला यावर अवलंबून नसून त्याने मिळवलेली माहिती, ज्ञान, कौशल्य व्यवहारात कशी वापरली यावर आहे. आपल्या सर्वांजवळ पाच ज्ञानेंद्रियाशिवाय एक 'सहावा सेन्स' आहे. तो म्हणजे 'कॉमनसेन्स'. हा एवढा विकसित तेवढा माणूस हुशार व चतुर असतो. असा माणूस पूर्वी 'केल्याने देशाटन पंडित मैत्री सभेत संचार' निर्माण होता होता. असं हे पोशट्टीदादांचं शहाणपण आहे. दादांनी ओळखले की, 'शिक्षण' हा सर्व मानवाचा, राष्ट्राच्या प्रगतीचा, विकासाचा पाया आहे, आत्मा आहे. त्यांनी संत गाडगेबाबा शिक्षण संस्था (साधना शाळा व इतर ४-५ शाळा) व आडत व्यापारी शिक्षण संस्था (देगलूर महाविद्यालय देगलूर) अशी शैक्षणिक गुणवत्ता जोपासणारी केंद्रे निर्माण केली.

दादांनी संसार नेटका केला. त्यांचा मुलगा डॉ. कर्मवीर एम.डी. आहे. नांदेड येथे हृदयरोग तज्ज्ञ असून त्याचे स्वत:चे हॉस्पीटल आहे. नित्य होमहवनातून आर्य समाजाचे, नैतिक मूल्यांचे शिक्षण त्यांनी आपल्या कुटुंबाला व मसजाला दिले. असे नेहमी प्रयत्नशील, हसतमुख, नव्वदव्यावर्षी सृजनशील, त्याचवेळी अपरिगृहशील असलेले, सर्वांना हवेहवेसे वाटणाऱ्या विनयशील द ादांविषयी आदरयुक्त प्रेम वाटते.

''तस्माद योग भवार्जुन'' या उक्तीप्रमाणे दादा एक योगी आहेत.

जीवेत् शरद: शतम् ही शुभेच्छा!

डॉ. गोपाळराव पाटील

संस्थापिका,
**दै. गोदातीर समाचार**
(स्थापना १९६२)

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार प्राप्त.

**कुसुमावती रसाळ**
'देविदास' भवन, शिवाजीनगर,
नांदेड-४३१ ६०२ (महाराष्ट्र)
दूरध्वनी - ०२४६२-२३४२११

Postal Address : KUSUMAVATI D. RASAL. Daily Godaateer Samachar, 'Devidas Bhavan', Shivajinagar, Nanded - 431 602

अध्यक्षा,
**सांस्कृतिक कला विकास केंद्र**
(स्थापना १९८६)

ट्रस्टी
**वनिता विकास मंडळ, नांदेड**
(स्थापना १९६८)

ट्रस्टी
**स्वामी विवेकानंद बालक मंदिर, नांदेड**
(स्थापना १९६९)

ट्रस्टी
**भानुमती वर्मा बालक मंदिर, नांदेड**
(स्थापना १९७२)

ट्रस्टी
**सम्यक आंतरजातीय व स्वजातीय विवाह मंडळ, नांदेड**
(स्थापना १९९५)

जा. क्र. :

दिनांक :

श्री पोशट्टी उनग्रतवार

आमच्या रसाळ कुटुंबियांना ओळखणारे- दैनिकाच्या सुरुवाती पासून दै. गोदातीरवर प्रेम करणारे- ~~दैनिकाच्या~~ गोदातीर समाचारच्या देगलूर तालुक्यात पाया पक्का करणारे- आमचे मित्र पोशट्टी दादा- यांच्या ४ जानेवारीला वयाचे ८९ एकूणनव्वद वर्षे पूर्ण होत आहेत- दिवसा मागून दिवस- महिने- वर्षे भरत आहेत. सर्व आयुष्यभर समाजकार्य करणारे- ~~करणार~~ कार्यकर्ते आता पडद्या आड गेले आहेत.

Kusumavati Rasal

।।श्री।।

*प्रेमळ, नि:स्वार्थी, त्यागी व उद्यमशील व्यक्तिमत्त्वाचे श्री. पोशट्टीजी उनग्रतवार यांच्या सद्गुण परिमलाचा आपण मधुकरवत संग्रह करीत आहात. त्यांचे व आमचे गेल्या तीन पिढ्यांपासून स्नेहाचे संबंध आहेत. देगलूर येथील आमचे पूर्वज संत गुंडामहाराज यांच्या परंपरेबद्दल त्यांच्या मनीमानसी असलेली श्रद्धा त्यांच्या बोलण्या-वागण्यातून दिसून येते. या गौरव समारंभाच्या निमित्ताने श्री. पोशट्टीजी उनग्रतवार यांना हार्दिक शुभेच्छा !*

*कळावे*

*आपला,*

***चंद्रशेखरमहाराज देगलूरकर,***

*श्री गुंडामहाराज संस्थान* **देगलूर** *व* **पंढरपूर**

# पोशट्टीदादा उनग्रतवार : कर्मवीर आर्य

– डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

देगलूर महाविद्यालयाने माझ्यावर फार मोठे संस्कार केले आहेत. किंबहुना आज मी जो काही उभा आहे, त्याचे संपूर्ण श्रेय या महाविद्यालयासच जाते हे सांगताना मला अतिशय आनंद होतो. ही भावना माझी एकटयाची नाही. माझ्यासारख्या हजारो विद्यार्थ्यांची ही भावना आहे.

मी दहावी पास झाल्यानंतर महाविद्यालयात जायचे की नाही हेच ठरत नव्हते. वडील प्राथमिक शिक्षक. तुटपुंजा पगार आणि घरात खाणारी दहाबारा तोंड. अशा अवस्थेत महाविद्यालयीन शिक्षण कसे परवडणार असा प्रश्न होता. तरीही वडिलांनी तू शिकायला जा. पुढचेपुढे पाहू असे म्हटले आणि मी नांदेडच्या यशवंत महाविद्यालयात नाव नोंदविले. ते वर्ष होते १९६५ चे. पुढे कुठून तरी कळले की मागच्याच वर्षी देगलूरला महाविद्यालय सुरू झाले आहे आणि ते चांगले आहे. तेव्हा नांदेड सोडून मी देगलूरला आलो आणि महाविद्यालयात प्रवेश घेतला. महाविद्यालयानेच यशवंत महाविद्यालयाकडून माझे शाळा सोडण्याचा दाखला मागवून घेतला आणि पुढची चार वर्षे मी देगलूर महाविद्यालयात काढली ते दिवस फार सुंदर होते एवढेच मी या ठिकाणी म्हणू शकेन.

प्रारंभी महाविद्यालय जुन्या इमारतीमध्ये होते. जवळपास एका जुनाट इमारतीत वसतिगृहही सुरू करण्यात आलेले होते. तेथे फक्त राहण्याची व्यवस्था होती. प्रत्येकाने धान्य, दाळी इ. गोष्टी आणायच्या आणि स्वयंपाक करून शिकायचे अशी व्यवस्था होती. माझ्यासारखे वीस बावीस विद्यार्थी तेथे रहात होते.

असे सुंदर महाविद्यालय आणि वसतिगृह उभे करणारी माणसं कोण होती याचा शोध घेण्याचे कारण नव्हते. विद्यार्थ्यांचा संबंध शिक्षकांशी आणि प्राचार्यांशी येतो. आमच्या सुदैवाने हे सगळेच चांगले होते. मग मॅनेजमेंटमधील लोकांची चौकशी करण्याचे कारणच काय? परंतु महाविद्यालयात काही तरी घडले मला वाटते छोटीशी मारामारी असेल किंवा एखाद्या मुलीच्या छेडखानीचा प्रकार असेल. नक्की काय ते आता आठवत नाही. परंतु काही तरी झाले आणि तेव्हाचे आमचे प्राचार्य गो.श्री. बनहट्टी यांनी साऱ्या मुलांना महाविद्यालयापुढील मैदानात बोलाविले. शंभरसव्वासे विद्यार्थी असतील. सगळे विद्यार्थी घाबरलेले होते. या सभेला श्री. पोशट्टीदादा उनग्रतवार यांना बोलाविलेले होते. करारी चेहरा. पांढरेशुभ्र धोतर आणि पांढराच शर्ट. काळसर जॅकेटही. एकूण जरब बसविणारे व्यक्तिमत्त्व. परंतु ते बोलायला उभे राहिले आणि सगळ्यांनाच असं वाटलं की, हे तर आपल्या घरातील वडिलधाऱ्या माणसांसारखंच बोलत आहेत. काहीशा रांगडया, ग्रामीण ढंगात ते बोलत होते. पण फार तळमळीनं बोलत होते. तुम्ही सगळे गोरगरिबा घरची मुलं आहात. अशा भानगडी करून तुमचं कल्याण होणार नाही. तुम्ही अभ्यास करा. मोठे व्हा. महाविद्यालयाला बट्टा लावू नका..... असं बरंच बोलत राहिले. त्यांच्या तळमळीचा प्रभाव प्रत्येक विद्यार्थ्यावर पडू लागला. पण त्यांनी आपल्या भाषणात एक फार महत्त्वाचं वाक्य उच्चारले. ते म्हणाले, आम्हाला आमच्या परिस्थितीमुळं शिकता आलं नाही. आमच्या पुढच्या पिढीच्या वाटयालाही आमच्यासारखंच जगणं यावं असं वाटत नाही. आमची मुलं, पुढंची पिढी खूप खूप शिकली पाहिजे. आणि त्यासाठी आम्ही मंडळींनी या गावात कॉलेज काढलं आहे.....

सभा संपली आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या हृदयावर पोशट्टीदादांची अक्षर कोरली गेली. पोशट्टीदादांचे व्यक्तिमत्त्व मनावर ठसून गेले ते कायमचे. तेव्हा जी प्रतिमा मनात निर्माण झाली, रुतून बसली, ती आज अडतीस वर्षानंतरही जसच्या तशीच आहे.

आज खूप संस्था निर्माण झाल्या आहेत. खूप मॅनेजमेंटचे लोकही पाहिले आहेत. परंतु पोशट्टीदादांसारखा माणूस मात्र पहावयास मिळत नाही... पोशट्टीदादांची आणि त्यांच्या सहकाऱ्यांची शैक्षणिक कार्य करताना कोणती प्रेरणा होती ? त्यांना एक पैशाचा लोभ नव्हता. उलट आपल्या भागातील गोरगरिबांची मुलं शिकावीत, सुजाण नागरिक व्हावीत, त्यांचे जीवन बदलून जावे, हीच त्यांची एकमेव प्रेरणा होती. महाराष्ट्राच्या

शैक्षणिक आणि सामाजिक जीवनात कर्मवीर भाऊराव पाटलांनी महाराष्ट्रभर शाळा आणि महाविद्यालये काढली. परंतु दुर्दैवाने मराठवाडयात मात्र रयत शिक्षण संस्थेच्या शाळा आणि महाविद्यालये नाहीत. (अपवाद फक्त बीड येथील कंकालेश्वर विद्यालयाचा. हे विद्यालय १९७० च्या आसपास निघाले असावे.) ही एक मराठवाडयाची फार मोठी उणीव आहे असे वाटते. परंतु ही उणीव भरून काढणारी, नवी शैक्षणिक संस्कृती मराठवाडयात निर्माण करणारी थोडी माणसं मराठवाडयात होऊन गेली हे मराठवाडयाचे भाग्यच म्हटले पाहिजे. स्वामी रामानंद तीर्थ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले कार्य तर अतुलनीयच आहे. पण त्या पाठोपाठ देवीसिंग चव्हाण (उमरगा), विनायकराव पाटील आणि दादासाहेब सावंत (मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ), कर्मवीर मामासाहेब जगदाळे (वाशी) आणि त्याच मालिकेतील अत्यंत महत्त्वाचे नाव म्हणजे आमचे पोशट्टीदादा उनग्रतवार हे होत. ही महनीय माणसं नसती तर कदाचित मराठवाडयाच्या वाटयाला अधिकच मागासलेपण आले असते. या माणसांच्या मागे ना राजकीय पाठबळ होते. ना आर्थिक पाठबळ होते. परंतु समाजाबद्दलची तीव्र तळमळ आणि उत्तुंग जिद्द हेच पोशट्टीदादांचे बळ होते आणि आहे.

फारसे न शिकलेले दादा इतके उत्तम काम का व कसे करू शकले हा प्रश्न आज सभोवताली पाहिले की निर्माण होतो. आज खूप मोठमोठया संस्था निर्माण होत आहेत. मोठमोठया इमारती बांधल्या जात आहेत. मोठमोठया इमारती बांधल्या जात आहेत. या संस्थांचे चालक उच्चविद्याविभूषित आहेत. राजकारणात त्यांचे बऱ्यापैकी वजन आहे. आर्थिक परिस्थितीही उत्तम आहे. परंतु या पैकी पुष्कळ संस्थाचालकांच्या संस्थांमध्ये शिक्षकांना कमी पगार मिळतो आहे. (सन्माननीय अपवाद आहेत.) नेमणुका करताना वशिलेबाजी, जातीयवाद आणि डोनेशनच्या नावाने स्वत:च पैसा खाणे असले प्रकार चालू आहेत. महाराष्ट्राच्या शैक्षणिक जीवनाला काळिमा फासणाऱ्या या गोष्टी आहेत व त्या निर्लज्जपणे चालू आहेत. पण पोशट्टीदादांच्या मनाला कधी जातीयवादाने स्पर्श केला नाही की कुणाचे चार पैसे आपण घ्यावे असे वाटले नाही. नातेगोते, वशिलेबाजी या सगळया गोष्टी त्यांच्यापासून फार फार दूर होत्या आणि आहेत. पोशट्टीदादा आणि त्यांचे सहकारी शिक्षणाच्या संदर्भातील सर्व निर्णय घेण्याचे अधिकार प्राचार्य आणि शिक्षकांना देत असत. प्राचार्यांच्या आणि शिक्षकांच्यामागे ते खंबीरपणे उभे रहात. त्यामुळेच देगलूर महाविद्यालय केवळ नांदेड जिल्हयातच नाही तर मराठवाडयातील एक समृध्द ज्ञानकेंद्र बनले ते पोशट्टीदादांसारख्या निस्पृह गुणवत्तेची कदर करणाऱ्या समंजस व्यक्तिमत्त्वामुळेच हे आवर्जून नोंदवावे लागते. स्वत: कमी शिकलेली माणसे केवढा पराक्रम करू शकतात याचे एक आदर्श उदाहरण म्हणजे पोशट्टीदादा उनग्रतवार होत !

पोशट्टीदादा इतके निस्पृह आणि तळमळीचे कार्यकर्ते कसे होऊ शकले हा खरा प्रश्न आहे. मला वाटते त्यांच्यावर आर्यसमाजाचे जे संस्कार झाले या संस्कारातच या प्रश्नाचे उत्तर दडलेले आहे. वयाच्या सोळाव्या वर्षी ते आर्य समाजामध्ये गेले. आणि आजतागायत आर्यसमाजाच्या संस्काराप्रमाणे कार्य करीत आहेत. आणखी एका गोष्टीचा निर्देश केला पाहिजे. ते स्वातंत्र्य चळवळीत होते. मराठवाडा मुक्ती आंदोलनामध्ये त्यांनी हिरिरीने भाग घेतला होता आणि दीड दोन वर्षाचा सश्रम कारावास भोगला होता. पुढे गोवा मुक्ती आंदोलनातही त्यांनी डोके फोडून घेतले होते. या सगळयाचा अर्थ असा की स्वातंत्र्य कशासाठी मिळवायचे, त्याचे एक स्पष्ट चित्र त्यांच्यासमोर होते. स्वातंत्र्य समतेसाठी, सामाजिक न्यायासाठी, बंधुतेसाठी आणि साऱ्यासाऱ्यांच्या कल्याणासाठी ...... हा कल्याणाचा मार्ग कोठून जातो ? तो तर म. जोतीराव फुले यांनी १८७३ सालीच सांगून ठेवला होता. ''विद्येविना गति गेली''.......हा मंत्र म. जोतिबा फुले यांनी बहुजनांसाठी दिला होता. स्वातंत्र्यानंतर समता, बंधुता आणि सामाजिक न्याय निर्माण करायचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही, हे ओळखणाऱ्यांपैकी पोशट्टीदादा होते. म्हणूनच चाळीस पंचेचाळीस वर्षापूर्वी त्यांनी शैक्षणिक जीवनात जे कार्य केले ते त्यामुळेच क्रांतिकारक ठरते.

सामाजिक समता निर्माण करण्याचा शिक्षण हा एक प्रभावी मार्ग आहेच, पण प्रत्यक्ष पिचणाऱ्या माणसांची त्यांच्या शोषकांच्या तावडीतून सोडवणूक करणे हा अधिक कष्टप्रद असा मार्ग आहे. या मार्गाचा अवलंब

केल्यास प्रत्यक्ष शारीरिक छळालाही सामोरे जावे लागते. परंतु कुठल्याही गोष्टीची तमा न बाळगता पोशट्टीदादांनी जमिनदारांविरूध्द लढा दिला आणि दोनशे वेठबिगारांची मुक्तता केली. हे केवढे मोठे कार्य आहे. परंतु यापेक्षाही जनसामान्यांना धीर देण्याचे, त्यांच्या रक्षणाचेही मोठे कार्य पोशट्टीदादांनी केले आहे. मराठवाडा मुक्ती लढा शेवटच्या टप्प्यात आलेला असताना रझाकारांची दडपशाही सुरू झाली आणि लोक भयभीत होऊन गेले. पोशट्टीदादासारख्यांनी सामान्य माणसांच्या सरंक्षणासाठी कंबर कसली. बिचकुंदा, देगलूर परिसरात हे कार्य पोशट्टीदादांनी केले.

फारसे शिक्षण न झालेला एखादा माणूस आयुष्यात किती महत्त्वाची कामे करू शकतो, त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे पोशट्टीदादा आहेत. म्हणूनच माझ्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांच्या मनात त्यांचे स्थान कायम आदराचेच राहिलेले आहे. मी महाविद्यालय सोडल्यानंतर प्राचार्य हेमचंद्र धर्माधिकारी सरांनी महाविद्यालय सोडले. काही मतभेद झाले. तडजोड होऊ शकली नाही. पण माझ्या माहितीप्रमाणे या गोष्टीचे शल्य पोशट्टीदादा उनग्रतवारांनाही होते. ते त्यांनी कुठेकुठे बोलूनही दाखवले असे मी ऐकले .... एवढी एक गोष्ट सोडली तर त्यांची कारकीर्द म्हणजे संथपणे वाहणारा गोदावरीचा पवित्र असा प्रवाहच होय ..... मला महाविद्यालय सोडून चौतीस वर्षे झाली, परंतु महाविद्यालयाचे स्मरण तर होतेच, पण ज्या काही लोकांचे स्मरण होते त्यात पोशट्टीदादांचेही स्मरण होते. हा एक त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष आहे. आपल्या महाविद्यालयाचे विद्यार्थी पुढे कुठे शिकायला गेले, आयुष्यात काय करीत आहेत यासारख्या गोष्टींवर त्यांचे लक्ष असे. अर्थात आज काय परिस्थिती आहे ते माहीत नाही परंतु त्यावेळी विद्यार्थी कमी होते आणि त्यामुळे वैयक्तिक संबंधही निर्माण होत होते. आमच्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांची पुढे काय प्रगती झाली, याची ते सतत माहिती घेत असत. कधी भेट झाली तर आनंद व्यक्त करीत असत. प्रोत्साहन देत असत. आणि मुख्य म्हणजे त्या विद्यार्थ्यावर प्रेमाचा वर्षाव करीत. या प्रेमाच्या वर्षावास मी पात्र ठरलो, याचा मला आनंद वाटतो. माझ्यासारखे शेकडो विद्यार्थी आहेत, यातच दादांचे मोठेपण साठले आहे.

दादांनी देगलूरच्या प्रगतीसाठी खूपखूप प्रयत्न केले. तेथील रस्ते उत्तम व्हावेत, व्यापार उत्तम चालावा, शिक्षणात देगलूरने नाव काढावे, गोरगरिबांच्या जीवनात नवा प्रकाश यावा यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. आज या वयातही करीत आहेत. ही सगळी कामे करताना राजकारणाची मदत त्यांना घ्यावी वाटली असणार. ती त्यांनी घेतलीही. ते काँग्रेसचे बावन्न वर्षे क्रियाशील कार्यकर्ते होते. काँग्रेसमध्ये असताना ते मा. शंकररावजी चव्हाण यांच्याबरोबर होते. पण राजकारणातल्या माणसाला कधीतरी काळायला पाहिजे की आता आपले राजकारण पुरे. नव्या लोकांना संधी दिली पाहिजे. परंतु आपल्या देशाचे दुर्दैव असे की राजकारणातली माणसे कधीच निवृत होत नाहीत. तरूणांच्या मनात असंतोष निर्माण होतो..... तरी ही ते राजकारणातच खितपत पडतात. परंतु पोशट्टीदादा 'खरे आर्यसमाजी' आर्य परंपरेत कधी तरी निवृत्त व्हायलाच पाहिजे हे ठरलेले असते. त्या प्रमाणे १९८८ पासून ते राजकारणातून निवृत्त झाले. निवृत्त झाले म्हणजे एकदम पाठच फिरविली..... पण राजकारणातून निवृत्त झाले म्हणजे कार्य संपले असे मात्र नाही. आजही ते थकलेल्या अवस्थेत व्यसनमुक्तीचे आणि बालसंस्काराचे कार्य तेवढ्याच उत्साहाने करीत आहेत. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातही नवेनवे उपक्रम करीत आहेत. हे सगळे पाहिले की म्हणावेसे वाटते पोशट्टीदादा उनग्रतवार हे देगलूरचे भाग्यविधाते आहेत देगलूरसाठी कर्मवीर आहेत....

**डॉ. नागनाथ कोत्तापल्ले**
मराठी विभाग प्रमुख,
पुणे विद्यापीठ, **पुणे**.

***

# पोशट्टीदादा : एक सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्व

– कुसुमावती दे. रसाळ



''सबके लिए खुला है मंदिर यह हमारा'' हे ''आर्य समाज'' संघटनेचे घोषवाक्य आहे. दादा याच संघटनेचे निष्ठावंत कार्यकर्ते. कृती आणि युक्ती मधील समन्वय हेच या संघटनेचे वैशिष्टय. दादांनी ''आर्य समाज'' संघटनेची दीक्षा १९३१ साली घेतली. अत्यंत गरीब कुटुंबात जन्मलेल्या दादांस दुर्दैवाने बेताचेच शिक्षण लाभले. तरी हे जे मिळाले त्याचे दादांनी सोनेच केले. सुदृढ शरीरयष्टी रूबाबदार व्यक्मिमत्व, मृदुभाषा, हे त्यांचे वैशिष्ट्य. साधी राहणी आणि उच्च विचारसरणीला शोभणारा शुभ्र खादी पेहराव पाहणाऱ्यास भुरळ पाडतो. त्यांची भेट वारंवार घ्यावी असे नेहमी वाटते. कारण या शुभ्र वस्त्रात दडलेलं असतं स्वच्छ प्रेमळ,सालस, शालीन मन, उपेक्षितांची अंत:करण जाणणारं. याच शालीन मनाच्या प्रेरणेतून त्यांनी विविध कार्यांना आकार दिला आहे. दादांना मिळालेली ''दादा'' ही उपाधी कुणा शासनाची नव्हे तर ती आहे जन सामान्यांनी दिलेली. हीच त्यांच्या जनतामुख कार्याची उस्फूर्त पावती आहे.

दादांचा जन्म ४ जानेवारी १९१५ साली झाला. गरीब शिंपी कुळात जन्म घेवून नामदेवाप्रमाणेच आपले श्रेष्ठत्व कृतीतून व्यक्त केले. ४ जाने २००४ रोजी ते ९० व्या वर्षात प्रवेश करतील. तेंव्हा त्यांच्या जीवनाचा यथार्थ आढावा घेणे अस्थायी ठरु नये. माझे दिवंगत पती देविदास रसाळांसही मी हैद्राबाद सोडून नांदेड शहरात एक विशिष्ट ध्येय घेवून आले. योगा योगाने दादांचा परिचय झाला. आम्ही त्यांना म्हटले आम्ही नांदेडशहरात ''दैनिक गोदातीर समाचार'' या नावाने एक वृत्तपत्र सुरू करण्याच्या विचारात आहोत. आमचा हा विचार ऐकला व त्यांनी दिलखुलासपणे म्हटले माझे सर्वशक्य सहकार्य तुमच्या उपक्रमाला मिळेल. आम्ही आनंदित झालो. हा शब्द जे आज तागायत पाळताहेत याचा मला सार्थ अभिमान वाटतो. श्री पोशट्टीदादा दरवर्षी डिसेंबर महिन्यात आमचे अभिनंदन करून नव्हे आशिर्वाद देऊन जातात. दादांचे मित्र जुळविणे व मैत्री अखंड जोपासणे हे त्यांचेतील दुर्मिळ वैशिष्ट्य आहे. लोक संग्रहाचा हा एक महामेरू आहे. दादांचा जन्म निजाम आमदानीत झाला. त्यांचे मूळ गांव देगलूर हे पूर्वी तेलगंण्यात होते. तेलंगाणा आणि मराठवाडा सीमे लगतची गांवे म्हणून दादाना तेलगू, मराठी व उर्दू या भाषा बालपणीच आवगत झाल्या. या मुसलमानी राज्यात हिंदूना दुय्यम स्थानी लेखले जाते ही बाब दादांच्या तरूण मनाला रूचली नाही. त्यांनी या वयात आर्य समाज या प्रभावी संघटनेशी जवळीक साधली. तरूण वयातच त्यांनी ''आर्य समाज'' संघटनेची दिक्षा घेतली. त्यांनी तत्कालीन आर्यसमाजी नेते स्वामी दयानंद, केशवराव कोरटकर, विनायकराव विद्यालंकार, आचार्य नरेंद्रजी, युद्धवीरजी यांचे अनुयायित्व त्यानी स्वीकारले. उपजत कर्तृत्व गुण अधिक प्रकाशमय बनला. यवनी सत्तेशी संघर्ष करण्यासाठी ते कटिबद्ध झाले. त्यांना या कामी कै. लक्ष्मणरावजी गोजे यांचे मार्गदर्शन लाभले. श्री गोजे यांचे कडून हात बॉम्ब तयार करण्याची विद्या संपादन केली व तरुणांची एक फळी निर्माण करुन प्रस्थापित निजामी शासनास जर्जर केले. याच काळात हैद्रबाद स्टेट काँग्रेसचे कार्यकर्ते स्वामी रामानंद तीर्थांच्या नेतृत्त्वाखाली हैद्राबाद मुक्ती संग्रामात कार्यरत होते. त्यात नेतृत्त्व स्विकारले व ते सक्रीय लढ्यात समाविष्ट झाले. या लढ्यात झेंडावंदन आरोपाखाली दादांना दिनांक २ सप्टेंबर १९४६ साली ५००/- दंड, दीड वर्षे करावास व १३ फटक्यांची शिक्षा भोगावी लागली.

हैद्राबांद संस्थान हे निझामी शासनातून मुक्त झाल्यानंतर श्री पोशट्टी दादांनी आपल्या विधायक कार्याचा मोर्चा देगलूर तालुक्यातील विकास कार्याकडे वळविला. अखंड परिश्रमातून त्यांनी १९४९ ते ५० साली देगलूर परिसरात नळ योजना कार्यान्वित करुन जनतेचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला. ते देगलूर बाजार समितीचे सतत २५ वर्षे सक्रीय सदस्य राहिले. त्यात त्यांनी सतत ७ वर्ष बाजार समितीचे सभापती पद ही सांभाळले. देगलूर पेठेतील नवा मोंढा दादांच्याच परिश्रमाचे फळ आहे.

त्यांनी सहकार क्षेत्रातही ही हजेरी लावली.

दादांनी कोणतेही लोकोपयोगी क्षेत्र अस्पृश्य मानले नाही. त्यांनी शिक्षण क्षेत्रातही आपल्या योजकतेचा प्रभाव पाडला. नितिनीकेतन जांब या शिक्षण संस्थेचा प्रसार व प्रचार मुखेड तालुक्यातच न ठेवता तो देगलूर तालुक्यात हिरीरीने केला. देगलूर शहरात त्यांनी १९६२ साली संत गाडगेबाबा शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोवली आजतागायत ते या संस्थेच्या अध्यक्ष पदी आहेत. देगलूर महाविद्यालयाचे ते गेली ४० वर्षे सदस्य आहेत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण स्थानिक परिसरातच उपलब्ध व्हावे यासाठी ते अखंडपणे प्रयत्नशील असतात.

जिथे विधायक कार्य तिथे दादा हे समीकरणच बनले. व्यसनमुक्ती चळवळ व बाल संस्कार चळवळीत त्यांनी जातीने लक्ष घातले. त्याचे सुपरिणाम ही या परिसराने दृष्य रूपात अनुभवले. जिल्हा स्वातंत्र्य सैनिक गौरव समिती, हुतात्मा स्मारक समितीचे सतत ७ वर्षे सदस्य होते. स्वातंत्र्य सैनिकांचे न्याय्य हक्कासाठी त्यांनी प्रखर संघर्षही केला. गणेशोत्सव समिती व निर्माण झालेल्या शांता समित्यांवर दादांची उपस्थिती अनिवार्य मानली जाते. दादा समय सूचक व कल्पकही आहेत. त्याची प्रचिती, स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्तच्या कार्यक्रमात त्यांनी हैद्राबाद मुक्ती दिनाचेही सूचक आयोजन केले व या संग्रामातील कार्यकर्त्यांच्या सक्रीयतेचे यथोचित स्मरण घडविले. या निमित्त दादांनी मुंबईच्या गांधी पुतळा जवळ मान्यवरांची व्याख्याने योजली. ९ ऑगस्ट रोजी ते या कार्यक्रमात स्वत: उपस्थित राहिले. राष्ट्रीय सेवा योजनेने घेतलेल्या विविध प्रकारच्या युवक शिबिरातही दादांना उद्‌बोधनार्थ संयोजक निमंत्रीण करतात त्यावरुन दादांची बौद्धिक क्षमता सहज लक्षात येते.

या सर्व कार्यक्रमापेक्षा आधिक प्रेरणा देते, ती आठवण म्हणजे गोवा मुक्ती संग्रामातील सक्रियता १९५५ साली दादांनी देगलूर मधून गोवा मुक्ती संग्रामात जाणाऱ्या तुकडीचे नेतृत्व केले. सालाझारच्या जुलमी राजवटीचे विरोधात झेंडा उभारतांना दादांना रक्त सांडावे लागले तरी अनेक आठवणी पेक्षा ही आठवण अधिक मोलाची वाटते.

अखंड सन्मार्गाने चालणाऱ्या दादांनी आपल्या कुटूंबियांवर देखील यथोचित संस्कार केले. पाल्यांना शिक्षण देवून स्वत:ला न घेता आलेल्या शिक्षणाची खंत भरुन काढली आणि संस्काराचे बीज स्व कुटूंबात रुजविले. नांदेड येथे उभी असलेली ''कर्मवीर हॉस्पिटल'' ही वास्तू त्यांचे ज्वलंत उदाहरण आहे. त्यांचे डॉक्टर चिरंजीव डॉ. कर्मवीर या सुसज्ज दवाखान्यातून रंजल्या गांजल्याची सेवा करतात. हा संस्काराचा ओघळ दादांच्या शिकवणुकीतूनच आला आहे. अशी माझी खात्री आहे.

दादा लवकरच ९० व्या वर्षात प्रवेश करतील. याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो, दादांनी शतकोत्सवी वर्षही पूर्ण करावे अशी ईश्वर चरणी प्रार्थना आहे. यासाठी त्यांना उदंड निरोगी समृद्ध आयुष्य द्यावे. अशी ही सर्वशक्तीमान परमेश्वराजवळ याचना आहे.

।।जीवेत शरद:शतम्।।

**कुसुमावती दे. रसाळ**
संस्थापिका,
दैनिक **'गोदातीर समाचार'**
शिवाजीनगर, **नांदेड.**

***

# असे घडले दादा ...

**– बी.जी. गुरूडे** (गुरुजी)

नियती केव्हा कोणाच्या हातून काय करवून घेईल हे कोणालाही उमगत नाही. आपल्या हातून काय घडणार आहे हे जर आपल्याला आधीच समजले असते तर किती बरे झाले असते ! पण तसे कधीच घडत नाही. आपला उगम कोठून व्हावा ? कोणत्या थेंबाने आपल्या प्रवाहाचे बीज व्हावे हे जसे नदीला ठाऊक नसते तसेच मानवी जीवनाचेही आहे. वाहणे अन् फक्त वाहणे हेच तीचे जीवन असते.

लक्ष्य प्राप्त झाल्यावरही बाणाची गती उरतेच, तसेच जीवनज्योती निमाली तरी पुढील जिवित कार्याचे बीज याच जीवनात रुजलेले होते हे कायापालटानंतरही उमगत नाही. आणि ते कोडे उगविण्यासाठीच प्रत्येक जीव पुन्हा पुन्हा परिभ्रमण करीत असावा किंवा अपूर्णत्वापासून पूर्णत्त्वाकडे वाटचाल करीत असावा. इहलोही जीवाकडून घडणाऱ्या किंवा घडविल्या जाणाऱ्या प्रत्येक घटनाकार्यातून पूर्वसुत्रांची उकलच होत असावी. अन्यथा सामान्यांच्या हातून असामान्य कार्य कसे घडले असते ? जीवनात या का ? चे उत्तर मिळविणे तसे दुर्गम आहे कसे-तर....

सामान्य कुटुंबात जन्म, संस्कारहीन बालपण, खाली धरती वर आकाशाचे पाठबळ शिरी घेऊन जीवन घडविणारा एक जीव, प्रेमाचा भुकेला, ज्ञानाचा पिपासू, इतरांचे उच्च जीवन पाहून त्यांच्या आदर्शाचे अनुकरण करणारा, एकाकी साधी ओळख झाली, तरी आठवण ठेवून ठेऊन त्याचे गाढ मैत्रीत रूपांतर करणारा, प्रत्येक कुटुंबाला आपल्यातीलच एक ज्येष्ठ वाटणारा, प्रलोभनापासून दूर असणारा..... अशा कितीतरी पाकळ्यांचे जीवन पुष्प म्हणजे पोशट्टीदादा !

वंशपरंपरेचा कोणताही मूल्यवान वारसा पाठीशी नसतानाही पोशट्टीदादा हे एक वलय कस ठरु शकले ? स्वकार्याने इतरांना ते कार्यप्रवण कसे करू शकले ? याचा शोध म्हणजेच खऱ्या अर्थाने प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करणाऱ्या पिढीसाठी एक नैतिक व मानसिक बळ आहे. स्वभाव भोळा भाबडा पण विचार पोक्त, केव्हा काय करावे व करू नये याचा दांडगा अनुभव असल्यामुळे विरोधक असे नाहीतच. व असले तरी कार्यप्रवणतेमुळे विरोध अवरोध बनत नाही. पोशट्टीदादांना हेही कसे जमू शकले? मला वाटतं, याचा शोध त्यांच्या संस्कारप्रक्रियेतच घेतला पाहिजे. वयाच्या १८ व्या वर्षी श्यामसुंदर व बन्सीलालजी भाईच्या आर्य समाजविषयक विचारांचा दादांवर इतका प्रभाव पडला, की ते पक्के आर्यसमाजी बनले. त्याचे कारणही त्यांच्याच मुखातून जाणून घेण्यासारखे आहे. साधारणत: ६० वर्षापूर्वी म्हणजे त्यांच्या बालवयातील समाज व्यवस्था जात, वर्ण व्यवस्था आजच्या वर्तमानाइतकी शिथिल नव्हती. त्याचे चटके त्यांच्या बालजीवनाला झोंबत राहिले. व मन बंड करून उठायला लागले. पण ते प्रकट करता येत नव्हते, कारण ज्ञान,धन, मान परंपरा याची शिदोरीच त्यांच्या पदरी नव्हती म्हणून त्यांच्या मनाच्या तडफडीनेच त्यांना आर्यसमाजाकडे खेचले. स्वामी दयानंदाच्या 'सत्यार्थ प्रकाश' ने त्यांच्या जीवनाला दिशा मिळाली. त्याचाच आदर्श ठेऊन पाण्याने माळी नेईल तिकडे जावे अशा रितीने त्यांनी आर्यसमाज विचाराला आपले जीवन समर्पित केले. कार्य लहान किंवा मोठे नसते तर ते किती प्रमाणिकपणे केले जाते यावर जीवन दीन किंवा हीन बनते. दादांनी जे कार्य हाती घेतले ते अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडले. आपले जीवन दुसऱ्यांसाठी खर्च करण्याची इच्छा व्यक्तिच्या जीवनात यशाचा तुरा खोवते. दादांचे आजचे जीवन पाहता याची प्रचिती येते.

आज शिक्षण क्षेत्रात वावरताना त्यांना आर्यसमाजी विचारांची शिदोरी फार उपयोगी पडते आहे. बोलण्यात ते फटकळ वाटत असले तरी मनाने ते हळवेच आहेत. जीवनावर नितांत श्रद्धा असल्याने, समग्र मानव्यावर प्रेम असल्याने दादांना बोलण्यासाठी कोणतेही विषय कमी नाही. त्यांचे कोणतेही भाषण माणसाला समग्र माणुसपणाकडे घेऊन जाणारे असते. त्यांचे हिंन्दी भाषेवर बरचे प्रभुत्व आहे पण मराठी भाषेवर तेलगुचा पगडा जाणवतो तरी विचाराला कोणतेही शब्द अडवू शकत नाहीत. श्रोते दादांचा भाव समजतात, तळमळ समजतात

शब्द नाही.

बालपणी व्यापाराचा पूर्वअनुभव असल्यामुळे तसे ते पक्के हिशोबी आहेत. स्वत:प्रमाणे इतरांनीही वागावे हा आग्रह त्यांना खूप त्रास देऊन जातो ; पण हातून झालेली चूक मोकळेपणाने कबूल करण्याची हिंमत असल्याने काही वेळा होणारा विरोधही ते बोथट करू शकतात. कुटुंबातील काही प्रसंगामुळे दादा कधी-कधी उद्‌विग्न होतात. मनातली ही सल प्रकट करताना आपला भावनिक बांध त्यांना अनावर होतो. अशी विविध रूपे जवळच्यांना दिसून येतात.

गरिबीमुळे झालेल्या भटकंतीमुळे, अनुभवव्यामिश्रतेमुळे त्यांच्या स्वभावात एक जबरदस्त निरीक्षणशक्ती निर्माण झाली आहे. मठा-मंदिरात ते सेवेसाठी राहिले आणि टाळ, विण्याचा अर्थ खऱ्या अर्थाने समजून घेतला. म्हणून दादांच्या आजच्या जीवनकार्याची प्रेरणा मला त्यांच्या त्यावेळच्या परिस्थितीतच दिसते. सतत विद्वानाच्या सहवासात असावे अशी त्यांची तळमळ असते. माणसातल्या चांगुलपणावर प्रेम करणाऱ्या दादांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त माझ्या हार्दिक शुभेच्छा!

**बी.जी. गुरूडे (गुरूजी)**
साधना विद्यालय, देगलूर

***

# आमचे काका

- डॉ. भूषण जोरगुलवार

***॥ चंदनाचे हात पायही चंदन ॥***
***॥ परीसा नाही हीन कोणी अंग ॥***

काकांच्याकडे पाहिले की वरील संतवचनाची आठवण येते. गत ५८-५९ वर्षात माझ्या आयुष्यात प्रकाश झोतात असलेल्या अनेक व्यक्तिमतत्त्वाला जवळून पहावयास मिळाल्या. उच्च वलयांकित अशा माणसांविषयी आपल्या मनात कुतुहल असणे स्वभाविक असते. मात्र ज्यावेळी त्या माणसांशी आपला जवळून परिचय व्हायला लागतो त्यावेळी त्यातल्या अनेक माणसांची उंची कमी होवू लागते. 'दूरुन डोंगर साजरे' ही उक्तीही ओठावर तरळून जाते. मात्र याउलट मला अशीही कांही माणसे भेटली की जी फारशी वलयांकित नाहीत, उच्च पदस्थ नाहीत, सत्ता व संपत्तीचा दबदबाही नाही मात्र त्यांचा अधिकाधिक परिचय झाल्यावर, त्यांच्या निकट गेल्यावर, त्यांच्या सान्निध्यात आल्यावर त्या व्यक्ती अधिकच उत्तुंग भासल्या. त्यांचा प्रामाणिकपणा समाजप्रती त्यांची बांधीलकी, राष्ट्राविषयी त्यांची समर्पणाची भावना कांही तरी समाजहित करण्याची धडपड याची जाणीव झाली. माझ्या जीवनात आलेल्या अशा व्यक्तीमध्ये पोशट्टी दादा उनग्रतवार यांचा समावेश होतो.

वास्तविक त्यांचे व माझे कुठल्याही प्रकारचे नाते नाही तरी अगदी सख्खे नाते असल्या सारखे त्यांनी स्वतःच्या मुला प्रमाणे माझ्यावर प्रेम केले. माझे थोरले बंधू श्री लक्ष्मणराव शहापूरकर यांच्यामुळे मी काकांच्या संपर्कात आलो, नव्हते, त्यांच्या कुटुंबातील एक सदस्य बनलो.

निझामी संस्थेच्या जोखडात जखडलेल्या अत्यंत मागास भागातील नांदेड जिल्ह्यातील देगलूर या तालुक्याच्या गावी मन्नेरवारलू या मागास जातीत काकांचा जन्म झाला. सत्ता संपली, शिक्षण, संस्कृती याचा मागमूसही त्यांना परंपरेने प्राप्त झालेला नसतांना केवळ सद्विचार व सद्संगतीने त्यांनी समाजहिताचाच विचार आयुष्यभर केला.

देगलूर हे ठिकाण तसे तीन राज्यांच्या सीमारेषेवरील तालुक्याचे शहर आहे. आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र या राज्यांच्या सीमारेषेवरील हे गांव. संस्कृती व भाषा धड तेलगू नाही, मराठी नाही की कानडीही नाही. अशा या ठिकाणी उत्तम संस्काराची कोणतीही परंपरा नसणारा हा माणूस स्वकर्तृत्वाने समाजात इतरांसाठी संस्काराचा आदर्श सिद्ध झाला.

पारतंत्र्यात जन्म झाल्याने तत्कालीन परिस्थितीच्या रेट्यामुळे त्यांना स्वातंत्र्य लढ्यात उडी घेणे अपरिहार्य होते. मातृभूमीच्या पारतंत्र्याच्या श्रृंखला तोडण्यासाठी ते स्वातंत्र्य आंदोलनात लहानपणीच सहभागी झाले. केंद्र सरकारचे मान्यता प्राप्त ते स्वातंत्र्य सैनिक आहेत. देगलूर स्वातंत्र्य सैनिक संघटनेचे ते अध्यक्ष आहेत. केवळ इंग्रजांविरुद्ध व निझामाविरुद्धच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी भागत घेतला असे नसून १९५६ मध्ये त्यांनी गोवा मुक्ती आंदोलनात बॅ. नाथ पै, यशवंतराव चव्हाण, मा.सा. कन्नमवार यांच्या बरोबरीने सहभाग घेतला.

हिन्दू धर्मातील स्पृश्यास्पृश्य व इतर वाईट प्रथांचा त्यांना अतिशय तिटकारा होता. स्वातंत्र्य लढ्याच्या काळातच ते आर्य समाजाची विचारांकडे आकर्षित झाले. स्वातंत्र्योत्तर काळात या भागात आर्य समाजाची धुरा त्यांनी सांभाळली. आजही ते आर्य समाजात, होम-हवन करतात. एवढेच नव्हे तर आपल्या मुलांचे विवाही त्यांनी आर्य समाज पद्धतीने लावले. या भागातील एक कट्टर आर्य समाजी म्हणूनही त्यांची समाजात प्रतिमा आहे. आमचा आंतरजातीय विवाह झाल्यानंतर त्यांनी आम्हा पती-पत्नीला मानसिक बळ दिले. देगलूर आर्य समाज मंदिरात आमचा सत्कार केला. आमच्या हस्ते हवन केले. माझ्या पत्नीची ओळख घरच्या इतर मंडळींशी करुन दिली. काका, काकू मला मुलगा मानतात. ते नाते आजही कायम आहे.

स्वातंत्र्यानंतर सुरुवातीस त्यांनी काही काळ

आपला सहभाग राजकारणतही नोंदवला. स्वातंत्र्य आंदोलनापासूनच त्यांचा पिंड हा कॉंग्रेसचा होता. शंकरराव चव्हाणांचे देगलूर तालुक्यातील अत्यंत विश्वासू व खंदे समर्थक म्हणून त्यांची एकेकाळी ओळख होती. मात्र त्या बदल्यात शंकररावांनी आपल्यासाठी काही करावे किंवा विधान सभेचे तिकिट द्यावे अशी इच्छा त्यांनी बाळगली नाही. अत्यंत नि:स्थार्थी बुद्धीने त्यांनी राजकारणात असतांना शंकररावांना साथ दिली. मात्र दिवसेंदिवस राजकारणाचा घसरता दर्जा लक्षात घेवून त्यांनी अलीकडे राजकारण संन्यास घेतला आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा सर्वदूर प्रसार झाला. त्यातून ग्रामीण भागातील शिक्षितांची एक नवी पिढी उदयास आली. विशेषत: १९६० सालानंतर संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली नंतर कालखंडात पिढ्यान् पिढ्या शिक्षणापासून व त्या शिक्षणाद्वारे मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहिलेला ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजूर दलित भटके या सर्वांना शिक्षण मिळावे म्हणून खाजगी क्षेत्रात अनेक शिक्षण संस्था निर्माण झाल्या. त्यापैकीच आडत व्यापारी एज्यकेशन सोसायटी देगलूर हे एक होय. देगलूर सारख्या ठिकाणी उच्च शिक्षणाची सोय करण्याच्या दृष्टीने चौथी पास असलेल्या पोशट्टीकाकांनी येथील मोढ्यांतील व्यापाऱ्यांना एकत्र आणून या संस्थेची स्थापना १९६३ मध्ये स्थापना केली. ज्या काळात महविद्यालय काढणे हा व्यावसायिक दृष्टिकोन नव्हता तर दारी पांढरी हत्ती पोसणे असा काळ होता. त्या काळत त्यांनी लक्षणीय कार्य केले, संस्थापक पदाधिकाऱ्यांपैकी काका एक होत. गत कित्येक वर्षापासून या महाविद्यालयीन संस्थेचे अध्यक्ष म्हणून अत्यंत निष्ठेने, पूर्ण वेळ देऊन ते काम पाहतात. नुकतेच देगलूर येथील प्रसिद्ध साधना हायस्कुल संस्थेचे त्यांना बिनविरोध अध्यक्षपद देण्यात आले. या वयातही जबाबदारी ते अत्यंत तळमळीने पार पाडत आहेत. ग्रामीण भागातील बहुजन समाजातील मुलांना उच्च शिक्षण घेता यावे म्हणून त्यांची सारखी धडपड चालू असते. ही त्यांच्या सामाजिक बांधीलकीची पावतीच होय. अहमदपूर कॉलेज गुणवत्तेच्या क्षेत्रात पुढे जावू शकते तर देगलूर कॉलेज का नाही ? हा विचार त्यांना नेहमी सतवत असे म्हणून अहमदपूर कॉलेजचे व्यवस्थापन पाहण्यासाठी एक शिष्टमंडळ घेवून त्यांनी अहमदपूरला भेट दिली. आपल्या कॉलेजच्या प्राध्यापकांना जीव ओतून शिकविण्यास सांगितले. सर्वसाधारण पणे कॉपी हा प्रकार चालतो तो त्यांनी पूर्णपणे बंद केला. अनेक समाज कंटकांचा रोष पत्करला व देगलूर कॉलेज केंद्राला कॉपीमुक्त परीक्षा केंद्राचा बहुमान मिळवून दिला. देगलूर कॉलेज एक आदर्श कॉलेज व्हावे ही प्रामाणिक भावना त्यांच्या मनात आहे. म्हातारपण ही एक State of Mind आहे. काही माणसे अगदी सत्तरीच्या पुढेही आशावादी, हिरवी असतात पण हल्ली तिशीतले तरुणही सिनिकल, निराशावादी दिसतात. पण काका पहिल्या प्रकारातले आहेत. He refuses to grow old त्यांचा उत्साह उदंड आहे. या वयातही ते कॉलेजसाठी धडपडत असतात. कोणतीही प्रतिकुल परिस्थिती असतांना न खचता काम कसे करावे हे काकांच्या कडून शिकावे. त्यांना जीवनात खऱ्या अर्थाने साथ दिली ती काकूंनी, सौ. सरस्वतीबाईनी. वैयक्तिक प्रपंचाचा गाडी सांभाळता त्यांनी काकांचा सामाजिक संसारही सांभाळला, अजूनही सांभाळत आहेत. काकांना भेटायला गेलेल्या माणसांचे स्वागत हसत खेळत होते, त्यांचे कुशल विचारले जाते, त्यांच्या कौटुंबिक सुख-दु:खात काका-काकू सहभागी होतात.

काकांचा प्रचंड उत्साह, त्यांची काम करण्याची शैली जबरदस्त इच्छाशक्ती हे सर्व खरोखरी अतुलनीय आहे. आपण सामाजिक चळवळीचे प्रणेते आहोत, आपण म्हणजे खूप काही मोठे आहोत असे त्यांनी कधी मानलेच नाही. आपल्याला अजून खूप काही करायचे आहे आणि आपण ते केले पाहीजे, याच विचाराने वागतांना काका आजही दिसतात. नव्या योजना नवे कार्यक्रम त्यांच्या डोक्यात अजूनही घोळत असतात. त्यांच्याकडे पाहिले की रॉबर्ट फ्रॉस्टच्या या चार ओळी आठवतात.

*The woods are lovely*
*Dark - n - deep*
*But I have promisess to keep*
*Miles to go before I sleep.*

**डॉ. भूषण जोरगुलवार**

***

# ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी मा. पोशट्टीदादा उनग्रतवार

**- शं.ल. अंजनीकर, नांदेड**

देगलूर शहरातील जी काही मोठी माणसे बोटावर मोजण्यायवढी आहेत. त्यात दादा हे सर्वश्रष्ठ असे व्यक्तीमत्व आहे. दादांचा माझा असा संबंध जून १९६३ मध्ये आला. पण माझ्या वडिलांचा (कै. लक्ष्मणराव पाटील) यांचा घनिष्ठ मित्रत्वाचा संबंध फार पूर्वी पासून होता. म्हणूनच वडिलांनी आम्हा सर्वांना त्यांच्या देखरेखी खाली शिक्षणासाठी देगलूरला ठेवले.

दादा त्या काळात फार मोठे देगलूरचे नेतृत्व करणारे धडाडीचे नेते होते. दादा देगलूरच्या कृषी बाजार समितीचे सभापती होते. त्या काळात दादांनी आडत व्यापाऱ्यासाठी नवा आराखडा व नावीण्यपूर्ण अशी योजना तयार करून आजच्या आडत व्यापाऱ्यांची सोय करून दिली. नांदेड जिल्ह्यात अग्रेसर अशी आडत व्यापारी शिक्षण संस्था स्थापन केली. ज्या संस्थेचे पहिले अध्यक्ष कै. गणपतराव मुजळगेकर पाटील होते. तर दादा उपाध्यक्ष होते. कालांतरानी दादा या संस्थेचे अध्यक्ष झाले व ते आजतागायंत आहेत. दादांच्या विविध पैलुंवर लिहिता येईल पण दादांनी जी शैक्षणिक कार्यात गरूडझेप मारली ती वाखणण्यासारखी आहे.

देगलूरला महाविद्यालय काढण्याचे एका बिडी, कारखानदारांनी (भिकुसा) सुचविले, व मदत ही जाहीर केली. त्यावेळी त्यांचा उदोउदो झाला. पण तो भामटा निघाला. ही गोष्ट देगलूर वासियांना खटकली व त्यांनी स्वत:च्या बळावर आडत व्यापारी शिक्षण संस्था काढून नवे महाविद्यालय सुरू केले. त्यात दादांचा सिंहाचा वाटा आहे.

जून १९६३ मध्ये कला शाखा काढून त्या काळी P.V.C. चा वर्ग चालू केला. अपुऱ्या साधन सामुग्रीवर महाविद्यालय सुरू केले. मी त्याच वर्षी १० वी उत्तीर्ण झालो होतो. दादांनी माझी T.C. घेवून देगलूर महाविद्यालयात प्रवेश दिला ज्या काळी मी महाविद्यालयात प्रवेश घेतला, त्याकाळी हे महाविद्यालय नदीकडे जाणाऱ्या मार्गावरील मारुती मंदिराच्या शेजारी होते. दादांनी जसे मुले, मुली गोळा केली तसेच प्राध्यापकांनाही ठिकठिकाणाहून आणले. प्राचार्य शिंदे व प्राचार्य बनहट्टी यांच्या काळात माझे पदवीचे शिक्षण झाले. दादांनी हे महाविद्यालय जर काढले नसते तर माझ्या सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची सोय झालीच नसती. दादांनी ग्रामीण भागात महाविद्यालय काढून माझ्या सारख्या असंख्य विद्यार्थ्यांची शैक्षणिक सोय करुन दिली व त्यांचे जीवन सुकर करुन दिले.

आज महाविद्यालयाचे वटवृक्षात रुपांतर झाले आहे. त्यामागे दादांची प्रेरणा व स्फूर्ती आहे, हे विसरता येणार नाही. दादा ८९ वर्षे पूर्ण करुन ९० व्या वर्षी पदार्पण करणार आहेत. तरी परमेश्वर त्यांना दीर्घायुष्य व सुखी आरोग्य लाभो.

अशा या थोर समाजसेवक, जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी पोशट्टीदादास माझे कोटी कोटी प्रणाम.

देगलूरचे जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक पोशट्टी दादा उनग्रतवारचे माझे मी देगलूर मातंग विकास विद्यालयाचा विद्यार्थी असल्यापासूनचे संबंध, नंतर तर त्यांचे आणि माझे कौटुंबिक संबंध जुळले. ते मला बडे दामाद मानतात. कारण माझ्या लग्नात त्यांनी कन्यादान कर्त्याची भूमिका पार पाडली. देगलूर येथे झालेल्या माझ्या आर्य समाजी पद्धतीच्या आंतरजातीय विवाहत त्यांनी महत्वाची भूमिका पार पाडली आहे. त्यांचेच सहकारी कै. मनोहरराव देसाई होट्टलकर यांनी आमच्या लग्नात पुरोहीताची भूमिका पार पाडली आहे. त्यामुळे दादांना आम्ही प्रारंभापासून आमचे पालकच मानत आले आहोत आणि आजही मानतात. त्यांनी व त्यांच्या पत्नीनी आमचे लग्न झाल्यानंतर पालकाची जबाबदारी पार पाडतांना कसलीही कसूर केलेली नाही. त्यांचे ज्येष्ठ चि. डॉ. कर्मवीरच्या लग्नात मानाचा पहिला आहेर आम्हाला केला.

देगलूर महाविद्यालयात १९६४ ते १९७२ पर्यंत मी राज्य शास्त्राया प्राध्यापक होतो. मला तिथे प्राध्यापकी मिळवून देण्यातही त्यांचा पुढाकार होता. त्यांचा प्रदीर्घ सहवास लाभला असून आता देखील सतत संपर्क असतो. त्यामुळे त्यांचे आलेले खूप अनुभव सांगता येतील.पण

विस्तार मर्यादेच्या दृष्टीने ते सांगणे शक्य नाही. पण कांही प्रसंगी त्यांनी दिलेला सल्ला मात्र भविष्याच्या दृष्टीने मोलाचा ठरला आहे.

देगलूर हे गाव आंध्र-कर्नाटक सिमेलगत असल्यामुळे तेलगू संस्कृतीचा पगडा अधिक आहे. आता होतो की, नाही माहीत नाही पण आम्ही विद्यार्थी असतांना देगलूरला देवीच्या सण साजरा केला जात असे आणि त्या सणात वैयक्तिक व सामुहिक नवस फेडले जात असत. तो काळ म्हणजे १९५४-५८ चा. त्या सणात मोठ्या प्रमाणावर पशू हत्या व्हायची. कोंबडे, बकरे, रेडे देखील देवी समोर जीवंत कापले जायचे. हा असला सण प्रकार बंद करावा म्हणून आम्ही काही विद्यार्थी संघटीतपणे दादाकडे जावून संताप व्यक्त केला. त्यावेळी दादा हे तरुणांचे आकर्षण होते. कारण व्यासपीठावरुन सडेतोडपणे आक्रमक बोलायचे. आजही बोलतात पण दादांच्या राजकीय प्रगतीत तो एक अडसर ठरला. हा एक चर्चेचा स्वतंत्र विषय आहे. सडेतोड, आक्रमक बोलणारे दादा आम्हा तरुणांचे आकर्षण बनले होते. म्हणून आम्ही त्यांच्याकडे जाऊन बळाचा वापर करुन सण बंद पाडण्याची भाषा बोलू लागलो. अर्थात त्यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन किंवा हा सणाचा अमानुष प्रकार असा काहीच विचार आमच्या डोक्यात नव्हता, फक्त ही वाईट, क्रुर गोष्ट बंद झाली पाहिजे एवढेच वाटत होते. हे आजही आठवते. आक्रमक प्रवृत्तीचे दादा शांतपणे ऐकून घेतले आणि या प्रकरणातील गांभीर्य त्यांच्या लक्षात आले आणि म्हणाले तुमचे म्हणणे रास्त आहे. तुमच्या मताशी मी शंभर टक्के सहमत आहे. पण तुमचे बळ कमी पडते. एक तर लोकांनी सण साजरा करण्याची परवानगी घेतली असून तिथे जमलेल्या जमाव अंधश्रद्धेने भारावून गेलेला आहे, शिवाय नशापाणी केलेला आहे, त्यामुळे तुम्ही त्यांच्यापुढे टिकाव धरु शकणार नाही. म्हणून हा नाद सोडा असा स्पष्ट सल्ला दिला. त्यावेळी दादांनी अपेक्षाभंग केला असे आम्हाला वाटले पण नंतर मात्र दादांच्या म्हणण्यातील सत्य पटले. पण असा सल्ला देत असतांना दादा अस्वस्थ मात्र झाल्याचे भासले.

असाच आणखी एक प्रसंग आठवतो. तो गोवा मुक्ती संग्रामाचा काळ. दादांच्या नेतृत्वाखाली देगलूरहून प्रत्यक्ष गोव्यात लढा देण्यासाठी जथा निघाला होता. त्या सैनिकांचा निरोप देण्यासाठी गांधी चौकात सभा झाली. त्या सभेत स्वत:च्या भाषेत दिलेल्या जोशपूर्ण भाषणाने, दादा सभेचे हिरो बनले. आम्हा काही विद्यार्थ्यांत उत्साह संचारला आणि त्यांच्या सोबत लढा देण्यासाठी गोव्याला जाण्याचा निश्चय ठरला. म्हणून आम्ही त्यांच्या सोबत नेण्याचे आमचे आग्रही मनोगत मांडले. पण इथेही दादांनी आम्हा उत्साही तरुणाची निराशा केली पण त्या भारलेल्या वातावरणातही त्यांनी आमच्या भवितव्याचा दूरदर्शी विचार केला. म्हणाले, तुम्ही गांव सोडून देगलूरला शिक्षणासाठी आलात. तुम्ही गोव्याला आलात तर आई वडील धसकी घेतील. शिवाय तुमची परीक्षा जवळ आली आहे. भवितव्य धोक्यात आणू नका. परीक्षा झाल्यानंतर हा गोवा मुक्ती संग्राम चालू राहीला तर अवश्य सहभागी व्हा. स्वातंत्र्य सैनिक होण्याची आमची संधी हुकली पण दादांची भूमिका देखील भवितव्याच्या दृष्टीने तितकीच भवितव्याच्या स्वागताहार्य होती.

मी प्राध्यापक असतांना कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी जमाव बंदीचा आदेश मोडून मोर्चा काढला. आम्ही काही प्राध्यापक मोर्चा सोबत होतो. जमावबंदीचा आदेश मोडल्यामुळे चिडलेल्या पोलिसांनी विद्यार्थ्यांवर लाठीमार केला, खरे म्हणजे लाठीमार करण्या इतकी परिस्थिती आटोक्या बाहेर नव्हती. आमच्या समजावण्याचा पोलिसांवर काही परिणाम झाला नाही. दहशत निर्माण करणे हाच मुख्य उद्देश पोलीस अधिकाऱ्यांचा होता. मोर्चा विसकळीत झाला. विद्यार्थी पांगले पण पोलीसी अत्याचाराची बाब खटकली. अन्यायाविरुद्ध चिड उबाळून आली आणि पोलिसांचा निषेध करण्यासाठी मी माझ्या कांही सहकारी प्राध्यापकांसह गांधी पुतळ्यासमोर उपोषणाला बसलो. कदाचित देगलूरमध्ये पोलिसांच्या निषेधार्थ उपोषणाला बसण्याचा पहिलाच प्रसंग असेल. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आर्य समाजी पोशट्टीदादा व सर्वोदयवादी कै. गोपाळरावजी मुजळगेकरांनी आम्हाला पाठींबा दिला. उपोषण मागे घेण्यासंबंधी तत्कालीन प्राचार्यांनी दिलेला सल्ला मी व माझ्या सहकाऱ्यांनी नाकारला. पोलिस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांची माफी मागीतल्या नंतरच उपोषणाची सांगता झाली. त्याबदल्यात प्राचार्य व सेक्रेटरीचा रोष पत्करावा लागला. मिटिंगमध्ये दादांनी समर्थपणे माझी बाजू

घेतल्यामुळे माझ्यावरील शिस्तभंगाची कार्यवाही टळली, पण अर्जापूरला प्राचार्य म्हणून निवड झाल्यानंतर लोन मिळाले नाही तर प्राध्यापकीचा राजीनामा देवून जावे लागले. त्या प्रसंगी दादांनी केलेली तळमळ आजही स्मरणात आहे.

वरील प्रसंगावरुन दादा-माझ्या घनिष्ट संबंधाची वाचकांना कल्पना येते. तरी पण दादांचा स्पष्टवक्तेपणा मी अनुभवला आहे. स्पष्टवक्ते हेच खरे हितचिंतक असतात. मी अर्जापूरला प्राचार्य पदासाठी अर्ज केल्याचे त्यांना समजले आणि ते मला हिंदीतून म्हणाले दादा आर्य समाजी असल्यामुळे त्यांच्यावर हिन्दी भाषेचा प्रभाव अधिक आहे. 'जवई, मै अंबेकर दादाको तुम्हारे बारे मे बोल सकता था, मगर तुमचे परसोके एलक्सन में, अंबेकरके विरोध में श्री पटने का प्रचार किया इसलिये मै तुम्हारे बारे में उनसे बात नही कर सकता' हे बोलणे मला खटकले आणि डोक्यात विचार आला राजकारणी मंडळी विरोध विसरत नाहीत संधी मिळाली की वचपा काढतात. म्हणून मी प्राचार्यांच्या मुलाखतीलाच गेलो नाही. आपण त्या परिसरातले आणि या कारणावरुन निवड टाळण्यात आली तर ते आपल्यासाठी अपमानास्पद ठरेल हा विचार बळावला. पण अर्जापूरच्या प्राचार्य पदाचा योग होता तो घडून आला. याही प्रसंगी मला मदत न करु शकल्या बद्दल दादांनी खंत व्यक्त केली.

कै. अंबेकराचे दादा हे कट्टर समर्थक आणि निरपेक्षपणे ते शेवटपर्यंत त्यांना साथ दिली. मा.शंकरराव चव्हाणांचेही तितकेच निष्ठावान अनुयायी. साथ आणि निष्ठेचे काही चीज झाले नसल्यामुळे आमच्या सारख्या दादांच्या हितचिंतकांना खेद वाटल्याशिवाय राहत नाही. पण एका सामान्य कुटूंबातील पोशट्टीला देगलूरच्या जनतेनी स्वंयस्फूर्तपणे त्यांच्या ऐन उमेदीच्या काळात दादा ही उपाधी दिली. ते दादा म्हणूनच सर्व परिचित आहेत. दादागीरी करणारे दादा नसून कैवारी दादा आहेत. राजकीय संन्यास घेवून उर्वरित आयुष्य देगलूर महाविद्यालयाच्या उभारणीत वाहून घेण्याचे ठरवल्याचे जाणवते.

दादा हे एक माणुसकी जतन करणारे माणूस आहेत. पण माणूस हा विकार युक्त असतो. कोणतीही व्यक्ती संपूर्णतः दोषमुक्त किंवा दोषयुक्त नसते. प्रत्येकात गुणदोष असतातच. दोष मुक्त असणारी व्यक्ती ही प्रती परमेश्वरच मानली पाहिजे. पण गुण-दोष युक्त असलेला एखाद्याला समाजातर्फे अनुक्रमे भला किंवा बुरा ठरवले जाते ते गुण-दोषाच्या निकषावर. एखाद्या माणसात दोषा पेक्षा चांगल्या गुणाचे प्रमाण अधिक असेल ती व्यक्ती भली समजली जाते. आणि गुणापेक्षा दोषाचे प्रमाण अधिक असेल तर ती व्यक्ती बुरी ठरते. मी आधीच सांगितले आहे माणूस विकार युक्त व्यक्ती असल्यामुळे काळाच्या ओघात त्यांचेही काही चुकले असेल नाही असे नाही. पण मला आलेल्या बऱ्या-वाईट अनुभवांच्या आधारे दादा एक भले माणूस आहेत. संगळ्यांना माझे हे मत पटेलच असा माझा दावा नाही, पण त्यांचा भलेपणा मला भावला आहे.

मात्र इथे नम्रपणे नमुद करतो समाजाच्या प्रारंभापासून समाजात भली-बूरी माणसे आहेतच आणि राहणारच पण सद्या समाजातील भल्या बुऱ्यांचा समतोल बिघडला आहे. समाजात भली माणसे दुर्मिळ होत चालली आहेत. त्या दुर्मिळात दादांचा समावेश होतो.

**– शं.ल. अंजनीकर,नांदेड**

***

# ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी व जाणते समाजसेवक पोशट्टीदादा उनग्रतवार

– प्रा. हरिश्चंद्र मानकरे

देगलूर शहराच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी ज्याचं नाव लिहावं, त्यात अग्रक्रमाने प्रथम पोशट्टीदादा उनग्रतवार याचं नांव अनेक मान्यवरांच्या तोंडून येईल, असं हे व्यक्तिमत्त्व.

दादा हा शब्द ऐकताच अनेक भाव मनाला स्पर्श करून जातात, पण पोशट्टी दादांच्या संदर्भात मात्र दादा म्हणजे आजोबा किंवा घरातील ज्येष्ठ बंधू या अर्थाने सर्व समाजातील लहान-मोठी माणसे रूढ अर्थाने वापरत असतात.

मा. खासदार गंगाराम देशमुख तरोडेकर यांनी सर्व प्रथम त्यांना "दादा"म्हणून संबोधले आणि ते सर्वांचे दादा बनले. अनेक वेळा दादा म्हटले की, त्यांचे नावं उच्चारण्याची गरजच भासत नाही.

पोशट्टी दादांचा जन्म ४ जानेवारी १९१५ रोजी देगलूर येथे झाला. अतिशय गरीब कुटुंबात जन्म झाल्यामुळे त्यांना गरिबीचे चटके सोसावे लागले. गरिबीमुळेच त्यांना इच्छा असूनही शिक्षण घेता आले नाही. जेम तेम इयत्ता चौथी पर्यंतचे शिक्षण दादानी पूर्ण केले. तरी देखील दादा अन्वयार्थ लावताना ग्रॅज्युएट-पोस्ट ग्रॅज्युएट माणसाला मागे टाकतात हे केवढे आश्चर्य !

दादांचा जन्म गरिबीमध्ये होऊन देखील सर्वसामान्य माणसासारखे श्रीमंत होण्याचे स्वप्न बघण्या ऐवजी समाजसेवेचे वेड लागावे हा केवळ योगायोग नसून आर्य समाजाने केलेला संस्कार आहे. स्वामी दयानंद सरस्वतींनी समाजसेवेचे व्रत धारण केले. सामाजिक तसेच धार्मिक सुधारणा करण्यासाठी आर्य समाजाची स्थापना केली. दादांवरही त्या विचारांचा प्रभाव पडला, दादानी देगलूर येथे आर्य समाजाची स्थापना केली आणि आर्य समाजाचे कार्य सुरू झाले.

समाज सेवेसोबतच पोशट्टी दादांनी राजकारणातही सक्रिय सहभाग नोंदविला १९५२-५३ मध्ये दादा देगलूर नगरपरिषदेवर नगरसेवक म्हणून निवडून गेले. दादांना आता इतरांच्या सारखे स्वप्न पडायला हवे होते. पण त्यांना एक किलो मिटरहुन पाण्याची घागर डोक्यावर घेऊन येणाऱ्या देगलूर शहरातील महिलेचे दु:ख दिसायला लागले. दादां आता नळ योजनेचे वेध लागले. या कामी अनेकांनी प्रयत्न केले, त्यात दादांचा वाटा हा सिंहाचा होता त्या वेळचे निझाम सरकार मधील मंत्री फुलचंद गांधी यांच्याकडे ते गेले. त्यांच्या समोर नळ योजनेचा प्रस्ताव मांडला त्यांनी एक लाख रूपये जमा करण्याचे सुचवले. एक लाख रू. जमा करणे त्या काळी फारच कठीण काम होते. तरी ही युक्त्या-प्रयुक्त्या करून, तसेच प्रमुख व्यापाऱ्याना एकत्र करून ते काम पूर्ण करून दिले. स्त्रियांच्या डोक्यावरची घागर थांबली, याचा आनंद महिला वर्गास किती झाला असेल तो शब्दात मांडणे सुध्दा शक्य होणार नाही.

परिस्थितीमुळे दादांना शिक्षण घेता आले नाही याची जाणीव पुन्हा-पुन्हा होत राहिली, आणि त्यामुळेच आपल्या परिसरातील मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे हा ध्यास लागला. पहिली मुलींची शाळा निघाली आणि २५ % खर्च नगर पालिकेने करावा ही अट होती. त्यातही दादा आघाडीवर होते. नांदेड येथे सुरू झालेल्या सायन्स महाविद्यालय, पीपल्स महाविद्यालयासाठी बऱ्याच मोठ्या प्रमाणात त्यांनी आर्थिक सहकार्य केले. निती निकेतन शिक्षण संस्था जांब (बु) ता. मुखेड या शिक्षण संस्थेचे १९५५ पासून सदस्य आहेत. तसेच संत गाडगे बाबा शिक्षण संस्था देगलूर या शिक्षण संस्थेचेही ते सदस्य असून या दोन्ही संस्थेची हायस्कुले देगलूरच्या परिसरात नावारूपाला आलेली आहेत.

२ ऑक्टोबर १९६१ हा दिवस देगलूर शहराला कलाटणी देणारा ठरला. सिन्नर बिडीचे उद्योगपती भिकासा यमोसा क्षेत्रिय यांचे नाव धारण करून एक तोतया देगलूर मध्ये येणे, कै. मा.आ. मोरे, कै. मा. पद्मश्री श्यामरावजी कदम आणि जिल्हा अधिकाऱ्यासमक्ष त्यांना महाविद्यालयाची आवश्यकता बोलून दाखविणे, या कामी

एक लाख रू. देणगी देण्याचं जाहीर करणे, आणि देगलूरवासियांच्या आशा वाढणं आणि तशातच तो तोतया असल्याचे सिध्द झाल्याने सर्वांची निराशा होणं हा योगा-योग घडावा. आपण इतर शिक्षण संस्थाना देगनी देतो तर मग आपणच महाविद्यालय का काढू नये असे वाटू लागले. श्रीमंत घरची मुलं हैद्राबाद, औरंगाबाद येथे जाऊन शिक्षण घेत असत. पण सर्व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना बाहेरगावी जाऊन शिक्षण घेणं परवडणारं नव्हतं. शेतकऱ्यांच्या मुलांना तसेच शेतमजूरांच्या मुलांना घरची चटणी-भाकरी खाऊन शिक्षण घेण्यासाठी देगलूर येथे महाविद्यालय सुरू होणं आवश्यक होतं, तेव्हा देगलूर शहरातील प्रतिष्ठित आणि दानशूर मंडळींना येथे कॉलेज काढणे अनिवार्य वाटले. त्रास होईल परंतु ज्ञानाची गंगोत्री स्त्रियापासून सर्वसामान्या पर्यंत नेता येईल या गोष्टीचा आनंद त्यांना वाटला.

१) श्री गणपतराव पाटील मुजळगेकर २) श्री पोशट्टीदादा उनग्रतवार ३) श्री नारायणशेठ चिद्रावर ४) श्री शंकरशेठ तोटावार ५) श्री नागनाथशेठ मोतेवार ६) श्री बाळूजीशेठ कळसकर ७) श्री जयरामशेठ चिद्रावार ८) श्री राम कुमारशेठ बजाज ९) श्री मांगीलालशेठ झंवर १०) श्री विठ्ठल रेड्डी गंगारेड्डी ११) श्री लिंगन्नाशेठ पुजेंलवार ही देगलूर मधील प्रतिष्ठित व दानशूर व्यापारी मंडळी पूढे आली, अनेक अडचणींना सामोरे जाऊन अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालय १९६३ मध्ये सुरू करण्यात आले. आज या महाविद्यालयात श्रीमंताच्या मुला सोबतच अतिशय प्रतिकूल परिस्थिती मधील गोर-गरिबांची मुले-मुली आनंदाने शिक्षण घेत आहेत. डॉक्टर, इंजिनिअर, वकिल, प्राध्यापक आणि अशा कितीतरी मोठया पदावर प्रशासकीय सेवेत या महाविद्यालयाचे विद्यार्थी कार्यरत आहेत.

या शिक्षण संस्थेने आणि संस्था चालकांनी सेवाभाव डोळ्यासमोर ठेवून आजतागायत ही संस्था चालविली. अनेकांनी या महाविद्यालयातील समानता निःस्वार्थीपणा, कर्मचाऱ्या बद्दल कमालीची आपलुकी पाहुन आश्चर्य व्यक्त केले. एक आदर्श महाविद्यालय कसे निर्माण होईल याकडेच संस्थेचे लक्ष कसोशीने असते. त्यात प्रामुख्याने दादांचे योगदान असणे साहजिकच आहे.

साधारणपणे राष्ट्रीय चळवळीशी दादांचा संबंध १९४३ पासून आला. हा काळ म्हणजे देशात काँग्रेसने म.गांधी यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांना भारत सोडून जाण्यासाठी हैराण केले होते. स्वातंत्र्याची चळवळ गतिमान होताच दादांचं रक्त शांत बसण शक्यच नव्हतं. दादा त्यात सहभागी झाले. अनेक पदे त्यांनी भूषविली, संघटन करण्यावर त्यांचा विशेष भर असायचा. काँग्रेसचे ते क्रियाशील सदस्य राहिले.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले, परंतु मराठवाडा मात्र निजामाच्या पारतंत्र्यातच होता. हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा लढा स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली चालू होता. पोशट्टीदादांही त्यात सक्रियरित्या सहभागी झाले. याच काळात बॉम्ब तयार करण्याचे तंत्र सुध्दा त्यांनी आत्मसात केले होते. निजामाचा विचार आपले संस्थान भारतात विलीन करण्याचा नव्हता. त्याने हैद्राबाद संस्थान स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न केला. तिरंगा ध्वज लावणे गुन्हा समजला जाऊ लागला. दादांच्या स्वतंत्र बुध्दीला हे पटले नाही. त्यांनी सन १९४६ मध्ये तिरंगा झेंडा फडकविला. त्यात त्यांना अटक झाली. एक वर्षे कैद व ५०० रू. दंड ठोठावण्यात आली. त्याची तमा दादांनी कधीच बाळगली नाही. या देशभक्तीचा आदर्श आजही सर्वांना प्रेरणा देणारा आहे.

**प्रा. हरिश्चंद्र मानकरे**
(इतिहास विभाग)
**देगलूर महाविद्यालय, देगलूर,**
जि. नांदेड.

***

# मी पाहिलेले दादा

– शेख एम.एच.

पोशट्टीदादा नाव उच्चारल्याबरोबर देगलूर शहरात तरी त्यांना न ओळखेल असा कुणी माणूस मिळणार नाही. याचे एकमेव कारण लहानांपासून ते मोठ्यापर्यंत मग तो कोणत्याही जाती धर्माचा असो, शहरात एकदा भेट झाली की, मग दादा त्याला विसरणे अशक्य.

माझा व दादांचा परिचय अगदी लहानपणापासून आहे. माझ्या 'एकलार' या गावात दादांची मावस बहीण रहात असल्याने कोणत्या ना कोणत्या प्रसंगामुळे दादांचे 'एकलार' ला येणे जाणे राहत असे. आमच्या गावात मन्नेरवारलू समाज सर्वात जास्त पुढारलेला शिकलेला व सधन शेतकरी असल्याने दादांची भेट म्हणजे सर्व गावात चर्चेला व आदरयुक्त पाहुणचाराला विषय असायचा. मी त्यावेळी लहान म्हणजे तिसरी व चौथीला असेल. मलाही त्यांच्याबद्दल कुतूहल वाटायचे.

साधारणत: १९५२ ते १९६० चा तो कार्यकाळ, त्यावेळी दादांचे तरुणपण, अंगात स्फुर्ती, सहकार्य करण्याची भावना, आत्मविश्वासू वृत्ती इत्यादी त्यांच्या अंगी असलेल्या गुणामुळे त्यांच्याकडे कुणीही व कोणत्याही कामासाठी जावो दादा अगदी तत्पर असायचे. त्यांचे काम करून दिल्याशिवाय त्याना समाधानच व्हावयाचे नाही म्हणूनच त्याकाळी ते सर्वत्र लोकप्रिय होते. दादा हैद्राबाद मुक्ती संग्रामात प्रत्यक्ष भाग घेतल्याने त्यांना त्याकाळी तुरूंगवासाची ची व फटक्यांची शिक्षा झाली होती. हैद्राबाद मुक्ती संग्रामानंतर त्यावेळच्या राजकीय पुढाऱ्यांचे दादांशी घनिष्ट सबंध आल्याने दादांच्या शब्दाला त्यावेळ फार मान होता. तालुका पातळीवरच्या अधिकाऱ्या पासून ते मंत्री मंडळातपर्यंत दादांची चलती होती. ते जे सांगतील ते काम झालेच अशी परिस्थिती होती.

त्यामुळे दादांचे देगलूर च्या राजकारणात तर दबदबा होताच परंतु नांदेड जिल्ह्यातील त्यावेळचे नेतेही त्यांच्या शब्दास मान देत असत.

दादा नव्वदी असले तरीही स्मरणशक्ती, काम करण्याचा उत्साह इतका दांडगा आहे की तरुणही त्यांच्या पुढे कमी पडावा.

एका सामान्य शेतमजुराच्या घरी जन्मलेले दादा, ना शेती, ना कुणी घरात कमवता, ना शिकलेला अशी परिस्थिती आई वडिल शेतीवर मजूरी करायचे व मिळाले त्या मजूरीवरच मुला बाळाचे पालण पोषण करावयाचे. त्यामुळे दादांना इच्छा असून 4 थी नंतर शिक्षण घेता आले नाही. शिक्षण घेता आले नाही म्हणून ते निराषश झाले नाहीत तर त्यांच्यात असलेल्या जबर इच्छा शक्तीमुळे ते कुठेही कमी पडले नाही. त्यांनी लहापणी आई वडिलाना हातभार म्हणून जमीनदाराकडे अल्पशा पगारावर नोकरी केली, हॉटेल व्यवसाय चालविला, अडत दुकानात मुनिमगिरी केली.

सतत कष्ट करत राहिल्याने व त्याला इमानदारीची साथ असल्याने दादांना प्रत्येक कामात यश मिळत गेले. त्यांनी आई वडिलांची खूप सेवा केली त्याचाही आर्शीर्वाद त्याच्या पाठीशी असल्याने ते पग्रतीपथावर वाटचाल करीत राहिले

सोज्वळ लक्ष्मीरुपी पत्नी सरस्वतीबाई त्यांना लाभल्या. स्वत:च्या मालकीचे अडत दुकान झाले. समाजात मान सन्मान प्रतिष्ठा मिळाली हे त्यांच्या कार्याचे फलित आहे.

शैक्षणिक क्षेत्रातही दादा मागे राहीले नाहीत. स्वत: शिक्षण न घेतल्याची खंत त्यांना होती म्हणूनच की काय त्यांनी देगलूर येथे अडत व्यापारी शिक्षण संस्था स्थापन करण्यात पुढाकार घेतला ह्या संस्थेच्या स्थापने पासून (कांही कार्यकाल वगळता) ते आजपर्यंत अध्यक्ष आहेत याशिवाय देगलूर येथील 'नीती निकेतन' शिक्षण संस्था, व संत गाडगे बाबा शिक्षण संस्था देगलूरच्या स्थापनेतही त्यांचा सिंहाचा वाटा असून या संस्थेचेही ते संस्थापक सदस्य व अध्यक्ष राहिले.

गरिबीचे चटके वाईट असतात, गरिबांवरच अन्याय अत्याचार होत असतात, याची जाण दादांना असल्याने त्यांच्याकडे कुणीही तक्रार घेवून गेल्यास दादा आस्थेने

या अन्यायाच्या विरूद्ध आवाज उठवतात. त्याला न्याय मिळवून देतात. असाच एक प्रसंग महाविद्यालयात माझ्या समक्ष अनुभवास आला. १९६५-६६ चे वर्ष त्यावेळी प्रचार्य बनहट्टी सरांचा कार्यकाल, विनाअनुदानीत कॉलेज, पीयुसी व बी.ए. प्रथम दोनच वर्ग. एक कारकून तीन सेवक, एक प्राचार्य, सात प्राध्यापक असा महाविद्यालयाचा स्टाफ. चतुर्थश्रेणी कडून कामे करून घेणे एक कसतरच असायचा. त्यात कमी पगारवरील सेवक श्री एमेकर, श्री बाबाराव व श्री नारायण हे तिघेजन त्यात. श्री एमेकर हा वयस्कर त्याच्याकडून कामच होत नसे. मात्र बोलण्यात, तक्रार करण्यात, चुगल्या करण्यात पटाईत. एकदा त्याने आपले वैयक्तिक काम श्री नारायण सेवकास सांगितले असता ते त्यानी नाकारले एवढाच राग मनात ठेवून संधी साधून वाद विवाद घालून श्री नारायण यास अर्वाच्य शिवीगाळ केली. श्री नारायणला सहन झाले नाही तो ही त्याच्या अंगावर धाऊन गेला. दादांपुढे गयावया करून आपल्यावर झालेल्या अन्यायाचे कथन केले. मग दादा रागाच्या भारात आपल्या हातावरील कामे बाजूला सारून (त्यावेळी मार्केट कमिटीचे अध्यक्ष होते.) कॉलेज गाठले. मग काय पहता दादाची तोफ नारायण सेवकावर एवढ्या जोरात गडगडली की बिचारा नारायण हतबल झाला. चूक नसतांनाही त्याला शिव्या खाव्या लागल्या. मला सर्व कांही माहीत असूनही दादापुढे बोलण्याची मी हिमत करू शकलो नाही. दादांच्या अशा भाबडेपणाचा पणाचा कांही लोकांनी असा गैर फायदा घेतला.

माजी गृहमंत्री मा. श्री शंकररावजी चव्हाण यांच्यावर दादांचे निस्सीम प्रेम, निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून दादा त्यावेळी ओळखले जात असत (आता दादांनी राजकारण सोडले आहे) मा. शंकरराव साहेबांचा जेंव्हा केव्हा देगलूर चा दौर असायचा तेव्हा दादांना कार्यक्रम कसा यशस्वी होईल याचीच काळजी असायची त्यासाठी दिवस रात्र ते कार्यक्रमाच्या तयारीत घालवीत. असाच एकदाचा प्रसंग दादा देगलूरहून नांदेडला बसने निघाले त्याच बस मध्ये काही तरूण शिकलेली मंडळी प्रवास करीत होती. त्यांच्या गप्पा राजकारणावर व राजकीय नेत्यावर चालू होत्या. बोलता बोलता एक तरूणाने मा. शंकररावजी चव्हाण बद्दल एकेरी अप-शब्द वापरला. मग काय पाहता दादाचा पारा चढला. त्यानी आपल्या जागेवरून उठून त्या तरुणाच्या मुस्काटात जोरदार लगावली. दोन मिनिटे स्तब्ध, कुणीच काही बोलेना सर्व प्रवासी दादांकडे पाहू लागले. तु साहेबाबद्दल असे का बोलतोस असे म्हटल्यावर तेव्हा कुठे प्रवाशाच्या लक्षात आले. त्याच गाडीत प्रवास करीत असलेले नगरपालिका मुख्याधिकारी श्री अन्सारी साहेबांनी मध्यस्थी करून दादांला शांत केले.

दादांची मा.चव्हाणांवरील निष्ठाआजही तशीच आहे. महाविद्यालयाचा मी अध्यक्ष आहे म्हणून कधीच जाणवू दिले नाही. एका पित्याचे आपल्या मुलावर जसे प्रेम असते तसे प्रेम मला त्यांनी दिले. माझ्या सुख-दुःखात ते सतत सहभागी रहतात. माझ्या घरात सण असो, कोणताही कार्यक्रम असो लग्न असो दादांची हजेरी न विसरता असते. आस्थेने प्रेमाने कुटुंबियात मिसळतील, बोलतील सल्ला देतील, रागावतील, इतकी आपुलकी आमच्या बद्दल त्यांच्या मनात आहे. 'मानवधर्म' जोपसणाऱ्या आमच्या दादांना उदंड आयुष्य लाभो. ईश्वर त्यांना शंभरी पूर्ण करण्याची शक्ती देवो. व त्यांचे मार्गदर्शन व अशीर्वाद मला व माझ्या कुटुंबियास सतत मिळत राहो हीच मनः पूर्वक सदिच्छा !

**शेख एम.एच.**
माजी प्रबन्धक,
देगलूर महाविद्यालय, **देगलूर.**

***

# देगलूरचे सेवाव्रती : पोशट्टी दादा

– प्रा. शशिकांत सेलूकर

नुकताच काही कामानिमित्त्याने मी देगलूरला गेलो होतो. देगलूर गावात उदगीरकडून जातानाच या शहरात प्रवेश करण्यापूर्वी मराठवाड्याच्या आंध्र, महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सीमेवर, आपल्या गुणवत्तेने व कर्तृत्वाने तळपत असलेले ग्रामीण म्हटले तर व शहराला लाजविल असे देगलूर महाविद्यालय आहे. या महाविद्यालयात न जाता गावात प्रवेश करणे मला कधीच शक्य होत नाही. माझ्या गाडीचे चाके आपोआप त्या दिवशी देगलूर महाविद्यालयाच्या प्रवेश द्वाराकडे वळली, तोच गेटवर असणाऱ्या सेवकांने मला प्रश्न विचारला की ''साहेब आपण विद्यापीठाचे का ? विद्यापीठाचे असाल तर मध्ये आपल्या गाडीला प्रवेश करता येईल नाहीतर खाजगी वाहने या प्रवेशद्वाराच्या बाहेरच थांबवावी लागतील.'' मी म्हणालो की, अहो मला ओळखले नाही का ? मी लातूर विभागीय मंडळाचा माजी सदस्य प्रा. शशिकांत सेलूकर - असे म्हटल्यावर तो म्हणाला'' अरेच्या साहेब ! आता आपले प्राचार्य वाकोडकर सर आहेत त्यांनी सर्व महाविद्यालयाचा चेहरा-मोहरा बदलून टाकलाय आणि एक नवी शिस्त, नवी प्रेरणा, नवी चेतना आली साहेब आता '' शिपायाच्या या उद्‌गारांनी मी भारावून गेलो पण प्राचार्य वाकोडकर सरांना न भेटता गावात जाणे शक्यच नव्हते तेंव्हा प्राचार्य कार्यालयात मी गेलो माझे सोबत माझे सहकारी शिक्षक मित्र श्री. मधुकरराव कुलकर्णी हे होते. तेवढ्यात प्राचार्य अशोकराव वाकोडकर सर व संस्थेचे अध्यक्ष पोशेट्टीदादा उनग्रतवार हे माझ्या समोर आले त्यांनी माझ हे हसून स्वागत केले. आम्हा दोघांचेही आदरातिथ्य त्यांनी केले. बोलताना डॉ. अशोकराव वाकोडकर म्हणाले की, ''सर दादांचा नव्वदवा वाढदिवस ४ जानेवारी २००४ ला संपन्न होत आहे या निमित्त्याने आम्ही कार्यक्रम आयोजित केला आहे... '' असेच काही काही वाक्य महाविद्यालयासंबंधी व अध्यक्षांच्या प्रेरणेसंबंधी ते सांगत असतानाच माझ्या मनात विचारतरंग उठले. मी दादांशी माझा परिचय केंव्हा झाला याचे स्मरण करीत होतो.

आणि वाटले दादांशी माझी ओळख खुपच उशीरा झाली आहे. पण त्याचं कार्य मात्र मी ऐकून होतो मी लातूर विभागीय मंडळाचा सदस्य असतांना कॉपी निर्मूलन कार्यक्रमासाठी देगलूरला आलो होतो. त्यावेळी श्री वाकोडकर सरांनी मला दादांच्या कडे नेले व तेथे त्यांची ओळख करून दिली. श्री वाकोडकर सरांनी त्यांच्या बद्दल मला जे सांगितले, त्या परिसरातील लोकांकडून मी जे ऐकले व माझ्या पाहण्यात जे आले, त्यातून मला जे भावले त्यामूळे त्यावेळी झपाटून गेलो. एवढा मोठा कार्यकर्तृत्वाचा महामेरू, ज्यांना स्नेही होण्याचे भाग्य मला लाभले. त्यांचा अंतर्बाह्य परिचय प्रथम झाला. त्यातून दादांच्या जीवनाचे संपूर्ण दर्शन मला जसे घडले तसेच वर्णन करावे असे मला वाटले. दादांची जीवनाची एकूण वाटचाल म्हणजे त्यांच्या आडत एज्यूकेशन सोसायटीचा तपशिलवार इतिहास नाही तर ही एका ध्येयवादी धडपडीची, झुंजीची, संघर्षाची, समराची, यशाची, सिद्धीची समाधानाची व कृतकृत्यतेची भारावून टाकणारी हृदयाच्या तारा छेडाणारी, कांदबरीपेक्षाही सुरस व रोचक कहाणी, कृतार्थतेचे अश्रू डोळ्यांत उभे करणारी एक कहाणी म्हणजे दादांचे जीवन ! असे मला वाटते.

समाजासाठी निस्वार्थपणे काम करणाऱ्या माणसाला समाज वेडा म्हणतो. परंतु जी माणसे समाजासाठी वेडी होतात तेच समाज बदलू शकतात. हे विधान पोशट्टीदादांच्या बाबतीत तंतोतंत लागू आहे असे मला वाटते एका कवीने म्हटल्याप्रमाणे ''आज जगी या ठरलो वेडे, गातील उद्या यशाचे पोवाडे'' हेच त्यांच्या बाबतीत ही खरे आहे. आज नव्वदाव्या वर्षी त्यांची धडपड पाहिली की, या गोष्टीची तीव्रतेने जाणीव निर्माण होते दादा आज कॉलेजमध्ये नॅकची कमिटी येणार म्हटल्याबरोबर ज्या तडफेने महाविद्यालयाच्या अंतर्बाह्य स्वरूपात बदल करू पाहत आहेत. महाविद्यालयाच्या आवारात स्वत: थांबून सर्व कामे करून घेत आहेत. हा त्यांचा उत्साह तरुणांना लाजवील असाच आहे. या वयातही त्यांची धडपड,जिद्द विलक्षण आहे व यामध्ये त्यांचा कुठलाही स्वार्थ दिसत नाही. स्वार्थ निरपेक्ष असे त्यांचे काम आज समाजाला निश्चितच प्रेरणा देणारे असेच आहे.

माझा आणि त्यांचा संबंध १९९८ च्या सुमारास आला. त्यावेळी सुद्धा मला असे वाटले की, ''शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कसे असावेत? तर पोशेट्टी दादांसारखे'' आपल्या आचरणात ते कडक शिस्तीचे व स्पष्टवक्ते तर आहेतच पण आपल्या विद्यार्थ्यांवर आईसारखी प्रेमळ माया करणारेही आहेत. महाविद्यालयाच्या वास्तुत ते नेहमी येतात. पण त्यांच्या येण्याचा अडथळा कोणालाही होत नाही उलट त्यांची उपस्थिती सर्वांना प्रेरणा देणारी अशी असते. संस्थाचालकांनी विद्यालयाच्या महाविद्यालयाच्या दैनंदिन कारभारात फारसा हस्तक्षेप करू नये असा संकेत असला तरी. दादांसारखे संस्थाचालक महाविद्यालयात येतात. महाविद्यालयाच्या अडीअडचणी तात्काळ सोडवितात. सर्व प्रश्नांची त्यांना जाण आहे. हेच त्यांच्या भेटीत मला जाणवले. यामुळेच त्यांची येथील उपस्थिती सर्वांना आल्हाददायक वाटते. आपल्या महाविद्यालयाचे विद्यार्थी गावातील दुसऱ्या उच्च माध्यमिक विद्यालयातून परीक्षा देत आहेत. तेथे त्यांना अडचणी येत आहेत. सोयी नाहीत, डेस्क नाहीत तर मग बोर्ड अशी का अव्यवस्था करते असा प्रश्न त्यांनी मला केला व चिडून हे असले वातावरण सर बदलले पाहिजे. आमच्या कडे सर्व सोयी विद्यार्थांना आहेत ते सोडून बोर्डाच्या धोरणामुळे आमच्या मुलांना फार त्रास सहन करावा लागत आहे असे ते उद्वेगाने मला म्हणाले यांतून विद्यार्थ्यांबद्दलची आस्था व प्रेमच दिसून येते.

महाविद्यालयातील मंडळींना वडिलकीच्या नात्याने ते रागावतात याचे सर्वांनाच अप्रुप आहे. महाविद्यालयाच्या कामासमोर त्यांना काहीच सुचत नाही. घराच्या वाट्याला ते फार कमी येतात. असेच त्याचे कुटुंबीय त्यांच्याबद्दल म्हणतांना आढळले यातूनच त्यांच्या मानसिकतेची, घरातल्या सामाजिक आणि सौहार्दपूर्ण वातावरणाची कल्पना येऊ शकते.

आज दादा नव्वदाव्या वर्षात पदार्पण करीत आहेत. पण ते वृद्ध नाहीत. कुशाग्र बुद्धिमत्ता व शैक्षणिक मुलगामी चिंतन त्यांच्याजवळ आहे. आगामी काळातील योजनेविषयी पुढे काय असे मी म्हटले तर दादा म्हणाले ''शेवटपर्यंत जे कार्य शरीराने घेतले ईश्वरी आहे समजून या संस्थेची महाविद्यालयाची सेवा अखंडपणे करीत राहायचे असे ठरविले आहे.'' दादा म्हणाले की, ''मी शीघ्रकोपी असलो तरी दीर्घकोपी नाही.'' बाह्यदर्शनी कठोर वाटणारे दादा आतून अत्यंत कोमल आहेत. हृदयातील शिक्षकांबद्दलचे असणारे प्रेम, आत्मीयता व मृदुता त्यांच्या अधिकाधिक जवळ आपण जाऊ तेव्हाच कळते. त्यांच्या स्वभावाचे दर्शन त्यांच्या बरोबर अनेक वेळा गप्पा मारताना मला घडले आहे. ज्याप्रमाणे फणसाला बाहेरुन काटे असतात पण आतून त्याच्यातील गऱ्याची तितकीच मधूरता असते. अशाच प्रकारचा दादांचा स्वभाव आहे. हे मला आवर्जून सांगावेसे वाटते.

दादांच्या बाबतीत कुशाग्र बुद्धिमत्ता आचाट, स्मरणशक्ती, व शिक्षणाविषयी स्पष्ट धोरण हे त्यांचे पैलू सांगता येतील वाटते.

त्यांच्या जीवनात कठोरता आहे. तसेच कोमलताही आहे. तेवढीच समर्पित वृत्ती आहे. परस्पर विरोधी वाटणाऱ्या स्वभावाचा सुंदर मिलाप व त्यांचा संगम पोशट्टीदादांच्या व्यक्तिमत्वात सामावलेला आहे असे म्हणावेसे वाटते, म्हणूनच त्यांच्याबद्दल बोलताना माझी पत्नी सौ. शोभा मला एकदा सहजपणे म्हणाली की, ''आपण देगलूरला गेलोत आणि दादांच्या कडे गेलो नाहीत तर तुम्हाला व मला चुकल्या - चुकल्या सारखे वाटते नाही ?'' या उद्‌गारातूनच त्यांच्याविषयीचे सहजतेने जाणवणारी महत्वाची भावना लक्षात येऊ शकते ज्यांना ज्यांना दादांच्या या व्यक्तिमत्वाचे दर्शन झाले ते भाग्यवानच म्हटले पहिजेत अशा अनेक भाग्यवानापैकी मी एक आहे. ज्यांचा संबंध हा प्राचार्य बाकोडकर सरांच्या सारख्या मित्रामुळे आला हे मी माझे भाग्य समजतो.

तुम्ही तुमच्या एकूण जीवनाबद्दल कृतार्थ आहात का ? असा प्रश्न दादांना मी विचारल्यावर ते म्हणाले की, कृतार्थ म्हणजे पूर्णविराम अशी आत्मसंतुष्टता कधीही कोणाला वाटू नये.

अशी झपाटलेली माणसं भेटल्यावर राम गणेश गडकरी या प्रसिद्ध नाटककारांच्या 'पुण्यप्रभाव' या नाटकातील एका प्रसिद्ध वाक्याची आठवण होते. 'पुण्यप्रभाव' या नाटकात राजा - भूपाल आपलया स्वामीनिष्ठ सेवकाला म्हणतो -

*''लहान बालकाप्रमाणे ध्यास घ्यावा तरुणाच्या तडफेने आणि ताकदीने ते काम तडीस न्यावे आणि*

*वृध्दाप्रमाणे फलाशेबद्दल विरक्त असावे ''*

*अशा प्रकारे तुमची वृत्ती आहे.*

दादांच्या एकूण त्यांच्या नव्वद वर्षाच्या कालखंडाकडे पाहून हेच मला म्हणावेसे वाटते.

अशा या कर्तृत्व संपन्न व शिक्षण क्षेत्रात अविरत कार्य करणाऱ्या श्री. पोशेट्टीदादांना परमेश्वर दीर्घायुष्य व दीर्घ आरोग्य देवो व त्यांची शंभरी साजरी करण्याची संधी आम्हाला मिळावी ही ईश्वरचरणी प्रार्थना करून -

*'' जनसेवा ही ईश्वरभक्ति बोध यातला समजुया*
*विश्वासाने बंधुत्वाचे नाते सर्वा सांगु....''*

अशा शब्दात या कर्तृत्वसंपन्न सेवावृत्ती व्यक्तिमत्वाला सादर प्रणाम करून मी त्यांच्या या सोहळ्याला शुभेच्छा व्यक्त करतो.

**प्रा. शशिकांत सेलूकर**

एम.ए. (मराठी), एम.ए. (राज्यशास्त्र) बी.एड्.
लालबहादुर शास्त्री कनिष्ठ महाविद्यालय,
**उदगीर,** ता. उदगीर जि. लातूर
पटणे निवास, नई आबादी, **उदगीर**
दूरध्वनी - २५८८८० (०२३८५)
मोबाई - ९४२२३७१५३४

***

# असे ज्यांचा मार्ग वेगळा.....

- प्रा. गणेश मोहरीर

काळ झपाट्याने बदलत आहे. स्टेशनांत वेगाने शिरणाऱ्या गाडीचे डब्बे नजरे समोरून जावेत तसा ! एक एक करून डब्बे आपल्या समोरून निघून जावेत आणि आपलीच माणसं आपल्याला दिसू नयेत, असचं कांही तरी कल्पना न केलेलं घडताना दिसतंय, सारं कांही तेच आहे परंतु तसच मात्र नाही. काळा सोबत सारं कांही बदलत आहे. आमचं जीवन, जीवन शैली, जीवन मूल्ये आणि या सगळया बरोबर माणूस व समाज सुद्धा.

स्वातंत्र्योत्तर काळात आपल्यात अगदी 'U turn' बदल झाला आहे जीवन मूल्यांची घसरण ही न थांबणारी प्रक्रिया कधी झाली हे कळलंच नाही. मोठया पदावर खुजी ठेंगुणी माणसं जाऊन बसली आणि हा चमत्कार झाला! निर्मळ, नि:स्पृह माणूस शोधावं म्हटलं तर स्वातंत्र्यपूर्व काळात धाव घ्यावी लागते. आदर्श प्रशासक शोधण्यासाठी थेट शिवरायांच्या काळात डोकावे लागते. बलीदानाचा वसा जणु सावरकर, भगतसिंग आपल्या सोबत घेऊन गेले! एवढं परिवर्तन झालयं गेल्या दोन तीन दशकांत.

म्हणतात ना, काळयाकुट्ट ढगाला एक रूपेरी किनार असते Every dark cloud has a silver lining. हे तत्त्व निसर्गाप्रमाणे समाजाला देखील लागू पडते. आजही अशी कांही माणसं आहेत, की जे आदर्श, जीवन मूल्ये यांच गोठोडं उराला कवटाळून बसली आहेत. रेटयाला न जुमानता प्रवाहाविरूध्द मार्गक्रमण करतांना दिसतात. अगदी 'मुखी नाम बापूचे परि काम खिसे कापूचे' या काळात देखील ही माणसं सत्व टिकवून आहेत. स्ट्रीट लाईटचा झगमगाट नसेल परंतु नंदादिपाचा मंद प्रकाश त्यांच्या कार्यातून साक्षात्कारीत होतो. 'Lost in the crowd' असचं त्यांच अस्तित्व आहे.

श्री पोशट्टीदादा उनग्रतवार हे असचं एक दुर्मिळ व्यक्तिमत्त्व आहे. देगलूरकरांना 'दादा' या नावाने परिचित असलेले श्री पोशट्टीदादा उनग्रतवार वयाच्या ९० व्या वर्षी देखील तरूणाच्या उत्साहाने कार्य करतांना दिसतात. हैद्राबाद मुक्ती संग्रामात सर्व कांही त्यागून उडी घेतलेले दादा, गोवा मुक्तीच्या अंदोलनात अखेरपर्यंत आघाडीवर राहिले. या दोन्ही स्वातंत्र्य अंदोलनाच्या आठवणी त्यांच्या तोंडून ऐकणे हा संग्रहणीय अनुभव असतो. रझाकारांच्या अनन्वीत अत्याचारांच्या कथा त्यांच्या तोंडून ऐकल्यावर आजही अंगावर काटा येतो.

उमेदीच्या काळांत त्यांनी केवळ आपल्या समाजकार्याचा विचार केला. स्वातंत्र्य लढयांत थोडंफार काम केलेली माणसं पुढे सरकारी दरबारी उचपदावर आरूढ झाले. फादर चे गॉड फादर झाले. दादा मात्र सत्तेच्या राजकारणापासून कित्येक योजने दूर राहिले.

राजकारणातील बदलते रंगढंग त्यांना कधीच आकर्षित करू शकले नाहीत. थोरांमोठयांच्या सहवासात ग्रहण केलेले विचार, आचार आणि संस्कार घेऊन दादा सत्तेच्या राजकारणा पासून दूर निघून गेले. आणि एक व्रतस्थ योगी बनून समाज कार्यात मग्न झाले. समाज आपल्याला काय देतो हा विचार त्यांनी कधीच मनात आणला नाही. उलट समाजाला आपण काय देऊ शकतो हाच विचार त्यांनी आपल्या मनी बाळगला. नव्या पिढीला दर्जेदार शिक्षण मिळावे. ते निकोप असावे हे त्यांनी कटाक्षाने पाहिले. नव्या पिढीने, पारंपरिक मूल्ये जपत आणि जोपासीत असतानाच आधुनिक जीवनाचे रहस्य जाणून घ्यावे म्हणून त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वत:ला झोकून दिले. आजही वयाच्या ९० व्या वर्षी त्यांच कार्य थांबलं नाही. झपाटलेल्या माणसाचं 'झपाटलेपण' त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसते. स्वत: अल्पसे शिक्षण घेतलेले दादा देगलूर परिसरातील मुलां-मुलींनी संस्कारक्षम उच्च शिक्षण घ्यावे म्हणून धडपडत आहेत.

शिक्षण हा दादांसाठी मुक्तीचा मार्ग आहे. आर्यसमाजाचा प्रचार प्रसार त्यांचा श्वास आहे तर व्यसन मुक्ती हा त्यांचा न संपणारा ध्यास आहे ! म्हणून शिक्षण, आर्यसमाज आणि मुक्ती ही त्यांची त्रिपुटी आहे यानीच दादा नावाचं रसायन तयार झालं आहे.

दादा कुटुंबीयांच्या वाटयाला फारसे येत नाही. ते कुटुंबाचे कमी समाजाचेच जास्त नेहमीच राहिले आहेत ! उपजिविकेची ते फारशी चिंता करत नाहीत. कोणे एके

काळी त्यांनी व्यापार क्षेत्रात पाऊल टाकले होते. कांही काळ त्यांनी आडत दुकान चालविले होते. त्यांचा त्यांना किती लाभ झाला कोण जाणे? त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, माझ्याकडे कामाला असलेली माणसंच पैशानी पुढे मोठी झाली, मी मात्र होतो तिथेच राहिलो. यातच त्यांच्या आर्थिक प्रगतीचा आलेख स्पष्टपणे दिसतो.

असे हे दादा प्रकाशाची परंपरा जिवंत ठेवून वयाच्या शंभरीकडे कूच करीत आहेत. दिसायला चार चौघासारखे असलेले दादा कार्य तेजाने हजार लोकांत उमटून दिसतात. नि:स्वार्थ सेवेसारखा दुसरा यज्ञ जगात नाही. मानव समूहापेक्षा आगळा वेगळा असा देव नाही या विचाराला अनुभवाचे परिमाण देणारे दादा श्रेष्ठ वाटतात. नव्हे ते श्रेष्ठच आहेत.

**प्रा. गणेश मोहरीर**
देगलूर महाविद्यालय, **देगलूर**

***

# सर्वांचे दादा - पोशट्टीदादा

- **डॉ. ब्रम्हमुनि वानप्रस्थी** (डॉ.सु.ब.काले, बीड)

माणसं जन्माला येतात मरून जातात. परंतु जी माणसं केवळ स्वत:साठी न जगता दुसऱ्यासठी समाजासाठी, देशासाठी, राष्ट्रासाठी, विश्वासाठी, मानवमात्रासाठी, प्राणीमात्रासाठी जगतात ती माणसं स्वत:चा एक आदर्श, थोरपण शिल्लक ठेवून जातात आणि ते व्यक्तिमत्व अनेकांना प्रेरणा देत राहते. पोशट्टीदादा हे एक त्यातलेच आहेत. मला शंका आहे की, त्या काळी कोणी जन्मतारीख लिहून सुध्दा ठेवली असेल की नाही. घरची परिस्थिती साधारण असल्यामुळे त्यांचे शिक्षण केवळ ४ थी पर्यंतच झाले. निश्चितच त्यांचे बालपण कष्टात गेले. लहानपनापासूनच व्यायाम, कुस्तीचा नाद होता. प्रकृती उत्तम सांभाळली.

शिक्षण कमी झाले तरी कुशाग बुध्दीमत्ता असल्यामुळे त्यांची विद्वता, विचारशक्ती, चिंतनशक्ती वाढली, आर्यसमाजाच्या संपर्कात लहानपणीच आल्यामुळे त्यांना विद्ववानांचा, सन्यासांचा संग लाभला. आणि ऋषी दयानंद, वेद, उपनिषद, दर्शन, यातील ज्ञान ऐकायला मिळाले. जीवन काय आहे, कशासाठी आहे, हे कळले. कसे जगावे हे कळले. ज्ञान ऐकून त्यांनी ग्रहण केले, आचरणात आणत गेले. स्वत:ला बनवत गेले. नंतर 'सत्यार्थप्रकाश' ऋषी दयानंदाचे बाकीचे ग्रंथ इतर वैदिक सिध्दांतांची पुस्तके वाचायला सुरू केले. विद्वानाची संगत आणि स्वाध्याय आणि त्या आधारावरील आचरण म्हणजेच तप, त्यांचा असा जीवनक्रम सुरू आहे.

**दृढनिश्चय, आत्मविश्वास :-**

वैदिक साहित्यातून सत्य काय कळल्यावर त्यावर चालण्याचा दृढ निश्चय केला. आवतीभोवती सर्व अज्ञानी, अंध:विश्वासू, लोक असतांना देखील सत्यापासून न ढळता योग्य दिशेने वाटचाल करणे हे त्यांच्या आत्मविश्वासाचे लक्षण आहे. वयाच्या साधारणत:१५-१६ व्या वर्षापासून ते आर्यसमाजाच्या सान्निध्यात आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्वावर आर्य समाज वैदिक साहित्य व वैदिक विद्ववत्तेचा प्रभाव आहे.

**एकला चलो ही वृत्ती :-**

आर्यसमाजाचे निष्ठवान कार्यकर्ता म्हणून ते प्रसिध्द आहेत. अनेक स्थित्यंतर आले तरी ते ढळले नाहीत. जीवनभर, तत्त्व सांभाळत **'एकला चलो'** सारखे सतत आर्यसमाजाचे, समाज सेवेचे ते काम करीत राहीले.

**आर्यजगत आणि दादा:-**

आर्यजगतामध्ये दादांनी आदराचे स्थान कमविले आहे. देगलूर म्हटले की, पोशेट्टी दादा आर्यजगताला लक्षात येतातच. १९३१ पासून त्यांनी आर्यसम्मेलनात, महासम्मेलनांत भाग घेतला. सत्याग्रह केला, व्यसन निर्मूलन, शिक्षण प्रसार केला.

**निर्भिड दादा :-**

दादांचा एक आर्यजगत मध्ये दरारा आहे. तसा देगलूर मध्ये त्यांचा खूप दरारा आहे. तो दरारा त्यांचे सत्यवादी न्याय नीतीचे व्यवहार यामूळे आहे. ते सत्य, निती व सर्वांच्या हितासाठी काम करीत असल्यामुळे स्पष्ट, निर्भिड, असतात. त्यांनी आर्यसमाजाच्या माध्यमातून समाज सेवा संस्कार केंद्र, व्यायामशाळा उभ्या केल्या. बाहेरील विद्वान बोलवून व्याख्याने ठेवणे व लोकांना ज्ञान देण्याचे कार्यही आवर्जून केले.

**मानवतावादी सहिष्णूतावादी दादा:-**

आर्यसमाज व वैदिक सिध्दांताचे आकलन झाल्यापासून ते मानवतावादी बनले. वैचारिक परिवर्तन झाल्याशिवाय गत्यंतर नाही व माणूस बदलू शकत नाही. शस्त्राच्या जोरावर भांडण, मारामारी करून कोणाला जिंकता येत नाही. विचार बदलू शकत नाहीत तर उलट वैर, सूडाची भावना जागृत होते. देगलूर आर्यसमाजचे समोर मशिद आहे. दादा कट्टर आर्य समाजी असून, प्रधान असून कधीही त्यांचेशी भांडण होवू दिले नाही. उलट प्रेमाचे संबंध टिकविले. त्यांना गांवातील सर्व जाती, पंथ गोर - गरीब मानतात.

**शिक्षणप्रेमी दादा:-**

स्वत: अनेक अडचणीमुळे शिकू शकले नाहीत. याची खंत त्यांना होती, जाणीव होती व शिक्षणाचे महत्त्व माहीत होते. समाजाला सुधारायचे असेल तर शिक्षण हे एक मूलभूत साधन आहे. म्हणून दादांनी देगलूर मध्ये शिक्षण संस्था काढल्या, त्यात स्वत: हिरीरिने काम केले, संस्था वाढविल्या. परंतु ना त्याचा त्यांनी धंदा केला ना पदासाठी केले. त्यांचा प्रामाणिक उद्देश समाजातील गोर, गरीब, तळगाळातील सर्वांना शिक्षण मिळावे हा होय. सर्वांचे कल्याण व्हावे हा होय. प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाबरोबर उच्च शिक्षणाची सुध्दा सोय दादांनी देगलूर सारख्या ठिकाणी केली.

**न्यायप्रियदादा :-**

आर्यसमाजाच्या सहवासातून दादांचे देशप्रेम, राष्ट्रप्रेम जागृत झाले. आर्यसमाजच्या स्वातंत्र्यासाठीच्या बलिदानाची, त्यागाची जाण होती. त्यातूनच त्यांनी प्रेरणा घेतली. म्हणूनच तर हैद्राबाद मुक्ती संग्रामात, स्वातंत्र्य संग्रामात, गोवा मुक्ति आंदोलनात त्यांनी उडी घेतली. जीवाची, ऐश आरामाची, घरादाराची, कुटुंबाची पर्वा न करता तरुंगवास भोगला, मरण आले तरी हरकत नाही. पण देश स्वतंत्र झाला पाहिजे. हैद्राबाद निजामाच्या जूलमी राजवटीतून मुक्त झाला पाहिजे ही महान भावना होती. स्वत:च भाग घेतला नाही तर अनेकांना प्रेरणा दिली व सत्याग्रहासाठी देगलूर मधून तुकडी नेली.

**समाजसेवीदादा :-**

समाजाच्या दैनंदिन अडचणी ओळखून, रस्ते, नळ योजना, दवाखाना, बाजारपेठ, मोंढा आदी निर्माण करणे, तसेच गरीबांची सेवा पण त्यांच्याकडून अनेक रुपाने झाली आहे.

**राजकारणीदादा :-**

दादांनी राजकारणांत सुध्दा सक्रीय भाग घेतला. पण वैदिक आर्यसमाज सोडून, विसरून नव्हे. काँग्रेसमध्ये ते सक्रीय कार्यकर्ते होते. मा. शंकरराव चव्हाण बरोबर काम केले. परंतु १९८८ पासून ते त्यातूनही निवृत्त झाले. राजकारण संन्यास घेतला. हे त्यांच्या आर्यसमाजी विवेकीवृत्तीचे व त्यागी, संयमी व्यक्तिमत्त्वाचे प्रतिक आहे.

**शांतताप्रेमीदादा :-**

समाजात शांती, सुखव्यवस्था, सुरक्षितता असावी असे मानणारे व आचरणांत आणणारे दादा देगलूरमध्ये हमेशा शांतता कमिटीचे महत्त्वाचे पदाधिकारी असतात. वैयक्तिक प्रभावातून समाजात त्यांचा दरारा आहे. त्यांचा शब्दाला किंमत आहे. म्हणून ते शांतता प्रस्थापित करू शकतात. त्यामुळे देगलूरच्या सांस्कृतिक इतिहासात पंथीय भांडणे झाले नाहीत.

**स्वातंत्र्य सेनानीदादा :-**

स्वत: स्वातंत्र्य सैनिक तर झालेच परंतु लढ्यामध्ये भाग घ्यायला प्रेरणा देऊन त्यांनाही स्वातंत्र्य सैनिक केले. स्वातंत्र्य सैनिकांच्या समस्या सोडविण्यासाठी नांदेड जिल्हा स्वातंत्र्य सैनिक शासकीय गौरव समीतीचे ते ७ वर्ष सदस्य राहीले आणि स्वातंत्र्य सैनिकांची सेवा केली.

**गृहस्थी दादा :-**

दादा चा गृहस्थाश्रम आर्यसमाजी होने के नाते आदर्श रहा. घर एक संस्कार केंद्र के रूप में रहा. अतिथी सत्कार होते रहा. आर्यसमाज के प्रचारक विद्वान आर्य तो उनकी सेवा, भोजन उनके घर होता था. उनकी पत्नी, बच्चे, बच्चीयां सभी सेवा करते है. आज भी ये चालू है.

**श्रेष्ठ जीवन :-**

आर्यसमाज के प्रभाव व प्रेरणा से उन्होंने अपना जीवन आदर्श रखा है. शुध्द शाकाहारी कोई व्यसन नही, दिनचर्या अच्छी, चारित्र्यसंपन्न, निती न्याय, सदाचार, सत्यवादी, स्पष्टवक्ते, धैर्यवान, त्यागी, सबके हितकी भावना, दयावान, विवेकी, ऐसे गुणोंके कारण ही उनका नैतीक दरारा देगलूर और देगलूर परिसर में है.

ऐसा ये बहुमूखी व्यक्तिमत्त्व देगलूरवासीयों को आर्यसमाजने दिया है. उनका व्यक्तिमत्त्व बनाही आर्यसमाज के कारण. बाकी नेता बहुत होते है, लौकीक भी बहुत होता है, काम भी बहुत करते है, पर चारित्र्य, खानपान, निती न्याय, सबके हित की भावना, नि:स्वार्थ

वृत्ती, संयम, सामंजस्य, विवेक, आदी गुणों का अभाव होता है. लेकिन उनका जो नैतिक दरारा है वो अजब है और यह आर्यसमाज के कारणही है.

सभा और आर्यजगत की ओरसे परमात्मासे करते है की, उनको स्वास्थ्य, दीर्घायूष्य, सुख, शांती, आनंद दे और वयोमान के अनुसार वैदिक सिध्दांत के अनुसार विरक्त जीवन, आध्यात्मिक जीवन, पारदर्शिक जीवन जीने की और वो ज्ञान अनुभव वो रास्ता समाज को देने की प्रेरणा, बल देवे.

वो सभी के दादाही कहलावे है. सभी के संरक्षक है.

**डॉ.ब्रम्हमुनि वानप्रस्थी (डॉ.सु.ब.काले)**
मंत्री, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभा, आर्यसमाज, परळी
-(वै.) जि.बीड

***

# गांधी विचारांचे पाईक म्हणजेच दादा

**- श्री बळवंतराव चव्हाण**

पोशट्टीदादा उनग्रतवार आणि माझा संबंध फार जुना असून एक अत्यंत विश्वासू मित्र म्हणून मी त्यांना ओळखतो. मराठी सतांच्या मताप्रमाणे बोले तैसा चाले त्यांची वंदावी पाऊले या वागणारा एक वचनी, अहंकार शून्य, असे व्यक्तिमत्त्व म्हणजेच पोशट्टीदादा उनग्रतवार हे होत.

दादांचे राहणीमान, एकंदरीत विचारसरणी, त्यांचे चालणे, बोलणे यांवर गांधीच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो.

एक खरा स्वातंत्र्य सैनिक म्हणून अनेक सद्गुण त्यांच्यात दिसून येतात. त्यांचा आदर्श सर्वांनी घेतला पाहिजे. आज त्यांच्या प्रयत्नांमुळे देगलूर शहरात आर्य समाज मंदिराची उभारणी झाली आहे. इतकेच नव्हे नांदेड जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासात, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व सहकार क्षेत्रात दादांची वेगळी छाप दिसून येते.

आज नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रगती पथावर असलेले एक आदर्श महाविद्यालय म्हणून देगलूर महाविद्यालय, देगलूर या संस्थेची उभारणी करण्यात दादांचा सिंहाचा वाटा आहे.

अशा व्यक्तिमत्त्वास दीर्घ आयुष्य सुआरोग्य लाभावे यासाठी ईश्वर चरणी प्रार्थना करतो. या गौरव विशेषांकास शुभेच्छा देतो.

**श्री बळवंतराव चव्हाण,**
**नायगाव** जि. नांदेड.

***

# निराधारांचे समर्थ आधार - काका

– प्रा. डॉ. एन.टी. भागवत

जीवनाच्या वाटेवर भरकटत चाललेल्या, रस्ता न सापडलेल्या आधारहीनांना प्रेमाने जवळ बोलावून, त्यांचे सुख दु:ख विचारून घ्यावे, त्याला विश्वासात घेऊन आपलेसे करावे, घासातील घास काढून भुकेलेल्यांची भूक भागवावी, दारिद्रयाच्या आगीत होरपळणाऱ्यांना आपल्या आधाराची शीतलता देऊन त्यांच्यातील आत्मविश्वास जागा करावा आणि स्वत:च्या पायावर उभे राहण्याची प्रेरणा द्यावी. असे महत्पुण्याचे कार्य गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने देगलूरात होत आहे; ते परमपूजनीय पोशट्टीदादा उनग्रतवार अर्थात आमच्या कांकाकडून.

समाजात वावरत असतांना अनेकवेळा समाजमान्य व्यक्तिमत्वाच्या 'कथनी आणि करनी' मधील अंतर दिसून येते. तशा व्यक्तींच्या व्यक्तिमत्वातील दुट्टपीपणा कधी ना कधी समाजापुढे येतो; परंतु 'मृदु सबाह्य नवनीत तैसे सज्ञनाचे चित्त' या उक्तीप्रमाणे व्यक्तीमत्त्व असलेल्या काकांच्या सहवासात असताना मला त्यांच्या 'कथनी आणि करनी' मध्ये कधीच अंतर दिसून आले नाही. काका जे बोलत तेच करीत. आणि जे करायचे आहे, करता येण्यासारखे आहे तेच बोलत.

अशा महान काकांशी माझा संबंध त्यांच्या सुधीर नावाच्या मुलाकडून आला. सध्या तो एल.आय.सी. मध्ये चांगल्या पदावर कार्यरत आहे. आम्ही दोघेजन देगलूर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि वर्गमित्र आहोत. माझ्या घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची. वडिल शेतीला चार पैशाची जोड लगावी आणि आम्हाला शिक्षण घेता यावे म्हणून शेतीसोबतच घर बांधण्याचे काम करीत असत. त्यामुळे प्रपंचासाठीचा खर्च भागत असे.

माझा जन्म पेनूर ता. लोहा येथे १९६३ साली झाला. त्याच वर्षी गावात इयत्ता १० वीचा वर्गदेखील सुरू झाला. १९८० पर्यंत या शाळेतून कुणीही प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झाले नव्हते. १९८० साली दहावी परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा मान मला मिळाला. घरच्या परिस्थितीमुळे माझे शिक्षण अर्धवट राहण्याची मला भिती वाटत होती. आमचे गणिताचे शिक्षण एल.एस. कुलकर्णी अल्लापूरकर (दुर्दैवाने आज हयात नाहीत) मला घेऊन देगलूरला आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या तत्कालीन लाईन गल्लीतील कार्यालयात निवास करून राहिलो. समर्थ वाचनालयात ४० रू. महिण्याने नोकरी करीत शिक्षण घेऊ लागलो. दिवसभर शिक्षण आणि काम केल्यानंतर रात्री अभ्यासासाठी काकांच्या घरी जात असे. अभ्यासासाठी आम्हाला वरच्या मजल्यावरची एक स्वतंत्र खोली देण्यात आली होती. माझे सर्व सण-वार काकांच्या घरीच होत असत. येथेच अभ्यासकरून बारावी उत्तीर्ण झालो काकांच्या सहवासाने, त्यांच्या आशीर्वादाने आणि वेळोवेळी त्यांनी केलेल्या पितृवत मार्गदर्शनाने माझ्या जीवनाला दिशा मिळाली आणि मी लौकिक अर्थाने जीवनात यशस्वी झालो. आज एका महाविद्यालयात हिंदी विषयाचे अध्यापन कार्य करीत आहे.

माझ्या जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या दिवसांमध्ये काकांनी दिलेल्या मायेच्या ऊबेमुळे, प्रेमळ उपदेशामुळे आणि आशीर्वादामुळे मी आज सुखी जीवन जगत आहे. आमच्या सारख्या निराधारांवर सतत मायेची पखरण करणाऱ्या आमच्या काकांना परमेश्वर उदंड आयुष्य देवो हीच प्रार्थना .

प्रा. डॉ. एन.टी. भागवत

***

# देगलूर महाविद्यालयाचे बिंदूत सिंधू पोशट्टीदादा

– प्रा. बी.एन. जाधव

महाविद्यालयाचे अध्यक्ष पोशट्टीदादा उनग्रतवार हे अनेक सामाजिक, शैक्षणिक संस्थांची विविध सन्माननीय पदे आपल्या आयुष्याच्या नव्वदाव्यावर्षीही चिरतारुण्याने भूषवीत आहेत. मनातून वाईट विचारांचे निखालस निर्दलिन झाल्याने माणूस हा प्रसन्न चित्ताच्या स्थैर्यावर चिरयौवनावस्था भोगत असतो. दादांचा असाच अनुभव ते आपल्या बोलण्यातूनही व्यक्त करतात. आर्यसमाजाचे दिलेल्या सत्संगतीच्या आचार संहितेतूनच त्यांच्या प्रसन्न चित्ताचा ठेवा त्यांना लाभल्याचे ते स्वत: जाहीरपणे कबूल करतात.

हे मनमोकळे व्यक्तिमतत्त्व हेही प्रांजळपणे सांगते की, ''आपले शिक्षण जास्त झालेले नाही. पण विद्यार्थ्यांना शिकविण्याऱ्या गुरुजनांच्या सहवासाने मी आनंदी होऊन आपल्याशी बोलण्याचा प्रयत्न करतो.''

सरळ रांगड्या बोलीतून मूल्य जोपासण्याची तळमळ व्यक्त करणारी दादांची भाषणे या सीमात्रयी देगलूर परिसरात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा धावता आलेखच व्यक्त करतात. मी एकोणीसशे नव्वदपासून त्यांची अध्यक्षीय समारोपाची भाषणे आजपर्यंत ऐकत आलोय. त्यांच्या आवाजाला माइकची गरज पडत नाही. त्यांना टाचण काढण्याची गरज नाही. त्यांची रांगडी भाषा त्यांच्या समाजोन्नतीच्या तळमळीचेच ओजस्वीपण प्रकट करीत असल्यामुळे त्यांची मराठी आम्हा लोकांच्या सहवासातून आमच्यामध्ये केव्हा प्रमाणित झाली हे मला गेल्या बारा वर्षात जाणवले नाही. इतके होऊनही ते स्पष्टपणे सांगतात की, ''तुम्हा गुरूजनांच्या सहवासातून मी संस्कारीत होऊन बोलत असतो''. एवढ्या निखळ मनाची, निखळ सद्‌गुण जोपासण्याविषयीची त्यांची तळमळणारी श्रद्धाच आम्हा सर्वांची दिव्यात्वाची प्रचितीदर्शक शक्ती आहे असे वाटते.

मनुष्य जन्माचे ते ध्येयवाक्य सांगतात, ''मी काय घेऊन आलोय, मला काय घेऊन जायचे आहे याचा विचार सर्वांनी करावा'' असे आवर्जून ते सांगतात. तेव्हा आम्ही एवढे एकरुप होतो की त्यांना मुजरा करण्यासाठी आणि दाद देण्यासाठी आमचे हात केव्हाच तयार होतात. भाषणांनंतर त्यांच्या ''ॐशांति।'' या उद्‌गारात विद्यार्थी वर्ग उस्फूर्तपणे आवाज मिळवतो. त्यांच्या प्रतिध्वनी ऐकून दादा म्हणतात'' ठीक आहे. तुम्हाला ओमचा अर्थ सांगतो. पण वेळ मिळाल्यानंतर'' असे सांगून जिज्ञासा वाढवितात. हसत मुद्रेने आशीर्वाद देत आपली जागा घेतात. स्वातंत्र्य सेनानी दादा - आता प्रापंचिक तृप्ती नंतर आपले आयुष्य केवळ महाविद्यालयात आणि सत्संग सेवेतच घालवण्याचा वसा घेतल्याचे स्वत: जाहीरपणे सांगतात. कायावाचामने आमच्या महाविद्यालयासाठी जगणारे दादा आज सर्व प्रियतेच्या उंबरठ्यावर नव्वदाव्यावर्षी उभे आहेत. अनुप जलोटा यांच्या आवाजातून कबीराचा दोहा या ठिकाणी आठवतो,

*'' कबीरा जब हम पैदा हूए जग हसे हम रोये।*
*ऐसी करणी कर चले हम हसे जग रोये॥ ''*

मृत्यूसमयी जगानं रडावं' असे कर्तृत्त्व सर्वांनीच गाजवावं अशी तळमळ व्यक्त करणारे दादा आमचे आजोबा आहेत. कैवारी आहेत. त्यांच्या विषयी लेख लिहिणाऱ्यांची मोठी मैफील आहे. त्यात माझा एक सूर त्यांना सूरत्वदायी ठरो ही अपेक्षा.

ओऽऽम् ! शांति !! शांति !!!
दादांच्या नावातून ....
इंग्रजी अक्षरानुसार पुढील विचार सुचतात.

**P** - Polite, Position, Progress, Personality.
**O** - One in mind, kind, Find
**S** - Sound, Soft, Sure, Self.
**H** - Honour, Higher, Honest, Harvest, head of society.
**A** - Analysis, A one, Ahead.
**TT** - Talent, Talkative, Teaching, Tame. Tactful, Telling, Temerity, Tenable, Thankful.
**I** - Ideal, Increase, Idolize, Illiterate, Imitator, Immediate, Imperial, Imperturbable, Impressive, Incentive, Incite.

– प्रा. जाधव दे. म. देगलूर

# कर्मयोगी 'दादा'

– श्री.बी.एस. भालेकर

मराठीतील प्रथितयश कवी प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी यांची कविता आठवी की नववीला मला होती. त्यामुळे देगलूर या गावाचा महिमा माझ्या बालवयात कवितेमुळे कोरला गेला. नोकरीनिमित्त देगलूर येथे आलो. पोशट्टीदादा स्वातंत्र्यसैनिक व देगलूर महाविद्यालय देगलूर चे अध्यक्ष संस्थापक आहेत. एवढी त्रोटक माहिती झालेली होती. परंतु प्रत्यक्षात पाहिले नव्हते. तो योग २० डिसेंबर १९९८ ला आला. साधना विद्यालयात ''राष्ट्रसंत गाडगेबाबा पुण्यातिथी निमित्ताने कार्यक्रम होता. दादा अध्यक्ष व तांबोळीसर प्रमुख पाहूणे होते. तांबोळी सरांनी गाडगेबाबा यांच्या कार्याचा आपल्या खास शैलीत परिचय करून दिला. त्याचाच धागा पकडून दादा हे कसे देगलूरचे प्रति गाडगेबाबा आहेत यावर दादांनी केलेल्या कार्याचा शब्दगौरव केला.

शेवटी दादा बोलण्यासाठी उभे राहिले. मध्यम उंची, भरभक्कम कमावलेले शरीर, गोल चेहरा, डोक्यावर पांढरीशुभ्र गांधी टोपी नेहरू शर्ट, त्याला भलामोठा खिसा गळ्याभोवती गुडाळलेला लांब रूमाल गुडग्यापर्यंत धोतर, डोळ्याला काळ्या फ्रेमचा चष्मा, हातात धरायची काठी खुर्चीला आधारलेली. चेहऱ्यावर प्रसन्न भाव. ते म्हणाले, ''तांबोळीसर हे मराठीचे प्राध्यापक आहेत त्यांनी माझी तोंडभर स्तुती केली याचे कारण म्हणजे ते आमच्या कॉलेजचे आहेत ह्या थोर संताच्या मानाने मी काहीच काम केलेले नाही. याठिकाणी मी आज जे बोलतो आहे ते केवळ या महापुरुषांच्या विचारामुळे मी काही जास्त शिकलेला नाही. पण संत गाडगेबाबा, शिवाजी महाराज, तुकाराम, ज्ञानेश्वर, डॉ. आंबेडकर, महात्मा फुले यांच्या विचारांने आपण चालले पाहिजे''. मुलांना उद्देशून ''आमचा काळ गेला. आता तुम्हाला शिकण्याच्या सर्व सोयी उपलब्ध आहेत. तेव्हा तुम्ही शिका. खुप शिका मोठ्या नोकऱ्या मिळवा पण एक लक्षात ठेवा ते असे की, तुम्ही 'माणूस' बना''. त्यासाठी (गाडगेबाबाच्या प्रतिमेकडे बोट दाखवित) या राष्ट्रसंताचे विचार आचरणात आणा.

बाप आपल्या मुलांना जसं समजावतो त्यासारख ते बोलत राहिले, कितीतरी वेळ ! बोलण्यात तळमळ होती, कळकळ होती, तगमग होती. यावर्षीपासून अधिक दोन स्तरावर इंजिनिअरींग ग्रुपसाठी 'इलेक्ट्रीक मेंटनंस' हा व्यावसायिक विषय सुरू करावयाचा होता. त्यासाठी मी आणि मुख्याध्यापक वाघमारे साहेब तीन -चारवेळा कॉलेजला जाऊन प्राचार्य व दादांशी चर्चा केली. दादांचे म्हणणं एकच ''आमच्या येथील प्राध्यापकांचे नुकसान होता कामा नये, कारण आधीच बरेच जण तुकड्या अभावि रिकामे आहेत. मी एकटा काहीच निर्णय घेवू शकत नाही. त्यासाठी कमिटीच्या सर्व लोकांना बोलावून, चर्चा करून नंतर कळवितो. तुम्ही राग मानु नका''. कोणतीच बाब न लपविता सरळ त्यांनी सांगुन टाकले. या एक दिड महिन्यात दादांशी बऱ्याचदा भेटण्याचा योग आला.

अभ्यासक्रम नियोजीत वेळेत व्हावा यासाठी मी रविवारी जादा तास घेण्याचे मनात ठरविले. देगलूर कॉलेजला फोन लावला '' प्राचार्य आहेत का ?''

आपण कोण बोलता ! तिकडून आवाज,

मी भालेकर, तंत्र शाळेतून बोलतो !

मग मी कोण ? प्रश्न केला मी क्षणभर बुचकळ्यात पडलो, लगेच बोललो ''दादा...दादा....

अहो पण दादा कोण ?

संस्थेचे अध्यक्ष, पोशट्टीदादा...!

ते तर बाहेर गले.... मला सांगा काय निरोप आहे तो, मी देईन ! दादांना कसं सांगावे म्हणून पाचएक सेंकद विचार केला. तोच पून्हा दादांचा आवाज '' हे बघा भालेकर तुम्ही संकोच बाळगु नका. बोला... मी कशासाठी आहे ? मी प्राचार्यांना देईन तुमचा निरोप.

असं दादांच निर्भेळ निगर्वी वागणं ! काम करणाऱ्यावर प्रचंड विश्वास. सर्वाप्रति आपुलकी, जिव्हाळा प्रेम कामावरची अढळ निष्ठा. लोकसंग्रह करण्याची असीम ओढ. सेवा हाच धर्म मानणारा विलक्षण माणूस ! दिडेक वर्षापूर्वी मुलीला प्रवेश देण्यासाठी म्हणून कॉलेजला गेलो. सकाळी ११ ची वेळ, दादा अधीक्षक कक्षात बसलेले. दादा दिसताच मी नमस्कार केला म्हणाले... कसे काय आहे ?

*मुलीला प्रवेश घ्यायचाय !*

*कितवीला...*

*अकरावीला*

*कुठे आहे मुलगी ....*

*बाहेर आहे !*

*बोलवा इकडे ? मी आवाज दिला.*

*ही माझी मुलगी, दादा !*

*मुलीला प्रश्न ''मी कोण आहे ?*

*''दादा''....तिच्या तोंडातून अस्पष्ट आवाज*


*''हाँ''...... मग मुलीकडे पाहून....*

''तुला काही अडचण असेल.... कोणी पिरेड घेत नसेल तर सरळ मला येवून सांगायच ! मी नसल्यास सरळ प्राचार्य यांना भेटत जा, काय ? आता तुम्ही शिकलं पाहिजे... प्राध्यापक, डॉक्टर बनलं पाहिजे. त्यासाठीच तर माझी धडपड चालू आहे. आणि हो... तुम्हाला काही अडचण आलीच तर भ्यायच कारण नाही. सरळ येऊन सांगायच... बर कां'' ? मुलीन मानेनच होकार दिला.

दादांनी आपली सगळी हयात कॉलेजच्या विकासासाठी खर्च केली. रात्रंदिवस एकच ध्यास... आपले कॉलेज नावारुपास यावं येथून शिकून जाणारी मुले, मुली पुढे जीवनात यशस्वी व्हावीत. उत्तम नागरिक बनून शहराचं, जिल्ह्याचं नांव अग्रेसर करावं. दादांनी स्वत:च्या कल्याणाकडे लक्ष दिले नाही. परंतु शिक्षणाची ज्ञानगंगा खेड्या खेड्यात पोहचविण्याचं महान कार्य हाती घेतले. वय झालं तरी जिद्द कायम आहे. वयाने थकले तरी मनाने दादा तरुण आहेत. कॉलेजच्या कामासाठी आताही पुणे-मुंबई सारख्या ठिकाणी जातात. दिवसभर कॉलेजमध्ये किंवा परिसरामध्ये ते असतात. नवनवीन योजनांची माहिती घेऊन पूर्णत्वाकडे नेण्याचा धडाडीपणा तरुणालाही लाजविणारा आहे. निरोगी शरीरयष्टी आणि सम्यक दृष्टीची देण लाभलेले पोशट्टीदादा दीर्घायुष्यी जगावेत व त्यांचे हातून अशीच सेवा घडावी अशी सदिच्छा व्यक्त करतो.

**श्री.बी.एस. भालेकर**
शासकीय तंत्र प्रशाला, **देगलूर**

***



# स्वातंत्र्य सैनिक पोशट्टीदादा स्वातंत्र्या नंतर ही सैनिकच !

**- एस.जी. चांडोळकर**

सामान्य आणि मागासवर्गीय कुटुंबात जन्म घेऊन असामान्य कर्तबगारी करणाऱ्या व्यक्तींची इतिहास आणि समाज नोंद घेत असतो. अशा नामावलीत आदरणीय श्री. पोशट्टीदादा यांच्या कार्याचे अवलोकन केल्यानंतर त्यांचे नाव फार वरच्या श्रेणीत नमुद करणे क्रमप्राप्त ठरते. कोणत्याही प्रकारची राजकीय आणि शैक्षणिक पार्श्वभूमी नसलेल्या कुटूंबात जन्म घेऊन स्वातंत्र्य लढ्यात दिलेले महत्त्वपूर्ण योगदान आश्चर्यचकीत करणारे आहे. वैयक्तिक स्वार्थाचा विचार न करता देशाभिमानाने प्रेरित होवून स्वत:ला स्वातंत्र्य लढ्यात झोकून देवून प्रदीर्घ काळपर्यंत शिक्षा भोगणे, आणि तदनंतर स्वातंत्र्योत्तर काळात कोणत्याही सत्तेचा मोह न धरता निरलसरपणे शैक्षणिक आणि समाज प्रबोधनाच्या कार्यास वाहून घेणे, हैद्राबाद स्टेट मुक्ती संग्रामानंतर दादांनी गोवा मुक्ती संग्रामात ऊडी घेणे. त्या अनुषंगाने शिक्षा भोगणे हे दादांचे स्वातंत्र्योत्तर कार्य आहे.

श्री पोशट्टी दादांच्या कार्याचे अवलोकन केल्यास असे आढळून येते की, त्यांचे जीवन संपूर्ण विधायक संघर्षासाठी वाहून घेतलेले आहे. ज्या प्रमाणे गंगा, गोदावरी सारख्या नदयामुळे लोकजीवन संपन्न आणि समृद्ध झाले त्या प्रमाणे दादांच्या कार्यामुळे लोकांना स्वातंत्र्य मिळण्यास मदत झाली. आणि त्दनंतरच्या काळात त्यांनी शैक्षणिक व सामाजिक कार्यात सक्रीय योगदान दिल्यामुळे देगलूर परिसरात शिक्षणाचा प्रसार होवून समाज जीवन समृद्ध होण्यास मदत झाली.

दादा जरी स्वत: इयत्ता चौथीच्या पुढे शिकू शकले नसले तरी त्यांच्या शैक्षणिक महाविद्यालयाच्या रूपाने अनेक तरून पदवीधर होवू शकले. देगलूर सारख्या बहुभाषिक परिसरात महाविद्यालयाच्या रूपाने ज्ञानाचे भांडार उपलब्ध करून दिल्याने मराठवाडा, तेलंगणा आणि कर्नाटकातील बहुसंख्य तरुणांना उच्च शिक्षण घेणे शक्य झाले याची आवर्जून नोंद घेणे आवश्यक वाटते. त्यांच्या विचारा समवेतच कृतीतही सुस्पष्टपणा आणि सातत्य असल्याचे आपणास आढळून येईल. कारण मागील चाळीस वर्षा पासून आडत व्यापारी शिक्षण संस्थेचे ते अध्यक्ष असून देगलूर महाविद्यालयाच्या बालपणापासून त्याच्या जडणघडणीपर्यंत दादांचा सिंहाचा वाटा आहे. निव्वळ ओसाड जमिनीवर भव्य असे शैक्षणिक संकूल उभारुन, मराठवाड्यातील अग्रगन्य महाविद्यालय बनविण्यात त्याचे योगदान महत्त्वाचे आहे.

स्वातंत्र्य लढ्यातील कार्य आणि शैक्षणिक कार्य या प्रमाणेच समाज सुधारणेतील कार्याचा या ठिकाणी खास करून उल्लेख करणे, मला गरजेचे वाटते. ज्या आदिवासी जमातीत दादांचा जन्म झाला ती जमात अंधश्रद्धा आणि व्यसनांच्या विळख्यात पूर्णपणे जखडलेली होती. अशाही परिस्थितीत जमातीचे बंध तोडून दादांनी आर्यसमाजी विचार सरणीचा नुसता अंगीकार केला नाही तर, आजतागायत काटेकोरपणे आर्यसमाजी विचार आणि आचारांचे पालन केले. माझ्या मते त्यांच्या या देदीप्यमान यशाचे मुळे या विचारात आणि आचारात समावलेले आहे. या विचारांचा स्वीकार केल्यामूळे त्यांच्या जीवनकार्याला महत्त्वपूर्ण कलाटणी मिळाली असावी असे मला वाटते. आर्य समाजी विचारांचा दादांनी आयुष्यभर प्रचार केला अनेकांना या माध्यमातून व्यसनमुक्त केले व त्यांच्या आयुष्यात अमुलाग्र असा बदल घडवून आणला.

मन्नेरवारलू समाजाचे जिल्हा व राज्य पातळीवरील अध्यक्षपद प्रदीर्घकाळ पर्यंत दादांनी भुषविले आहे. या माध्यमातून सदर समाजाची बांधणी करण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. परिणामत: सद्या जिल्हा पातळीवर आणि राज्य पातळीवर या संस्था सक्षमपणे कार्यरत असून समाज प्रबोधनाचे कार्य समर्थपणे पार पाडीत आहेत.

सहकार क्षेत्रातील दादांच्या कार्याबद्दल फारशी चर्चा होत नाही, परंतु या क्षेत्रातील जाणकार लोकांना

माहीत आहे की कै. आ. जयरामजी अंबेकर यांचे सोबत संचालक या नात्याने जिल्हा सहकारी औद्योगिकरण आणि विकास संस्थेच्या जडणघडीत दादांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचा संचालक पदाच्या काळात जिल्ह्यातच नव्हेतर संपूर्ण महाराष्ट्रात ही एक नावारूपास आलेली सहकारी संस्था होती. सरकार दरबारी संस्थेच्या दबदबा होता आणि शासकीय कामे चालून या संस्थेस मिळत असत. संस्थेने तितक्याच समर्थपणे ती पूर्णत्वास नेली आहेत. म्हणून सद्या सहकाराच्या अडचणीच्या काळात ही संस्थेची कोट्यावधी रूपयाची मालमत्ता शिल्लक आहे. या सार्वजनिक संपत्तीच्या निर्माण कार्याचे श्रेय कै. आ. अंबेकर आणि पोशट्टीदादा यांनी केलेल्या नि:स्पृह सेवेस दिल्यास वावगे होणार नाही.

श्री पोशट्टीदादांच्या शैक्षणिक सामाजिक आणि धार्मिक कार्यात तितक्याच समर्थपणे साथ देणाऱ्या त्यांच्या सोज्वळ पत्नी सौ. सरस्वतीबाई आमच्या काकू विषयी लिहिणे मला महत्त्वाचे वाटते. कारण दादांनी आयुष्यात पैशाला कधीही महत्त्व दिले नाही. शाही परिस्थितीत शेती उत्पन्नातून उत्कृष्टपणे संसार चालविणाऱ्या सौ. काकूचा दादांच्या कार्यावर फार मोठा प्रभाव आहे. किंबहूना सौ. काकूंनी योग्य प्रकारे साथ दिल्यामूळेच दादा विविध क्षेत्रात समर्थपणे कार्य करू शकले असे वाटते.

सैनिकास सातत्याने संघर्ष करावा लागतो किंबहूना सातत्याने संघर्ष करीत राहील्यामुळेच त्यांना सैनिक म्हणून संबोधले जात असावे. तद्वतच स्वातंत्र्य पूर्व काळात स्वातंत्र्य मिळावे म्हणून संघर्ष केला आणि स्वातंत्र्योत्तर काळात शैक्षणिक, सामाजिक आणि सहकारी क्षेत्रात अभूतपूर्व कार्य करून, चळवळीच्या माध्यमातून समाजउत्थानाचे कार्य करण्यासाठी वयाच्या ९० व्या वर्षापर्यंत संघर्ष करीत आहेत. म्हणून ''स्वातंत्र्य सैनिक दादा स्वातंत्र्यानंतरही सैनिकच आहेत'' असे मला वाटते.

श्री पोशट्टीदादा सारखे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, त्यांनी संपूर्ण हयात लोकसेवेसाठी वेचली ते ज्या भूमीत जन्म घेतला ती देगलूरची भूमी धन्य झाली असेच म्हणावे लागेल. दादा आयुष्याची शताब्दी पूर्ण करोत, त्यांच्या हातून असेच लोकोत्तर कार्य घडत राहो, आणि आम्हास दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन मिळत राहो अशी अपेक्षा बाळगतो.

**एस.जी. चांडोळकर,**
**नांदेड.**

***

# आमचे काका श्री पोशट्टीदादा

– प्रा. ई.आर. मठवाले

दादांना सुरवातीला मी पाहिले ते १९६५ मध्ये एका व्यासपीठावर ! जेव्हा पाकिस्तान ने भारतावर हल्ला केला होता. त्या वेळेस माझे वय ११ वर्षाचे असावे. त्यांनी हिन्दीतून केलेले भाषण मला अजूनही आठवते. या सबंध भाषणातून काकांनी पाकिस्तानवर हल्ला केला त्यात एक प्रकारचे राष्ट्रप्रेम ओसंडत होते.

माझे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण देगलूर मध्ये झाले. या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात दादांचे फार मोठे योगदान असल्याचे लोक बोलत असत. दादांचा तो खादीतला पोशाख, तत्त्वनिष्ठ वागणूक, राष्ट्रप्रेम, करारीपणा, सत्यनिष्ठा या संबंधीही येथील लोक आपसात तासन तास बोलत असत. आम्ही मोठ्या तन्मयतेने हे सर्व ऐकत असत.

शालेय जीवनात दादांचे प्रथम सुपुत्र श्री कर्मवीर (नांदेड शहरातील विद्यमान सुप्रसिद्ध डॉक्टर) हे माझे वर्गमित्र. या काळात कर्मवीर यांच्या बरोबर मी त्यांच्या घरी जात असे. घरी गेल्यानंतर दादा आमच्या नजरेला पडत असत.त्यांचे एकंदर व्यक्तिमत्त्व,शिस्त (Discipline) कडकपणा इत्यादी स्वभाव वैशिष्ट्यामुळे त्यांच्या जवळ जाण्याचा योग अद्याप आलेला नव्हता. मात्र याच सुमारास विशिष्ट कामाच्या निमित्ताने माझ्या वडिलांना भेटणे आवश्यक होते. त्यांची पुर्वीपासून ओळख होतीच. वडिलांनी मला सोबत घेवून दादांकडे नेले. साहजिकच माझी ही ओळख झाली. दादा म्हणाले, मी याला नेहमी पाहतो. परंतु तुमचाच हा मुलगा म्हणून माहीत नव्हते. ते मला जवळ बोलावले. पाठीवर हात फिरवत अभ्यास करण्याचा सल्ला देत होते. दादा वडिलांशी बोलत होते. त्या विषयाचे नेमके स्वरुप काय होते ? ते एवढ्या प्रदीर्घ वर्षानंतर मला तर काही आठवत नाही. मात्र एवढे खरे की दादांच्या त्या बोलण्यात जबरदस्त असा रोखठोकपणा 'ना आगे ना पीछे' असे काहीसे चित्र दिसत होते.

१९७० मध्ये माझे महाविद्यालयीन जीवन सुरू झाले.दादांच्याच प्रयत्नाने स्थापन झालेल्या महाविद्यालयात प्रवेश घेतला व त्यांच्याच सहवासात राहण्याचा योग ही आला. पुढे दादांकडे राहूनच बी.ए. पर्यंतचे शिक्षण झाले.

देगलूर शहरात, घरात, तसेच पाहुणे मंडळीत दादांचा प्रचंड असा प्रभाव होता. शिस्तीच्या बाबतीत व ज्ञान मिळवण्याबाबतीत ते नेहमीच कटाक्ष असत. 'बेशीस्त' हा प्रकार त्यांना मुळीच मान्य नव्हता.

मी बी.ए. ला असताना विजयकुमार (दादांचे द्वितीय सुपूत्र), श्री शंकर शेटकर (शेजारी व वर्गमीत्र) व घरातील मुले एकत्र अभ्यास करीत असत. अभ्यासाची ही एक स्वतंत्र खोली होती. एक वेळेस आमच्या कडून एक चूक घडली. शंकर, विजय व मी घरी न सांगताच सीनेमा पाहण्यासाठी नांदेडला गेलोत. अभ्यास रुममध्ये दादा डोकावले असता आम्ही नांदेड ला गेले असल्याचे समजले. आम्ही नांदेडहून परत आल्यानंतर मात्र दादांच्या भरपूर शिव्या खाव्या लागल्या. अर्थात या पाठीमागे 'शिस्त लावावी' हा एवढा एकच हेतू होता. त्या दिवसापासून मात्र न सांगता बाहेर गावीच तर काय पण शेतात किंवा अन्यत्र कुठेही जात असतांना सांगून जावू लागलो.

अशा या आमच्या घरामध्ये संपूर्ण आर्य समाजी वातावरण होते. सकाळी उठल्यानंतर स्नान व त्यानंतर हवन-पुजन-गायत्री मंत्र इत्यादी नियमितपणे होत असते. अर्थातच या सर्व प्रक्रियेमध्ये मी सहभागी असे.

माझे बी.ए. झाल्यानंतर पुढे पुणे विद्यापीठात शिक्षण झाले. त्यानंतर पुर्णा येथे प्राध्यापकी असा हा क्रम झाला. पुर्ण्यात उभी असलेल्या माझ्या या छोट्याशा वास्तुला 'वेद' हे नांव, माझ्या मुलाचे 'वेदप्रकाश' हे नांवही सर्व नामभिधाने घडली ती दादांच्या साक्षीत व त्यांच्या प्रभावामुळेच !

दादांचा एक काळ असा होता की, 'विश्रांती' हा शब्द त्यांच्या कोशात नव्हता. महाविद्यालय, आडत दुकान, अन्य शैक्षणिक संस्था, कॉंग्रेस पक्षाचे कार्य, आर्य समाजाचे कार्य, मार्केट कमीटी, सामाजिक कार्य अशा

कितीतरी वेगवेगळ्या क्षेत्रात ते वावरत होते. काका त्यावेळी रात्री ११ च्या अगोदर घरी येवून विश्रांती घेत असल्याचे कधी आठवत नाही. आज मात्र ते स्वत: होवून अनेक व्यापापासून दूर होवून फक्त महाविद्यालयाकडे आपले संपूर्ण लक्ष केंद्रित केल्याचे दिसते.

दादांचे मराठी बरोबरच हिन्दी भाषेवरही प्रभुत्व आहे. 'हिन्दी' या राष्ट्रभाषेचा त्यांना सार्थ अभिमान आहे. तसेच संस्कृत भाषेवर ही प्रेम आहे. ते अत्यंत चांगल्या प्रकारे तेलगूही बोलतात. यावरुन आपणास असे म्हणता येईल की, राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक असणाऱ्या भाषा या घटकाच्या बाबतीत ते अत्यंत उदारमतवादी असून कोणत्याही अन्य भाषेच्या बाबतीत दुराग्रही नसून राष्ट्रभाषेचा विकास झाला पाहीजे ही त्यांची आग्रही भूमिका आहे.

काकांच्या कार्याची चर्चा करायची म्हणजे तो एक फार मोठा इतिहास होईल. १९४८ ते १९५० च्या दरम्यान जमीनदार आणि जमीन कसणारे, अल्पभूधारक यांच्यात फार मोठा वाद निर्माण झाला होता. दादा अर्थातच गरिबाच्या बाजूने समर्थपणे उभे राहीले व अल्पभूधारकांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केले. या प्रकरणात मोठ्या जमीन दाराकडून दादांना गप्प बसविण्याचा प्रयत्नही झाला. एवढेच नव्हे तर काही आमीश दाखविण्याचाही प्रयत्न झाला. परंतु कोणत्याच आमीशाला बळी न पडता आपले कार्य तडीस नेले व जवळपास २०० गरिबांना जमिनी मिळवून दिल्या. अर्थात हे माझे ऐकीव ज्ञान आहे. १९५१-५२ च्या सुमारास देगलूर शहरात नळ योजना मंजूर करुन आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य दादांचेच होय. तसेच या शहरात मार्केटची स्थापना करण्यात दादांचे फार मोठे योगदान आहे.

दादा असत्याची कास कधीच धरले नाहीत. या अनुषंगाने एक गोष्ट आठवते. सुमारे २५ ते ३० वर्षापुर्वीचा हा काळ असावा. त्यावेळी देगलूर शहरात असलेल्या जीनींगला आग लागून काहीसी नुकसानी झाली होती. 'नुकसानीचा जेवढा मोठा आकडा तेवढा फायदा मालकाला होता'. म्हणून मालक लोक नुकसानीचा हा आकडा वाढविण्याचा प्रयत्न करीत असतात. वाजवीपेक्षा जास्त नुकसान झाल्या संबंधीचा अभिप्राय दादांकडून वदवून घेण्याविषयी संबंधीत लोकांचा प्रयत्न होता. मात्र दादा सत्याचे भोक्ते असल्यामुळे ते कोणत्याही दडपणाला / आमीशाला बळी न पडता नुकसानीचा अचूक अंदाज करुन इन्शुरंस कंपनीचे हजारो रुपये वाचविले.

विद्यार्थ्यांने भरपुर परिश्रम घेतले पाहिजेत, परीक्षेतील त्यांनी मिळविलेले गुण वैध मार्गानी मिळविले असावेत. अन्य कोणत्याही मार्गाचा अवलंब करणे दादांच्या कक्षेत बसणारे नाही. या अनुषंगाने अजून एका घटनेची आठवण होते ती अशी :-

साधारणपणे १९७२ ची गोष्ट असावी. त्यावेळेस विजय मॅट्रीकला ! ऐन परीक्षेच्या काळात म्हणजेच मार्च महिन्यात शहरात एक गुप्त बातमी येवून धडकली, ३० रु. ला एक प्रश्नपत्रिका मिळत आहेत इत्यादी. या बातमीची चर्चा आम्ही मुले सर्वजण गटागटाने करीत होतो. अन्य काही मुलेही अशीच चर्चा जमावाच्या स्वरुपात व दबक्या आवाजात करीत होते. दादा याच वेळेस अचानक बाहेरुन आले. त्यांच्या नजरेला हे सर्व चित्र दिसले व लगेचच आम्हाला बोलावले काहीसे दरडावून ते विचारले की, काय चालले आहे ? मग जी काही बातमी होती ती दादांना सांगावीच लागली. यावर दादा म्हणाले की या सर्व गोष्टी खोट्या असतात, विद्यार्थ्यांने अशा गोष्टीकडे लक्ष देता कामा नये. समजा, अशा प्रकारच्या प्रश्नपत्रिका जरी एखाद्याने मोफतर दिली तरी घेऊ नये, ते आमच्यावर काही रागावले व घराच्या बाहेर न जाण्याची ताकीद दिली. नंतर काही दिवसांनी असे समजले की, कोणी एका समाज कंटकाने ही बोगस शकल लढवुन विद्यार्थ्यांकडून पैसे उकळीत होता म्हणे. हे समजल्यानंतर आम्हा सगळ्यांनाच जाणवले की, जर त्या दिवशी दादा आले नसते तर आम्ही त्या चुकीच्या मार्गावर तर गेलो नसतो ना ? आमची फसवणुक ही झाली असती.

दादांच्या बाबतीत अशा कितीतरी घटना सांगता येतील. त्यांच्या सहवासात कोणाचेही आचरण चांगलेच होणार. दादांचा सहवास म्हणजे साधू-संताचा सहवास, दादांचा सहवास म्हणजे महात्मा गांधीचा सहवास, दादांचा सहवास म्हणजे जयप्रकाश नारायण यांचा सहवास, दादांचा सहवास म्हणजे स्वामी श्रद्धांनन्दाचा सहवास, दादांचा सहवास म्हणजे म. दयानंद सरस्वती यांचा

सहवास. या सहवासाची छाया माझ्यावर ही पडावी असेच प्रत्येकाला वाटू लागले.

दादांचे तत्त्वज्ञान काय होते ? असा जर कोणी प्रश्न विचारला तर ते म्हणतात की मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे. ईश्वर हा सर्वव्यापी असून मनुष्याच्या कर्माची तो पाहणी करीत असतो. म्हणून प्रत्येकाने आपल्या कर्माची जाणीव ठेवून कार्यरत राहणे आवश्यक आहे. ते पुढे म्हणतात की 'वेद' हे सर्वश्रेष्ठ ग्रंथ असून त्याचे अध्ययन प्रत्येकाने केले पाहिजे.


शेवटी दादा असा संदेश देतात की, राष्ट्राचा आधारस्तंभ हे शिक्षक आहेत. म्हणून शिक्षक हा आदर्श असला पाहीजे. सद्यकाळातील काही शिक्षक चुकीच्या मार्गाने जात असल्याबद्दल त्यांना खंत वाटते. गुरुने आपले कर्तव्य नेहमी जोपासले पाहिजे, ही त्यांची भूमिका. ते पुढे म्हणतात की आजचा शिक्षक मेहनत करण्यापासून दूर चालला आहे. त्यांची चैनी व व्यसनी होण्याची प्रवृत्ती राष्ट्राला अत्यंत मारक आहे. म्हणून या प्रवृत्तीपासून शिक्षक दूर राहीला पाहीजे. काही चारित्र्यवान शिक्षकांचा उल्लेख करुन दादा म्हणतात की, सर्वच शिक्षक परिश्रमापासून दूर आहेत असे नाही तर काही शिक्षक खरोखरच चारित्र्यवान, अभ्यासू, चांगले साहित्यिक, चांगली पुस्तके लिहिणारी, शिस्तप्रिय, या गुणांनी युक्त आहेत. स्वत:च्या महाविद्यालयाविषयी बोलतांना ते म्हणतात की, माझ्या महाविद्यालयात मागेही विद्वान प्राध्यापक होते आजही आहेत प्रमाण फक्त वाढत जावेत अशी अपेक्षा ते करतात. शेवटी ते म्हणतात की, शिक्षक सुधारला तर विद्यार्थी सुधारतील, विद्यार्थी सुधारला तर राष्ट्र सुधारेल. म्हणूनच शिक्षक हा ज्ञानवान असला पाहिजे.

मराठवाड्यातील व विशेषत: देगलूर शहरातील सर्व लोक श्री पोशट्टीदादांना अत्यंत प्रेमाने दादाच म्हणतात. म्हणून मी सुद्धा या लेखात 'दादा' म्हणूनच उल्लेख केला आहे. वास्तवत: आम्ही त्यांना 'काका' म्हणतो. ते काहीही असले तरी 'आमचे काका श्री पोशट्टीदादा' असेच म्हणणे अधिक सार्थ वाटते. काकांना दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वराजवळ प्रार्थना.

या महान अशा व्यक्तिमत्त्वाला माझे कोटी कोटी प्रणाम !

**प्रा. ई.आर. मठवाले**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख
श्री गुरू बुद्धिस्वामी महाविद्यालय, **पूर्णा (जं.)**
जिल्हा परभणी.

***



# सन्माननीय पोशट्टी दादा उनग्रतवार नांदेड जिल्ह्यातील एक मातब्बर व्यक्तिमत्त्व

– वि.रा.कोल्हे गुरूजी

नांदेड जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात ज्या काही नामवंत व्यक्ती आहेत त्यात पोशट्टी दादा उनग्रतवार मोडतात. ते स्वातंत्र्य सैनिक तर आहेतच पण स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी जी विधायक कामे करुन जी शैक्षणिक चळवळ देगलूर भागात उभी केली त्याला तोड नाही. दादांचं शिक्षण जेमतेमच आहे परंतु समाज हिताचं कार्य करण्यासाठी पदव्यांच्या शिक्षणाची गरज नाही. शिक्षणाबिना 'शिक्षणमहर्षी' माणूस होऊ शकतो हे दादांच जीवन ज्यांनी जवळून पाहिल त्यांच्या लक्षात येईल. दादांच्या लहापनणी त्यांना जी असमानतेची वागणूक मिळत होती त्यावेळी १०-१२ वर्षाच्या वयाचे दादा पेटून उठत असत. याच वेळी समानतेच्या वागणुकीचे प्रेरक स्व. लक्ष्मणरावजी गोजे, विठ्ठलरावजी महेन्द्रकर यांच्या सहवासात दादा आले आणि बघता बघता दादांचे जीवन उजळून निघाले सनातन वैदिक धर्माची पताका सर्व जगात उंच उंच फडकावणारे स्वामी दयानंदची चळवळ या काळात तुफान वेगात होती. अर्थातया विचाराने दादा भारावून गेले. समानतेचा खरा धर्म त्यांना सापडला. स्वामी दयानंदाच्या विचारांचे एक वलय निर्माण झाले. समानतेच्या वागणूकीचा एक नवा धर्म उदयास येत होता. एक नवा समाज घडत होता. हाच तो आर्य समाज होय. दादांच्या जीवनात अमुलाग्र बदल झाला. स्वत: खादी वापरत, ती स्वत: सूत कताई करुनचन ! याच काळात १९३८ मध्ये उमरी येथे काँग्रेस अधिवेशन झाले. अर्थात दादांनी या आंदोलनात स्वत:ला झोकून दिले. आर्य समाजी दादा काँग्रेसच्या १९४२ च्या लढ्यात (चले जाव लढा) महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली तिरंगा हाती घेवून उतरले. स्वातंत्र्य मिळण्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले त्यात आर्य समाजाचे खूप मोठे योगदान आहे हा इतिहास आहे. पोलिस अॅक्शन पूर्वी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहाचा झंझावत सुरु झाला. निझामांनी रझवीच्या नेतृत्वाखाली रझाकरी संघटना निर्माण करुन दंगे, धोपे सुरु केले. दादा व त्यांचे साथीदार गोपाळ महाराज पाळेकर, बापूराव नाईक, बळीराम सेठ चिद्रावार यांनी तिरंगा फडकावला. दादा व त्यांच्या काही साथीदारांना अटक होवून ६-८ महिने सजा व ५०० रु. दंड व १२ फटक्याची सजा झाली. जनता दबावामुळे फटक्याची सजा अंमलात आली नाही. सुटका होताच दादांनी ग्राम रक्षणासाठी ५० स्वंयसेवकाचे ग्रामरक्षक दल निर्माण केले. लेव्ही भरणे बाबत शेतकऱ्यांना दादा व त्यांच्या सहकार्यानी मदत केली. रझाकारांच्या त्रासा पासून देगलूर शहरास वाचविण्यासाठी ग्रामरक्षक दलासाठी हात बाब निर्मिती दादांनी सुरु केली. ही बातमी रझाकारांनी कळताच दादांना जीवे मारण्याचा कट शिजला हे कळताच दादांनी त्वरीत मुंबई गाठली लगेच भारतीय गृहमंत्री वल्लभभाईनी जनरल चौधरी मार्फत हैद्राबाद राज्यात पोलिस अॅक्शन केली. निझामाने शरणागती पत्करली. हैद्राबाद राज्य भारतीय संघराज्यात समाविष्ठ झाले. दादांच्या जीवणाचे पहिले पर्व संपले.

दादा मुंबईहून देगलूरला परतले. दादांच्या जीवनाचे दूसरे पर्व सुरु झाले. पोलिस अॅक्शन मुळे रझाकारी चळवळ संपली आणि समाज कंटकांनी लोकांना विशेष म्हणजे मुस्लीम गरीब समाज[illegible] त्रास देण्यास सुरुवात केली. अर्थात दादांनी शांतता प्रस्थापित करण्यासाठी आपल्या सहकाऱ्यासह प्रयत्नाची शर्थ करुन शांतता प्रस्थापित केली. आता दादांचे खऱ्या अर्थांनी स्वातंत्र्योत्तर काळात समाज हिताय विधायक कार्य सुरु झाले. स्वातंत्र्य लढ्यात दादांनी काम केल्यामुळे लोकांत आदाराची भावना असल्यामुळे त्यांचेकडे स्थानिक नेतृत्व आपोआप झाले. मार्केट कमेटीवर ते सतत २५ वर्षे सभासद व ७ वर्षे अध्यक्ष म्हणून राहिले या काळात त्यांनी व त्यांच्या सहकार्यांनी नवा मोंढा बनविला. ४० फुट रुंदीचा व २ हजार फुट लांबीचा रस्ता सिमेंट रस्ता बनविला. शेतकरी निवास बांधकाम विहार इत्यादी कामं त्यांनी केली.

महात्मा गांधीचा पुतळा तत्कालीन मुख्यमंत्री बी.किशनराव यांचे हस्ते बसविण्यात आला. नांदेड येथे

स्वामी रामानंद तीर्थ यांच्या मार्गदर्शनाखाली कॉलेज निघाले. त्यात दादांनी आर्थिक मदत जमा करुन दिली. मुलींची शाळा व दवाखाना काढण्यास दादांनी ३ हजार व ५ हजार रुपयांचा आर्थिक निधी उभारला.

देगलूर शहरात कावडीने पाणी आणल्या जात होते. तत्कालीन नगर विकास मंत्री फुलचंद गांधी यांच्या प्रेरणेने शासनास १ लाख रुपयांचा निधी दादांनी उभारला व नगरविकास मंत्री महोदयांनी त्यात ३ लाखाची भर घालून देगलूरी नळ योजना अंमलात आणली.

१९५५ साली गोवा सत्याग्रह अंदोलन सुरू झाले त्यात दादा हणमंतराव पाटील राजूरकर, बाबासाहेब देशपांडे विठ्ठलराव साखरे, बालकिशनराव मदनूर, भूमन्ना धंपलवार मदनूर व इतर शहपूरचे मंडळी यांनी गोवा सरहद्दीत अॅक्शन करून सत्याग्रह केला. परिणामी पोर्तुगीज पोलिसांनी दादा व त्यांच्या सहकाऱ्यांना पकडून खूप मारहाण केली व बॉर्डरवर आणून सोडले यानंतर दादांचे खरे शैक्षणिक कार्य सुरू झाले. स्वातंत्र्योत्तर काळात श्री मनोहररावजी देसाई, श्री आनंदरावजी देसाई या बंधूनी जांब येथे नीतीनिकेतन विदयालयाची १५ ऑक्टो. १९४९ साली स्थापना केली व तीची शाखा देगलूर येथे १९५५ साली काढली व त्या शाखेचे सन्माननीय सभासद होण्याचा बहूमान दादांना मिळाला. श्री.मा.ना. देशपांडे श्री सावकजी दिनशाजी जिह्वा, श्री गोविंदरावजी मदनूरकर श्री भाऊसाहेब देशपांडे बाऱ्हाळीकर, श्री.ना. श्री.उत्पात, श्री. ब.ना. कोल्हापूरकर, श्री.मा.पा.अत्रे श्रीराम महाजन जांबकर या मंडीळीचा मानव्यविकास विद्यालय देगलूर स्थापन करण्यात सिंहाचा वाटा आहे हे नम्रपणे नमूद करू इच्छितो.

१९५८-५९ गाडगे बाबा शिक्षण प्रसारक मंडळाकडून देगलूर येथे दुसरे विदयालय निघाले त्यात दादांना सन्माननीय सभासद होण्याचा बहुमान मिळाला. १९६३ मध्ये दादा व त्यांच्या सहकाऱ्यांनी आडत व्यापारी शिक्षण संस्थेची स्थापना केली व त्यामार्फत कॉलेज सुरू केले १९६७ पासून दादा अध्यक्ष पदी बिनविरोध आहेत. अध्यक्ष दादा व सचिव श्री शंकरराव तोटावार या जोडीने व त्यांच्या सहाकाऱ्यांनी कॉलेजचे बांधकाम उत्तमरित्या करून एक इतिहास निर्माण केला. येथे दादांचे दुसरे पर्व संपले कॉलेज मध्ये हजारो विद्यार्थ्यांची संख्या झाली परंतु खऱ्याअर्थाने गुणवत्ता खालावू लागली शिक्षणास विकृत स्वरूप येऊ लागले दादास हे पाहवले नाही. तत्कालीन प्राचार्य श्री. विनायक राव कठाळे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या विचारांनी दादा व त्यांच्या सन्माननीय कार्यकारिणी सभासदांनी एक महत्वपूर्ण निर्णय घेतला दादाचे हे तिसरे पर्व सुरु झाले तो निर्णय म्हणजे गुणंवत विद्यार्थी निर्माण करणे व कॉपीस बंदी घातली. २८०० विद्यार्थी होते तेथे एकदम १२०० विद्यार्थीच टिकले सतत तीन/चार वर्षे हा उपक्रम राबविला गेला. कांही अध्यापकांना संख्ये अभावी कॉलेज मधून कमी व्हावे लागले. २८०० ची संख्या १२०० वर आली परिणामी बऱ्याच मंडळीनी टीका केली. परंतु गुणवत्तेकडे वळलेले दादा मागे सरकले नाहीत. हळूहळू आता संख्या वाढत आहे पण ती गुणी विद्यार्थ्यांची. कॉपी न करणाऱ्या विद्यार्थ्यांची. आणि हळूहळू 'ज्यांना खरे कॉलेज शिक्षण हवे, त्यांनी देगलूर कॉलेज मध्ये यावे' असे बोलल्या जात आहे. दादांचे वय ८९ वर्षांचे आहेत परंतु गावात असतांना कॉलेजला गेले नाहीत असा दिवस उगवत नाही, मोटार सायकल वरुन अथवा अॅटो मधून ते कॉलेज मध्ये जाऊन ३/४ तास घालवून येतात, आता विद्यार्थी संख्या १८०० चे वर झाली आहे उपस्थिती ९५% आहे आणि निकाल नेहमी ७०% च्यावर असतो. खूप चांगले मार्क घेऊन विद्यार्थी पास होतात. दादांना कोणते ही व्यसन नाही. व्यसनमुक्तीचा प्रसार त्यांनी केला आहे ते म्हणतातया 'वेदका, पढना, पढाना सुनना और सुनाना यह मानव धर्म है'

**वि.रा.कोल्हे गुरूजी**
सचिव
**नीतीनिकेतन शिक्षण संस्था,**
**जांब**
ता. मुखेड, जि. नांदेड.

***

# प्रबोधनातील बहुरंगी व्यक्तिमत्त्व

– एन.एम. देवकत्ते (मु.अ.)

आंध्र, कर्नाटक व महाराष्ट्र यांच्या त्रिवेणी संगमावर सामाजिक, शैक्षणिक व राजकीय प्रबोधन घडवून आणणारे प्रबोधनकार, देगलूर भूमीचे सुपूत्र श्री. पोशट्टी लालन्ना उग्रतवार यांचा जन्म 4 जानेवारी १९१५ रोजी एका सामान्य कुटुंबात झाला. घरची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे कसेबसे त्यांना चौथी पर्यंत शिक्षण घेता आले.

'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' या म्हणी प्रमाणे लहानपणापासूनच सामाजिक कार्याविषयी आस्था त्यांच्या मनात वाढत गेली. वयाच्याआकराव्या वर्षापासूनच बालमनावर संस्कार घडावेत म्हणून 1931 मध्ये आर्य समाजाची दीक्षा घेतली. आर्यसमाजाच्या माध्यमातून बालमनावर संस्कार करण्याचे कार्य व्यक्तीश: दररोज अखंडपणे चालू आहे. समाजातील सामान्य लोकांना न्याय मिळावा म्हणून अन्यायाच्या विरूद्ध संघर्षाची मशाल हातात घेवून सामान्याना त्यांचा हक्क मिळवून देण्यात त्यांच्या सिंहाचा वाटा आहे.

स्वातंत्र्य संग्रामात सक्रिय सहभाग घेऊन गोवा मुक्ती आंदोलन, हैद्राबाद मुक्ती-संग्रामात या लढ्यात देगलूर भागाचे नेतृत्त्व केले. या कार्यात त्यांना करावासाची शिक्षा, दंड-फटक्याची शिक्षा भोगावी लागली. सन १९३६ पासून १९८५ पर्यंत काँग्रेस पक्षाचे क्रियाशील सदस्य म्हणून कार्य केले. १९८६ पासून राजकीय पक्षा पासून ते अलिप्त झाले. उर्वरीत आयुष्यात शैक्षणिक व सामाजिक कार्यात ते रस घेत आहेत.

देगलूर शहरातील व देगलूर परिसरातील स्वातंत्र्य सैनिकांच्या हक्कासाठी सतत संघर्ष करणे, त्यांच्या सुख दु:खात सदैव सहभागी होणे, स्वातंत्र्य सैनिकांच्या मेळाव्याचे आयोजन करणे. इत्यादी कामात पुढाकार घेवून कार्य करण्याची चिकाटी त्यांच्या अंगी आजही जाणवते. गेल्या अनेक वर्षापासून शांतता समितीचे सदस्य या नात्याने शहरात शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न त्यांनी केले. म्हणूनच इ.सन १९९४ मध्ये गणेशोत्सवात जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे हस्ते दिनांक ०८-१०-१९९४ रोजी दादांचा सत्कार करण्यात आला.

विदर्भातील सुप्रसिद्ध संत श्री. गाडगेबाबा यांचा पदस्पर्श त्यांच्या घराला झाला. प्रत्यक्षात ग्राम स्वच्छता करण्याचे सद्‌भाग्य त्यांना लाभले. देगलूर नगरीच्या विकास कार्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. व्यापारी मंडळाच्या सहकार्यातून नळ योजना प्रस्थापित झाली. नवीन मोंढा सुधारणे, बेरोजगारांना काम मिळवून देणे, बेकार युवकांना नोकरी मिळवून देण्याचे त्यांचे प्रयत्न सतत चालू आहेत.

शिक्षणाची गंगा झोपडपट्टी पर्यंत पोहचायला हवी, समाजातील गोरगरीब मुलांना शिक्षण घेता आले पाहिजे यासाठीच नीती निकेतन शिक्षण संस्था, जांब मुखेड तालुक्यात शिक्षणाचा प्रसार करीत आहे. श्री संत गाडगेबाबा शिक्षण संस्था देगलूर स्थापित संस्थेचे सध्या अध्यक्ष आहेत. देगलूर महाविद्यालय, देगलूर. मानव्य विकास विद्यालय, देगलूर या तिन्ही ठिकाणी ते अध्यक्ष म्हणून कार्य करीत आहेत. देगलूर महाविद्यालयाचे गेल्या ४० वर्षापासून अध्यक्ष या नात्याने महाविद्यालयाच्या विकासासाठी अथक् प्रयत्न चालू आहेत.

आज वयाची ८१ वर्षे गाठली पण त्यांचे कार्य अखंडपणे चालू आहे. शांत, मनमिळाऊ वृत्ती, कार्याची जाणीव, तळमळ, आपुलकी, जिज्ञासा, तत्परता, तेजस्विता मनाची तयारी या विविध गुणामुळेच ते आज जनमानसाच्या हृदयात आदराचे स्थान बनले आहेत. अशा या समाजसुधारकास दीर्घ आयुष्य लाभो असेच कार्य त्यांच्या हातून घडत राहो हीच ईश्वर चरणी प्रार्थना

**एन.एम. देवकत्ते (मु.अ.)**
नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालय,
तमलूर ता. देगलूर
जि. नांदेड- ४३१७१७

***

# शिक्षण क्षेत्रातील कर्मयोगी पोशट्टीदादा

- प्रा.ता.भ. पवार

देगलूर शहरात दादांचे शिक्षण प्रसाराचे कार्य गेल्या अनेक वर्षापासून चालू आहे. साधना शाळेचे अध्यक्षपद, मानव्य विकास शाळेत पदाधिकारी व देगलूर महाविद्यालयाच्या अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, अशी त्यांच्यावर जबाबदारी आहे. देगलूर तालुक्यातील ग्रामीण भागात त्यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य केलेले आहे. मानवी जीवनात सुसंस्काराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आजचा बाल हा उद्याचा आपल्या देशाचा क्रियाशील व कर्तृत्ववान नागरीक आहे म्हणून देशाचा प्रत्येक नागरीक हा समता बंधूता, स्वातंत्र्य आणि एकात्मता जपणारा, सुज्ञ, चारित्र्यसंपन्न आणि राष्ट्रभिमानी नागरीक बनला पाहिजे, हेच ध्येय उराशी बाळगून दादांनी शिक्षण क्षेत्रात प्रवेश केला. शिक्षणातून राष्ट्रभक्ती, चांगले विचार-आचार याची सुसंगती साधली पाहिजे अशी त्यांची भूमिका आहे.

दादा महाविद्यालयाच्या विकासासाठी सकाळपासून संध्याकाळपर्यंत महाविद्यालयाच्या परिसरात उभे राहून अथक परिश्रम करताना दिसतात, त्यांच्या या कार्यात सद्गुण, सद्भावना, सर्वधर्मसमभाव, समता, बंधूता आदी जीवनमूल्यांची प्रचिती येते. दादा स्वत: जास्त शिकेलेले नसूनही ज्ञान हे इतरांना मिळावे, जीवनात ज्ञानाशिवाय आनंद नाही, अशी ज्ञानाची महती त्यांना पटली आहे. त्यामुळे ते अधिक ज्ञान अधिक आनंद, अधिक अज्ञान अधिक दु:ख हा उन्नत जीवनाचा मूलमंत्र दुसऱ्यांना सांगतात. इतरांनी शिकले पाहिजे, ज्ञान ग्रहण केले पाहिजे अशी त्यांची सदैव धडपड चालू असते. कठोर परिश्रम हीच यशाची गुरुकिल्ली आहे हे दादांच्या राहणीमानावरून दिसून येते.

महाविद्यालय हे उच्च शिक्षणाचे माहेर घर आहे, इथेच उदात्त ध्येयाची शिकवण दिली जाते, स्वतंत्र विचार करुन संशोधन कार्यास इतरांना उद्युक्त करणे, चारित्र्य संगोपन, सामाजिक जाणीव फुलविणे व जीवनावश्यक मूल्य संपादीत करणे हे महाविद्यालयाचे उदात्त ध्येय आहे आणि याकडे दादांचे सतत लक्ष असते. ते नेहमी महाविद्यालयातच्या कोणत्याही कार्यक्रमात याचा उल्लेख करतात. त्यांचा सहज बोलण्यातूनही याची जाणीव होते.

अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे दादा हे अध्यक्ष असल्यामुळे ते संघनायकासारखे आहेत. संस्थाचालक-प्राचार्य-अध्यापक-कर्मचारी-विद्यार्थी यांना सोबत घेऊन ते त्यांना सतत प्रोत्साहित करतात. म्हणून त्यांचे नेतृत्त्व हे निस्वार्थी, नि:पक्षपाती असल्याचे जाणवते.

सामान्य कुटूंबात जन्माला आलेल्या दादांचे व्यक्तिमत्त्व अनेकांनी अनुभवले आहे. ते खऱ्या अर्थाने देगलूर महाविद्यालयाचे कर्मयोगी आहेत. त्यांच्याकडे पहिल्यानंतर त्यांच्या तृप्त मनाचे व टवटवीत जगण्याचे कुतूहल वाटते. हीच मनस्विता घेऊन वयाची ४७ वर्षे ओलांडली आहेत. अनेक इतर संस्थामधील पदाधिकारी क्षुद्र बाबतीत गुरफटताना पाहूनही त्यांची चांगुलपणावरील श्रद्धा कधी ढळली नाही.

हा मनाचा ताजेपणा नि टवटवीतपणा त्यांच्या ८९ वर्षाच्या प्रवासात इतरांनी प्रेरणा घेण्याइतका प्रबळ ठरावा. अशी सदिच्छा व्यक्त करुन त्यांचा कार्याच्या चरणी ऋण व्यक्त करतो.

**प्रा.ता.भ. पवार**
पर्यवेक्षक,
देगलूर महाविद्यालय, **देगलूर.**

***

# दादांविषंयी ...

– प्रा. सि.डी. चिद्रावार

श्री पोशट्टीदादा यांच्या सहीवरून त्यांच्या नावात खालील अर्थ समावले आहे असे दिसते.

इंग्रजी अक्षरावरून त्यांच्या नावातील त्यांच्या अंगी खालील गुण असून शकतात असे वाटते.

| | | |
|---|---|---|
| **P** - | Power - | सत्ता |
| **O** - | Organizer - | संघटना करणारे (संघटक) |
| **S** - | Success - | यशं संपादन करणारे |
| **H** - | Humanity - | माकणुसकी असणारे |
| **E** - | Equality - | समानतेची वागणूक देणारे |
| **T** - | Thinker - | विचारवंत |
| **T** - | Timing - | वेळेप्रमाणे वागणारे |
| **I** - | Individual - | वैयक्तीक संपर्क ठेवणारे |

अशा व्यक्तिमत्त्वास आपण पोशट्टीदादा म्हणतो 'दादा' चा अर्थ असा होतो की, जो देतो तो दादा. जो आपल्याला ज्ञान, प्रेम, करूणा, प्रसन्नता, सहकार्य व शांती सदैव देतच राहील त्याला दादा म्हणतात. प्रत्येकाला वाटते नावात काय आहे. नावावून त्या व्यक्तीची समजाला ओळख होत असते म्हणून स्वतःच्या नावाच्या प्रसिद्धीसाठी लोक आग्रह धरतात. स्वतःच्या नावासाठी स्वतः कार्य करावे लागते, हे ही तिकेच खरे. व्यक्ती क्षुल्लक असो की मोठी असो त्यांच्या अंगी एक संघशक्ती निर्माण करण्याची ताकद आहे. त्यांच्या स्वभावात इतराना एकत्र आणण्याची कला असल्यामुळे त्यांच्या जीवनाला गती मिळाली, एकत्र रहाणे म्हणजे प्रगती व एकत्र कार्य करणे म्हणजे उन्नती. आजपर्यंत त्यांनी आडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्षपद भुषणावह केले आहे.

या शैक्षणिक संस्थेची प्रतिष्ठा ही तेथील दगड विटा आणि इमारतीची भव्यता यावरच केवळ अवलंबून नसून तेथे काम करणऱ्या लोकांच्या ज्ञान कार्याच्या उंचीवर आहे. एक माणूस काहीही करू शकत नाही, पण निरिनराळ्या व्यक्ती, शिक्षाणाची, कलेची, सहकार्याची, कार्य करणारे, विश्वासाची माणसे एकत्र आल्यास यश चांगल्याप्रकारे मिळते.

जगात दोनच गोष्टी विश्वासाच्या आधारावर चालतात. ती म्हणजे प्रेम आणि मैत्री. यात जर विश्वासच डगमगला तर दोन्हीही टिकत नाहीत. आत्मा आणि परमात्मा यांचे जसे नाते असते तसे महाविद्यालय आणि दादा यांचे जिव्हाळ्याचे नाते दिसून येते. हे नाते ऐक्याचे आहे. माणूस जीवनाची मूल्य विसरत चालला आहे. नीतिमूल्यांचा अभाव असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात अशांती दिसून येते. विद्यार्थ्यांचे भावी जीवन, शिक्षणाने, नीतिमूल्याने, पुढे कसे नेता येईल यावर ते नेहमी मार्गदर्शन करीत असतात. महाविद्यालयाचा, समाजाचा, विद्यार्थ्यांचा व सहकार्याचा विकास करण्यामध्ये सिंहाचा वाटा आहे. आचार आणि विचार यांचा संगम त्यांच्यात दिसून येतो.

माणसं अनेक असतात पण दादांसारखा 'माणूस' दुर्मिळ असतो. त्यांचे पुढील जीवन, सुखी, समाधानी, व समृद्धीचे जावो हीच शुभेच्छा !

**प्रा.सी.डी. चिद्रावार**
वनस्पतीशास्त्र विभाग,
देगलूर महाविद्यालय,
**देगलूर**

***

# एक निस्पृह निगर्वी - सेनानी

**- डॉ. हसंराज बाहेती**

श्री पोशट्टीदादा यांचा पचिरय १९७१ साली देगलूरला मी जेव्हा शिक्षणासाठी गेलो तेव्हा झाला.

पांढराशुभ्र खादीचा वेष परिधान केलेले हातात छत्री घेऊन पायी रोज कॉलेज कडे येणारे दादा मला अजूनही आठवतात. त्याच्याबद्दल मुलांमध्ये व सर्व लोकांत इतका आदर होता की त्यांना पाहताच सर्व आपापल्या जागी थांबून जात व त्यांना पुढे जाण्याचा मार्ग देत असत घरा पासून कॉलेज पर्यंत त्यांना एक हात सतत नमस्कार स्वीकारण्यासाठी वर ठेवावा लागे.

ते स्वत: कट्टर आर्यसमाजी विचाराचे असल्याने व आमचे सर्व कुटुंब कार्यसमाजी असल्याने दोन्ही कुटुंबाचे संबंध घनिष्ट होत गेले.

स्वातंत्र्य-संग्रामा मध्ये पंडित नरेंद्रजी यांच्या प्रेरणेने त्यांनी उडी घेतली गोवा मुक्तिलढ्यातही ते लढले स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोक सुजाण झाले पाहिजेत तरच स्वातंत्र्याला अर्थ उरेल हे जाणून त्यांनी शिक्षण संस्था स्थापनेसाठी प्रयत्न केले. व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन काढलेली ही आगळी-वेगळी संस्था महाराष्ट्रात भूषण ठरली आहे. आपल्या आमदानीतून थोडा वाटा शिक्षण संस्था उभी करण्यात देऊन देगलूरच्या व्यापाऱ्यांनी देशात नवा पायंडा घालून दिला. संस्थेची स्थापना करणारे दादा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री गणपतराव पाटील मुजळगेकरानंतर अध्यक्ष झाले ते आजातागायत त्याच पदावर कायम आहेत.

४ थी पर्यंत शिक्षण झालेले दादा इतक्या मोठ्या शिक्षण संस्थेचे अध्यक्षपद भूषवतात. दर तीन वर्षांनी संस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये बिनविरोध निवडले जातात हे आजच्या वातावरणात एक मोठे आश्चर्यच मानावे लागते. त्यांच्या अंगी त्यांनी जोपासलेला सगळ्यात मोठा गुण म्हणजे निस्पृह वृत्ती व त्याही पेक्षा मोठी बाब म्हणजे त्यांनी आपल्या अंहकाराला दिलेली मुठमाती.

सार्वजनिक जीवनात काम करताना जनहीतासाठी चर्चा, वाटाघाटी आणि तडजोड यांना सुसंस्कृत व शांतताप्रिय माणसाच्या जीवनात आज महत्त्वाचे स्थान आहे हे त्यांनी जाणले आहे.

वाईटाला शिव्या-शाप देत बसण्यापेक्षा सक्रिय राहून चांगलं निर्माण करावं, अंधारावर राग करून बोटं मोडत बसण्यापेक्षा चांगुलपण जोपासून दिवा पेटवावा या त्यांच्या वृत्तीतच त्यांच्या यशाचं गमक आहे. त्यांच हे स्वयंभू, कुशल नेतृत्त्व येणाऱ्या पिढीसाठी दिपस्थंबाच काम करणार आहे.

चांगल्या गोष्टीचा पुरस्कार करताना संघटीत वाईट वृत्तीच्या लोकांकडून प्रतारणा होतच असते ती त्यांनी शांतपणे सहन केली. व अत्यंत संयमी वृत्तीने वाईट प्रवृत्तीच्या लोकांना प्रेमाचा अनेस्थेशिया देऊन त्यांची यशस्वी ऑपरेशनही केली.

दादांनी आजपावेतो खांद्यावर घेतलेला आर्यसमाजचा झेंडा खाली ठेवला नाही, वाईटांपुढे ते कधी झुकले नाहीत, तत्त्वनिष्ठ वृत्तीला कधी तडा जाऊ दिला नाही. दादांशी बोलताना त्यांच्या डोळ्यात जी वेदना मला जाणवते ती ही की आता हा माझ्या खांद्यावरचा झेंडा मी कोणाच्या हाती देऊ ? हा प्रश्न केवळ दादांचाच नाही तर अशी वृत्ती जपणाऱ्या अनेकांचा आहे. याच उत्तर समाजाला शोधावं लागणार आहे.

पूज्य दादासाहेब आपण शतायुषी व्हावं, आपलं मार्गदर्शन, आपले आशीर्वाद आम्हाला मिळावेत हीच सदिच्छा!

**डॉ. हसंराज बाहेती**
लातूर

***

# एक सुविद्य व्यक्तिमत्त्व

– प्रा. डॉ. शरदचंद्र एकनाथमहाराज

शतकत्रयाचा कर्ता भर्तृहरीने संस्कृतमधील त्यांच्या 'नीतिशतक' नावाच्या काव्यग्रंथात मनुष्याच्या जीवनाचे काही स्तर सांगितले आहेत. त्यात तो म्हणतो की, माणसांत अनेक लोक असे असतात की जे विनाकारणच परहितामध्ये विघ्न आणतात, काही लोक स्वार्थासाठी परहितात बाधा निर्माण करतात; परंतु थोर सत्प्रवृत्तीचे लोक मात्र स्वार्थाचा त्याग करुनही परहिताविषयीच सतत दक्ष असतात. मनुष्याने अशा काही उदात्त हेतूने जीवन जगले पाहिजे तरच ते जीवन सत्काराला किंवा गौरवाला पात्र होते.ज्यांच्या गौरवाचे आयोजन होत आहे ते श्री पोशट्टीदादा हे असेच सतत परहितामध्ये दक्ष असलेले गृहस्थ आहेत, ही गोष्ट, त्यांच्या जीवनातून ज्या कांही लोकांनी आपली जीवनयात्रा सावरली-सांभाळली गेली; म्हणून कृतज्ञता व्यक्त केली, त्यावरुन मला प्रकर्षाने जाणवली.

व्यक्तिश: माझा आणि श्री. दादा यांचा संबंध सुरवातीस तरी बराच औपचारिक स्वरुपाचा होता. परंतु जेव्हा त्यांना मी श्रीसंतगुंडामहाराजांच्या वंशातील आणि वै. एकनाथमहाराज यांचा मुलगा आहे, असे परिचयातून वारंवार होणाऱ्या भेटीगाठीतून कळाले, तेव्हा ते संबंध जिव्हाळ्याचे व आपुलकीचे बनले. जुन्या आठणींना उजाळा मिळत गेला. आणि माझ्या जन्मापूर्वी अनेक वर्षे त्यांचे आमच्या घराण्यातील लोकांशी कसे आत्मीयतेचे संबंध होते, ते त्यांनी वारंवार मला सांगितले. ज्या देगलूर महाविद्यालयाचे ते अध्यक्ष आहेत त्याच महाविद्यालयात मी संपूर्ण पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतले या शैक्षणिक कालखंडात ज्या ज्या वेळी त्यांचा व माझा संबंध येत असे, भेटीचा योग महाविद्यालयात व अन्यत्रही येत असे, त्यावेळी ते मला अत्यंत आदराने वागवीत असत.

त्यांनी स्वत: औपचारिक शिक्षण अत्यल्प घेतले आहे. असे असूनही, त्यांना जे मी अनुभवले आहे, त्यावरुन मला असे म्हणावे वाटते की, ते सुशिक्षित आहेत. विद्या ही जर मानवी जीवनाचे साफल्य साध्य करण्यासाठी आहे, तर ते त्यांनी प्राप्त करुन घेतलेच आहे. एक सुभाषितकार म्हणतो की विद्या सुविद्या झाली तरच ती उपकारक असते, अन्यथा ती घातक ठरते. विद्या, धन आणि शक्ती यांचा उपयोग जो ज्ञानविस्तार, दानविस्तार व संरक्षण यांसाठी करतो, तोच खरा सुशिक्षित. श्री पोशट्टीदादा यांनी स्वत: शिक्षणसंस्था निर्मितीमध्ये सिंहाचा वाटा उचलून ज्ञानविस्ताराचे कार्य केले आहे. अनेक गरजू विद्यार्थ्यांच्या आर्थिक गरजांची पूर्तता यथाशक्य करून दानविस्तारही केला आहे; आणि स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी होऊन संरक्षणाचे राष्ट्रीय कार्यही पूर्वीच यथाबल पार पाडलेले आहे. यादृष्टीने विद्या, धन व शक्तीचा 'ज्ञानाय दानाय च रक्षणाय' असा त्रिविध उपयोग जो खऱ्या सुशिक्षिताने करावा, तो त्यांनी केलेला असल्यामुळे, ते खरे सुविद्यही आहेत.

माझ्या दृष्टीने श्री पोशट्टीदादा यांनी लौकिक स्वार्थ फारसा जोपासला नाही. स्वार्थत्यागपूर्वक ते महाविद्यालयाच्या कामकाजात तसेच आर्यसमाजासारख्या धार्मिक चळवळीमध्ये सहभागी झालेले दिसतात. त्यांया वयाच्या मानाने त्यांना जी आरोग्यसंपदा लाभलेली आहे, तिचेही रहस्य सांगून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व सहवासात आलेल्या प्रत्येकालाच ते आरोग्यशास्त्राचे पाठ देत असतात. त्यांच्या बोलण्यामध्ये मैत्रीचा स्नेह आणि सहानुभूतीचा ओलावा सतत जाणवतो. त्यामुळे त्यांचे मार्गदर्शन- मग ते आरोग्य विषयक असो की इतर कोणत्याही विषयाचे - 'परोपदेशेपांडित्य' वाटत नाही. ते अनुभवातून बोलतात त्यामुळे त्या बोलण्याला भाषेच्या व्याकराणिक बंधनाची तमा नसली तरी कसून कमावलेली सहानुभूती असल्यामुळे त्याती अंतरंगाचे सहज आकलन होते.

त्यांच्यासारखी निर्व्याज प्रेमळ, अंत:करणाने मोकळी, नीतिमान व्यक्ती माझ्या महाविद्यालयीन जीवनात मला लाभली, हा एक व्यावहारिक लाभच. नंतरही आजपर्यंत ती आत्मीयता व तो स्नेह कायम आहे. श्री पोशट्टीदादा यांना या गौरवांकाच्या निमित्ताने अनेकानेक शुभेच्छा देऊन, लेखणीस विराम देतो.

**प्रा. डॉ शरदचंद्र एकनाथमहाराज देगलूरकर**

***

# एक सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व

**– श्री बी. के. गुजे (गुरुजी)**

दादांच्या बालमनावर आईवडिलाचे, समाजाचे झालेले संस्कार, गुंडा महाराजाच्या मठातील संतसेवेचे संस्कार आणि आर्य समाजाच्या माध्यमातून महर्षी दयानंद सरस्वतीच्या विचारांचा झालेला संस्कार यामुळेच हे ऋषीतुल्य निरागस अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आकारास आले.

माणूस आपल्या आचरणाने नराचा नारायण बनू शकतो. यासाठी हवी असते दुसऱ्या बद्दलची आपुलकीची भावना. माणसाच्या नात्याने माणुसकीच्या रूपात ती उमटावी लागते. फुलवावी लागते. दुसऱ्याबद्दल प्रेम असल्याखेरीज अशी आपुलकी निर्माणच होऊ शकत नाही.

दु:खीयाचे दु:ख जावो। ही मनाची कामना
वेदना जाणावयाला। जागवू संवदेना

या संताच्या वचनाप्रमाणे दु:खीतांचे दु:ख निवारण करण्यात आयुष्य घालवत आहेत. असे निर्मळ सुस्वभावी मदतीचा हात देणारे, दुसऱ्याच्या सदैव उपयोगी पडणारे, शैक्षणिक, सामाजिक, शेतकरी, व्यापारी अनाथ दिनदुबळयांची, पिडीतांची, मागासवर्गीयांची, निराधाराची जाण असणारे, त्यापरीने सतत कार्यरत असणारे, श्रीसंत गाडगेबाबाच्यांवर अमाप निष्ठा असणारे, त्यांच्या विचारांचा वसा घेऊन कार्य करीत असलेले, ओम् शांती शांती या मंत्राचा उच्चार करणारे ''आता उरलो उपकारा पुरता'' या तत्त्वाचा अंगीकार करणारे सर्वांचे आवडते दादा यांना दीर्घायुष्य लाभो !

**– श्री बी. के. गुजे (गुरुजी)**
साधना विद्यालय,
**देगलूर.**

# माझ्या जीवनातील काकांचे स्थान

**– सौ. एस.पी. उनग्रतवार**

कुठेतरी वाचल्याचे आठवते की, एखाद्या स्त्रीला बालपणी तिचे वडील सांभाळतात, तारुण्यात पतीकडून तिचे रक्षण होते आणि म्हातारपणात मुले तिची सेवा करतात. असे एकूण स्त्रीचे जीवन असते हा सर्व समान्य स्त्रियांच्या बद्दलचा विचार असला, तरी माझ्या बाबतीत मात्र मला असे म्हणावे वाटते, की बालपणापासून आजपर्यंत आदरणीय तीर्थरूप कांकानी मला सांभाळले आहे.

घरतील मी एकुलती एक बाईलेक. आमच्या घरातील काकांच्या वाढता जनसंपर्क. अनेकांचे त्यांच्या कडे येणे जाणे, हे सर्व असूनही काकांनी माझ्याकडे कधी दुर्लक्ष होऊ दिले नाही. अत्यंत लाडात वाढविले. काका त्यांच्या जीवनात प्रतिकुल परिस्थितीमुळे अधिक शिक्षण घेऊ शकले नाही परंतु त्यांच्या जवळ एक चांगली शैक्षणिक दृष्टी आहे. त्यामुळे त्यांनी मला व माझ्या सर्व भावांना शिक्षण दिले शिक्षण देऊन स्वत: च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न केला. आज मी जीवनात उभी आहे ती केवळ काकांनी दिलेल्या शिदोरीच्या बळावरच सांसारिक जीवनात निर्माण झालेल्या एक वादळातून मी स्वत: ला सावरू शकले ते केवळ कांकाच्या आशीर्वादामुळेच. त्यांनी माझ्यात निर्माण केलेल्या आत्मविश्वासामुळे मी सुखी आहे.

आपला मायेचा हात सदैव पाठीवर ठेवणारे आमचे काका हे अनेक गरजुंच्या बाबतीतही परोपकाराची भुमिका ठेवून अतिशय आपुलकीने वागतात. त्यांच्या मायेची पाखर सदैव आमच्यावर राहावी हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

*॥ जिवेत शरद: शतम्॥*

**सौ. एस.पी. उनग्रतवार**

***

# 'पोशट्टीदादा एक असामान्य व्यक्तिमत्त्व'

– प्रा. किशन पाटील

भारताच्या स्वातंत्र्याला रक्ताचे नैवध्य दाखवून स्वातंत्र्य मिळवून आणणाऱ्यापैकी एक व्यक्ति म्हणजे मा. पोशट्टीदादा उनग्रतवार. लहानपणी शिक्षणपासून वंचित राहून, संस्कारमय असणाऱ्या व्यक्तीच्या सहवासात राहून, स्वत: संस्कारमय होऊन, समाजाला दिशा देणाऱ्यांपैकी एक व्यक्ती म्हणून ओळखले जाणारे व सर्वांना 'दादा' या नावाने परिचीत असणारे असे हे व्यक्तिमत्त्व बहुआयामी आहे.

आज या महाविद्यालयात वेगवेगळ्या प्रकारचे अभ्यासक्रम राबविले जात आहेत. अशा महाविद्यालयाचे अध्यक्ष म्हणून 'दादा' जवळपास २० वर्षापासून कार्यरत आहेत. दादांचा कॉलेजशी इतका जवळचा संबंध आहे की, आज देगलूर महाविद्यालयाचे नांव घेतले की, सर्वप्रथम 'दादांचे' नाव घेतले जाते.

दादा नेहमीच महाविद्यालयात उपस्थित असतात. त्यामूळे प्रत्येक बाबीवर दादांचे बारीक लक्ष असते. आज कोणत्याही कार्यक्रमात बोलत असतांना असे वाटत नाही की, दादा शिकलेले नाहीत. ते वेळोवेळी कार्यक्रमात विद्यार्थ्यांना नेहमीच मार्गदर्शन करतात. चूका झाल्यास रागावतात. पण त्यांचा राग समजण्यासारखा असतो. दादांना वनस्पतीबद्दल भरपूर ज्ञान आहे. 'कावीळ' या रोगावर त्यांच्याकडे इलाज होतो. ते नेहमी सांगतात की, डॉक्टराकडे पैसे खर्च करण्यापेक्षा 'कावीळ' या रोगाचे रोगी माझ्याकडे पाठवून द्या. मी वनस्पती औषध देऊन त्यांचा कावीळ हा रोग बरा करतो. मी अशा रोग्यापासून एकही पैसा घेणार नाही. आज कावीळ या रोगाचे रोगी नेहमीसाठी दादांचे नाव घेतात.

मला दादांचे निर्भिड बोलणे फार आवडते. कर्मच्याऱ्यांच्या चुकांबद्दल प्रखरपणे बोलतात. त्या चूकांची दखल घेण्यास भाग पाडतात. विशेष म्हणजे दादांना 'भ्रष्टाचारा' बद्दल फारच चीड आहे. ते भाषणातून बोलताना सांगतात की, मोठ्मोठे राजकीय पुढारी, शासकीय अधिकारी, पदाधिकारी गरीब समाजांकडून सर्रास पैसे घेतात व समाजाची पिळवणूक करतात. त्यामुळे सर्वप्रथम मोठमोठ्या लोकांनी स्वत: चांगले वागले पाहिजे. तर त्यांना समाजात बोलण्याचा अधिकारी राहील. विशेषत: कामचुकार लोकाबद्दल दादांना फार राग येतो.

माणसाने पैशाच्या पाठीमागे न लागता माणसाला देव समजून त्याची पूजा करावी, सेवा करावी. देव दगडात नसून व्यक्तित आहे. म्हणून मानवाची सेवा केले पाहिजे. व्यक्तिसोबत पैसा येत नसून फक्त त्याचे 'लौकिक' येते. म्हणून समाजाची सेवा करावी. असे ते नेहमी सांगतात.

अशा दादांना माझ्या हार्दिक शुभेच्छा!

**प्रा. किशन पाटील**
देगलूर महाविद्यालय, देगलूर

***

# मा. पोशट्टी दादा-एक अष्टपैलू व्यक्तिमत्व...

**- प्रा. येरगीकर आर. के**

श्री पोशट्टी दादांच्या जीवनातील केलेल्या कार्यावरून व आचरणावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू दिसून येतात. स्वत:साठी न जगता इतरांसाठी जगणे समाजासाठी अहोरात्र प्रयत्न करणे हा त्यांच्या व्यक्तित्त्वाचा स्थायी भाव आहे.

**देशप्रेमी दादा :-**

देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठीच्या प्रयत्नात त्यांनी झेंडा वंदन केला म्हणून दीड बर्षाची सजा व बारा फटक्याची सजा सुनावली गेली. हैद्राबाद मुक्तिसंग्रामात १९४६ ते १९४८ मध्ये स्वंयसेवकाचे पथक निर्माण करून या परिसरातील जनसामान्यांना अहोरात्र संरक्षण दिले. बिचकुंदा येथे स्व. लक्ष्मणराव गोजे यांच्या मार्गदर्शनाखाली हातबॉम्ब तयार केले. "गोवा मुक्ती अंदोलनात " सन १९५५ साली देगलूरहून पहिल्या तुकडीबरोबर सहभाग. तिरंगा ध्वज पेडंनमहाल येथे फडकवला तेव्हा सालजार पोलिसाकडून जबर मारहाण झाली, त्यांचे डोके फुटले. (२ सप्टेंबर १९४६) कुटुंबाची व जीवाची पर्वा न करता देशाला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, हैद्राबाद निजामाच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाला पाहिजे ही भावना होती. त्यांनी स्वत:च भाग न घेता इतरांनाही प्रवृत्त केले.

**न्यायप्रिय दादा :-**

अन्यायाविरूध्द लढा देणे त्यांच्यातील अनुवंशिक गुण असल्यासमुळे देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढले पुढे राजकीय, धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात याच तत्त्वाचे अनुकरण करून न्यायप्रिय जीवन जगत आहेत व इतरांना न्यायमिळवून देत आहेत.

**माणसात परमेश्वर शोधणारे दादा :-**

१९३१ पासून आजपर्यंत ते आर्यसमाजाच्या विद्वान कार्यकर्त्यांच्या सहवासामुळे व ऋषी दयानंदाचे आदर्श जीवन चरित्र डोळयापुढे ठेवल्यामुळे ''सत्यार्थप्रकाश'' व इतर वैदिक साहित्याच्या श्रवण पठनामुळे माणसातील माणूसपणाचा साक्षात्कार झाला. मूर्तीत परमेश्वर नसून प्रत्येक मानवात परमेश्वर शोधला पाहिजे अशी दादांची धारणा आहे. हे दादांच्या बोलण्यातून नेहमी जाणवते.

**चारित्र्य संपन्न दादा :-**

देगलूर बाजार समितीचे पंचवीस वर्ष सदस्य आणि सात वर्ष बाजार समितीचे सभापती पद भुषविले. सन १९७० ते १९८५ पर्यंत अखिलभारतीय मन्नेरवारलू समाज संघटनेचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष व जिल्हा अध्यक्ष म्हणून कार्य केले. सन १९३६ पासून ते १९८९ पर्यंत कांग्रेस पक्षाचे क्रियाशील सदस्य नीतिनिकेतन शिक्षण संस्थेचे सदस्य, संत गाडगेबाबा शिक्षण संस्था सदस्य व सध्या अध्यक्ष, अडतव्यापारी शिक्षण संस्थेचे देगलूर महाविद्यालय, देगलूर अध्यक्ष पदावर गेल्या ४० वर्षापासून आहेत.

दादा सदाचारी असून चारित्र्यवान व्यक्ती त्यांना आवडतात. प्रत्येक क्षेत्रात नि:स्वार्थ भावनेने त्यांनी कार्य केलेले आहे. भ्रष्टाचार अप्रामाणिकपणा, स्वार्थ यांना आळा घालण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. व करत आहेत. स्वत: निर्व्यसनी असून अनेक व्यक्तींना व्यसनमुक्त करण्याचा ते प्रयत्न करीत असतात. त्यांच्या या जीवन चरित्राचा आदर्श चालू व भावी पिढींना प्रेरणादायी ठरणार आहे.

**शिक्षण प्रेमी दादा :-**

दादांची घरची परिस्थिती साधारण असल्यामुळे त्यांचे शिक्षण केवळ ४ थी पर्यंत झाले पुढील शिक्षण ते घेऊ शकले नाहीत यांची त्यांना खंत होती या भागातील अनेक गोरगरीब लोकांना शिक्षण घेता यावे म्हणून या भागातील अनेक महत्त्वाच्या व्यक्तींना एकत्रित आणून शैक्षणिक संस्थेच्या विकासासाठी ते अहोरात्र प्रयत्नशील आहेत. सतत शैक्षणिक संस्थेशी संबंध, अनेक विद्वानाचा सहवास यामुळे दादाच्या व्यक्तिमत्वात अनेक विषयाचे चिंतन आहे याची जाणी होते. दादांचे एक पुत्र डॉ. कर्मवीर हे एम.डी. (डॉक्टर) आहेत. दादा देगलूर महाविद्यालयाशी एवढे एकरूप झालेले आहेत की, मृत्युनंतर माझ्या देहाची राख गंगेत न सोडता महाविद्यालयाच्या परिसरातील

वृक्षांना टाकण्यात यावी, अशी इच्छा दादांनी भाषणातून व्यक्त केली आहे. केवढी तळमळ या विधानात दिसून येते.

**लोकशाही मूल्यांची जाणीव ठेवणारे दादा :-**

१९३६ ते १९८९ पर्यंत काँग्रेस पक्षाचे क्रियाशील सदस्य म्हणून काम करी त असतांना ते एक निष्ठतेने त्यांनी केले आहे. दादांची अनेक काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्याशी जवळीक निर्माण झालेली होती. त्यात स्थानिक पातळीवरील त्याकाळातील आमदार कै. गोविंदराव पाटील झरीकर हे होते. दादा व झरीकर जणू एकाच नाण्याचे दोन बाजू आहेत अशी प्रतिमा तयार झालेली होती. मा. शंकररावजी चव्हाणाचे अत्यंत विश्वासू कार्यकर्ते म्हणून कार्य केलेले आहेत. इंग्रज आणि निजाम यांच्या हुकुमशाहीतून समाजाला बाहेर काढल्यानंतर अज्ञान जनतेला लोकशाहीच्या मूलतत्त्वाचे शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात जाणीव करून देऊन त्यांनी लोकशाही मूल्यांची जपवणूक केलेली आहेत. अडत व्यापारी शिक्षण संस्थेत काम करीत असतांना विरोधी पक्षात असलेले कै. नारायण सेठ चिद्रावार व दादा यांच्यात सहकार्य, सामंजस्य व एकमेकावर दृढ विश्वास हे उदाहरण म्हणून सांगता येईल. स्त्रियांना समानतेचा अधिकाराची जाणीव करूण देण्याचा प्रयत्न दादांनी केलेला आहे. दादाच्या गृहस्थी जीवनाकडे पाहिल्यास घरातील स्त्रियांना आदाराने वागणे, समानतेचा अधिकार, स्त्री शिक्षण, आर्य संस्कार इत्यादी मुळे, दादांचे घर एक मंदिर आहे, असे वाटते.

**जनहितकारी दादा :-**

जनतेच्या कल्याणासाठी दारू बंदी संघटक या नात्याने व्यसनमुक्त करण्यासाठी तळमळीने कार्य केले. देगलूरच्या विकासात मोंढा, बाजारपेठा, नळ दवाखाना, रस्ते इत्यादी प्रमुख उदाहरणे म्हणून सांगता येईल. माणूस मोठा झाल्यानंतर व्यक्तिमत्त्वात परिवर्तन घडवून आणते. कठीण असते म्हणून बालकावर आर्यसमाज माध्यमातून चांगले संस्कार घडविण्याचे ते कार्य करत आहेत. भावीपिढी आदर्श व्यक्तिमत्वाचे असवी, यासाठी प्रयत्नशील आहेत.

**शांतिप्रिय दादा:-**

देगलूर मध्ये शांतती, सुरक्षितता लाभावी म्हणून शांतता समितीत त्यांचे कार्य मोलाचे आहे. गणेशोत्सवात शांतता प्रस्थापित केल्यामुळे जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्याहस्ते दिनांक ०८-१०-१९९४ रोजी सत्कार करण्यात आला. उर्वरित आयुष्य शैक्षणिक व समाजकार्यासाठी वाहून घ्यावयाचे ठरूवन त्या पध्दतीने कार्यरत आहेत. आर्य समाजाचे प्रमुख कार्यकर्ते आहेत. अनेक विद्वान ऋषी-मुनी, आचार्याशी जवळीक, संबंध, सहवास, वैदिक सिध्दांताचे श्रवण, मनन, आचारण व संसारांतील विरक्ती यामुळे सध्या दादांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव इतरावर पडत आहे. आपुलकीने, प्रेमाने त्यांच्या सहवांसात गेल्यास अशांत माणसाना सुध्दा मानसिक शांती लाभते.

**द्वेषरहित दादा :-**

त्यांच्या सोबतचे अनेक व्यक्ती शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक इत्यादी बाबतीत अतिशय प्रगती पथावर गेले तेव्हा दादाना त्यांच्याबद्ल आदरच होता. त्यांच्या बदल मत्सर, द्वेष जाणवला नाही. हे त्यांच्या आचरणातून स्पष्ट होते. मात्र दादा अन्याय, अत्याचार असत्य, भ्रष्टाचार, अनीती, व्यसन विरोधी आहेत. हे दुर्गुण व्यक्तीत असू नयेत ही त्यांची मनापासून तळमळ असते. हया बाबी पूर्वग्रहविरहित सूक्ष्म निरीक्षण केल्यास त्यांच्या व्यक्तिमत्त्वात स्पष्ट दिसून येतात. दादांचा द्वेष करणे म्हणजे अज्ञान होय.

**मानवतावादी दादा:-**

आर्यसमाज व वैदिक सिध्दांत याचे आकलनामुळे अनेक थोर व्यक्तींचा सहवास सत्संग इत्यादी अनेक कारणामुळे दादांचे वैचारिक परिवर्तन झालेले आहेत. मन्नेरवारलू समाज संघटनेचे कार्यकर्ते या नात्याने अनेक पात्र व्यक्तिना नोकरी मिळवून दिलेली आहे. समाजातील योग्य व पात्रा व्यक्तींच्या सतत पाठीशी राहीले. व राहत आहेत. मात्र अयोग्य व अपात्र व्यक्ती जरी जवळचा असला तरी त्यांच्या विरोधात ते असतात विविध क्षेत्रातील त्यांच्या कार्यात धर्म, जातीपेक्षा मानवता वादी विचारसरणीला प्राधान्य दादांनी दिल्यामुळे सर्व जातीधर्माच्या लोकांना दादा प्रिय वाटतात.

**अध्यात्म-प्रेमी दादा:-**

दादांच्या विचाराची परीपक्वता दृढविश्वास, निर्भीड, आत्मविश्वास ईश्वर प्रेम, सदाचार, सात्विक आहार, सत्संग इत्यादी मुळे संत जीवनाशी जवळीक साधत चालले आहेत, असे दिसून येते. स्वत:च्या जीवनात कांही चूक झाले असल्यास, ते खूल्या अंत:करणाने प्रगट करणे, चांगले कर्म केल्यास चांगले फळ मिळते, वाईट कर्म केल्यास त्याचे फळ वाईटच राहणार अध्यात्म जीवन जगण्याच्या प्रेरणेतूनच देगलूर मध्ये भव्य अशा आर्यसमाज मंदिराची उभारणी केलेली आहे. चालूपिढी त्याचा लाभा घेत आहे. भावी पिढीसाठी ते एक वरदानच आहे. दादानी आपल्या भाषणातून मृत्युनंतर नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे. प्रत्यक्ष जीवन संन्यास पध्दतीने जगणे, त्यांच्यातील पारदर्शक जीवन दया, क्षमा इत्यादी अनेक बाबी के अध्यात्म प्रेमी असल्याचे स्पष्ट होते.

वरील विविध पैलूंचा (गुणांचा) अभ्यास केल्यास दादांचे व्यक्तित्त्व हे असामान्य आहे. जणू असे वाटते की, परमेश्वरांनी विशेष अशा आत्म्यास शरीरात पाठवून देगलूरच्या परिसरात त्यांच्याकडून विविध कार्य करून घेत आहे. दादांच्या या विविध अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा आदर्श आजच्या व भावी पिढीस अत्यंत उपयुक्त व मोलाचे ठरणार आहे.

**प्रा. येरगीकर आर. के**
देगलूर महाविद्यालय,
**देगलूर**

***

# ध्येयवादाने भारावलेले अजोड व्यक्तिमत्त्व
# स्वा.सै.पोशट्टीदादा उनग्रतवार

- प्रा.बा.रा. कणत्तुरवार

पोशट्टीदादा म्हणजे देगलूरमधीलच नव्हे तर संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील सर्व परिचित असे व्यक्तिमत्त्व होय. कारण नांदेड जिल्ह्याच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आरोग्य, साहित्य, पर्यावरण विषयक अशा सर्वच चळवळीत दादांचा सहभाग दिसून येतो. लहानापासून ते थोरापर्यंत सर्वांना हवाहवासा वाटणारा प्रत्येकाच्या सुखदु:खामध्ये सहभागी होणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे पोशट्टीदादा होत. यांना ४ जानेवारी २००३ रोजी ८९ वर्षे पूर्ण होऊन ९० व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. त्यानिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देण्याचा माझा प्रयत्न आहे.

पोशट्टीदादांचा जन्म अतिशय गरीब कुटुंबात स्वातंत्र्यपूर्व काळात झाला. बालपणात मनात शिकण्याची जिद्द असताना देखील गरिबीमुळे प्रतिकूल परिस्थितीमुळे केवळ इयत्ता ४ थीपर्यंतचे शिक्षण घेता आले. परंतु युवा अवस्थेत आर्य समाजाची दीक्षा घेतल्यामुळे आर्य समाजाच्या संस्कारामुळे आणि विद्वान लोकांच्या सहवासातून दादांच्या जीवनाला दिशा मिळत गेली. पुढे तरूण अवस्थेमध्ये हैद्राबाद मुक्तीसंग्रामात स्वामी रामानंद तीर्थांच्या नेतृत्त्वाखाली स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली. त्या काळात पोशट्टीदादा प्रत्येक चळवळीत अग्रेसर होते. परिणामी ६ महिन्यांच्या कारावासाची शिक्षा आणि ५०० रूपये दंड ही शिक्षा सुद्धा त्यांना भोगावी लागली आणि विशेष महत्त्वाची बाब म्हणजे त्या काळात दादांनी मातृभूमीला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी हातबाँब तयार करण्याचे तंत्र बिचकुंदा येथील लक्ष्मणरावजी गोजे यांच्याकडून अवगत केले. ही गोष्ट रजाकारांना समजताच दादांना जिवे मारण्याचा कट त्यांनी रचिला पण भूमिगत राहून हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या लढ्यात प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सहकार्य केले.

१९३८ ला उमरी येथे महाराष्ट्र परिषदेच्या मेळाव्यात दादांचा सक्रिय सहभाग होता. या परिषदेचे पुढे रूपांतर हैद्राबाद स्टेट काँग्रेसमध्ये झाले. त्यामुळे काँग्रेस पक्षात देखील दादांना महत्त्व प्राप्त झाले. त्या काळात शंकरराव चव्हाणांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दादांना एकदा काँग्रेस पक्षाने तिकीट नाकारले तेव्हा लोकांनी दादांवरील अन्यायाविरूद्ध मोर्चा काढला पण दादांनी याबाबत कांही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही उलट सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यामध्ये आपल्या जीवाला झोकून दिले. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने दारूबंदी संघटक म्हणून दादांची नियुक्ती केली. परंतु दारूबंदी खात्यातीलच अधिकारी दारू पित असल्याचे दृश्य पाहिल्यामुळे त्वरीत आपल्या पदाचा राजीनामा दिला आणि १९६३ साली आडत व्यापारी शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात पुढाकार घेतला. प्रारंभी या शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून तर वर्तमान काळात अध्यक्ष म्हणून कार्य करीत आहेत.

ग्रामीण भागातील तरूणांना संधी मिळावी म्हणून तरूणांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक, नैतिक असा सर्वांगिण विकास व्हावा म्हणून दादा महाविद्यालयासाठी पूर्ण वेळ देतात. देगलूर महाविद्यालयातून बाहेर पडणारी युवा पिढी ज्ञान व संस्काराच्या उभ्या आडव्या धाग्यादोऱ्यांनी विणलेली असावी, यासाठी आपल्या सहकार्यासह अहोरात्र प्रयत्न करतात.

विशेष म्हणजे जेव्हा जेव्हा देगलूर परिसरात शैक्षणिक सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम होतात तेंव्हा कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान दादांकडेच असते आणि अध्यक्षीय समारोपात दादा नहमी सांगतात की, मी म्हणजे रेडिमेड अध्यक्ष आहे. प्रत्येकजण मला बोलावतो, माझा आदर करतात. म्हणून मी अध्यक्षपद स्वीकारतो यातून दादांच्या बोलण्यातील मोकळेपणा दिसून येते. दादांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आपल्या शिक्षण संस्थेतील विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक आणि संस्थाचालक यांच्यात पारिवारिक संबंध निर्माण केले आहेत.

दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनी न विसरता दादा सर्व शिक्षक, प्राध्यापकांचा सत्कार करतात. विद्यार्थी हेच प्राध्यापकांचे खरे दैवत आहे. त्यासाठी प्रत्येकाने झिजले पाहिजे याची जाणीव करून देतात.

दादांकडे पाहिल्यानंतर प्रत्येक तरूणाला एक प्रकारची प्रेरणा, स्फूर्ती मिळत असते. कारण त्यांचे चालणे, बोलणे, चारित्र्य आणि एकंदरीत वर्तन पाहता वयाच्या आज मितीला सुद्धा देखील आजच्या तरूणाला लाजवेल इतका उत्साह त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसून येते. अशा पोशट्टीदादांना दीर्घायुरारोग्य लाभावे अशी प्रार्थना करून त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा देतो.

**प्रा.बा.रा. कत्तुरवार**
लोकप्रशासन विभाग
देगलूर महाविद्यालय, **देगलूर**

***

**प्रा.व्ही.जी. चिंतावार**
(शहापूरकर)
'' **पुण्याई** '' देशपांडे गल्ली,
देगलूर - ४३१ ७१७
जि. नांदेड (महाराष्ट्र)

---

आदरणीय दादांसाठी .............

आयुरस्मै धेहि जातवेद : प्रजां त्वष्टरधिनिधेह्यस्मै ।
रायस्पोषं सवितरा सुवास्मै शतं जीवाति शदरस्तवायम् ।

अथर्व ०२/२९/२

हे ज्ञान देणाऱ्या देवा ! यांना दीर्घायुष्य दे,
हे रचनाकर्त्या देवा यांना धन आणि पुष्टी दे,
तुझा बनून यांना शतायुषी होवू दे.

**संकलन** : श्री. व्ही. जी. चिंतावार
वाणिज्य विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर

# पोशट्टी दादा

**– गंगाधर पांचारे भायगावकर**

देगलूरच्या शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक चळवळीच्या संदर्भात ज्या ज्या वेळी आढावा घेतला जाईल, इतिहासाची पाने चाळली जातील, तेंव्हा देगलूरच्या जडण घडणीच्या श्रेयनामावलीत श्री. पोशट्टीदादा उनग्रतवार यांचे नावे अग्रगण्य राहील. एका शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या पोशट्टी दादांचे शालेय शिक्षण जरी चौथ्या इयत्ते पर्यंत झाली तरी त्यांच्या परिपूर्ण सफल व सुफल जीवनाचा पट उलगडला तर त्यांच्या यशस्वीपणाची जाणीव होवु लागते.

१९१५ साली जन्मलेल्या पोशट्टी दादांनी आपल्या संपूर्ण जीवनपटांत संमग्र संघर्षाची भुमिका घेतली. १९३१ साली त्यांनी आपल्या सामाजीक जिवनाची सुरवात आर्य समाजाच्या कार्यातून केली. महर्षि दयानंद सरस्वती यांच्या तत्वविचार प्रणालाचे अधिष्ठान आपल्या कार्याला देऊन पोशट्टी दादांनी खऱ्या अर्थाने आपले आयुष्य अन्याय, जातीभेद, वर्ण भेद, निरक्षरता, यांच्या विरोधांत वेचले. राष्ट्रभक्ती व देशभक्तीची प्रखर निष्ठा उराशी बाळगुन तत्कालीन सत्ताधिशाविरोधाच्या बंडात अग्रणी राहील. स्वातंत्र्यापूर्वी १९४६ साली तिरंगी झेंडा फडकावण्यावरून दोन वेळा जबर सक्तीची शिक्षा भोगली. अत्यल्प शेती धारक कुणब्यांच्या बळकावलेल्या जमीनी, संघर्ष करून जमीनदारांच्या घशातून सोडवून दोनशे गरीबांना मालकी हकू मिळवून दिला. यानंतर स्वातंत्र्यप्राप्ती पर्यंत २ वर्षे अविरत जुलमी राजवटी विरोधांत कधी भुमिगत, कधी उघड पणे चळवळी उभारल्या. संघटना स्थापना केली. बिचंकुदा येथे तर बॉम्ब तयार केले.

स्वांतत्र्योत्तर काळांत मात्र त्यांनी कॉंग्रेस पक्षाच्या व्यासपीठावरून शंकररावजी चव्हाण यांचे नेतृत्वाखाली सक्रीय राजकीय कार्यात सहभाग दिला. अशा कार्यकत्यांपैकी पोशट्टीदादा एक होते. १९८८ सालांपासून राजकीय वैचारिक मतभेदातून राजकीय संन्यास घेतला व शैक्षणिक आणि सामाजिक चळवळीत आपले कार्य केले. देगलूरच्या शैक्षणिक परिवर्तनात पोशट्टीदादांचा सिंहाचा वाटा आहे. देगलूर महाविद्यालय मानव्यविकास विद्यालय, संत गाडगेबाबा शिक्षण प्रसारक मंडळ या तीनही दिग्गज शिक्षणसंस्था पोशट्टी दादांच्या आदर्श वैचारिक मंथनातून निघालेली रत्ने आहेत.

या तीन शिक्षणसंस्थांनी देगलूर तालूक्यातील शिक्षणक्षेत्रात मोठीच क्रांती केला आहे. हजारो विद्यार्थी या ज्ञानपीठांतुन विद्या घेऊन विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्त्वाने देगलूरचे नाव सुवर्णमय केले आहे. केवळ चौथी पास असलेल्या पोशट्टीदादांच्या दूरदृष्टीमुळे आज महाविद्यालयातून संगणकाचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी अमेरिकेसारख्या देशांत किर्ती मिळवली आहे. पोशट्टीदादांचे मोठेपण यांत आहे. तोतया भिकुसा यमासाच्या तोतयेगिरीला एक आव्हान समजून त्यांनी जिद्दीने, १९६१ मध्ये देगलूर महाविद्यालयाची स्थापना केली. गेल्या चाळीस वर्षापासून या संस्थेचे अध्यक्षपद ते भुषवीत आहेत. ज्ञानसंवर्धना ची एवढी प्रदिघ कारकिर्द अपावादात्मक दृष्टीस पडते.

निकोप शरीरयष्टीला निकोप मनाची जोड असल्याने, पेशट्टीदादांनी ज्या चळवळीत सहभाग दिला, त्याचे सोने झाले. शुध्द अंत:करण व डोळस धार्मिक विचारांचे अधिष्ठान यामुळे पोशट्टीदादांच्या रांगडया भाषेतले मार्गदर्शन व शिकवण अंत:करणात खोल रूजते. तरूणपिढी व्यसनमुक्त असावी, व सदृढ - धडधाकट नौजवान हे एक त्यांचे स्वप्न आहे. त्यामुळे, एकादा तंबाख चघळणारा, उच्चपदस्थ अधिकारी असो वा आपल्या महाविद्यालयांतील, विद्यार्थी असौ, त्यांना आपल्या एवडया व स्पष्ट शब्दांत ते खडसावल्या शिवाय राहात नाहीत. 'आधी केले व मग सांगीतले' या उक्तीनुसार त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यांत व्यसनाच्या आहारी कधी गेले नाहीत. म्हणूनच पोशट्टीदादांनी सांगीतलेल्या चार हितकारक उपदेशाला 'बोले तैसा चाले' या प्रमाणे वंदनीय महत्व येते.

आज पोशट्टीदादा नव्वदाव्या वर्षाच्या उबरठयावर आहेत. जीवनाची या प्रदिर्घ काळांतील सामाजीक,

राजकीय, शैक्षणिक स्थित्यंतरे त्यांनी अनुभवली आहेत. पण पोशट्टीदादांनी आपल्या जीवनांच्या ८९ वर्षातील प्रत्येक वर्ष आदर्शाचा एक मानंदड समजून त्यांनी मागे टाकले व नव्यावर्षात प्रवेश केला. थकणे, मरगळणे, निरूत्साह होणे, नैराश्य येणे, या सारख्या शारीरीक व मानसीक प्रक्रीयोंना त्यांच्या शब्द कोषांत स्थान नाही. दरवाढ दिवसाला उत्साहाची उर्जा अधिकप्रखर करत पोशट्टीदादांनी वयाची एक-एक वर्षे मागे टाकली, पण त्या उर्जेतून मनाची उर्मी अधिक प्रबढ होत गेली. आजही पोशट्टीदादांना पाहिले तर आबलवृध्दांना ते समवयस्क वाटतात हा खरा तर चमत्कारच आहे. २० वर्षाची एक पिढी, या हिशेबाप्रमाणे, आपल्या आयुष्यांत त्यांनी चार पिढयांना सतत मार्गदर्शन केले. भर समुद्रांत अंधाऱ्या वादळाना तोड देत अभाग्यांना आशेचा किनारा दाखवणाऱ्या दिपस्तंभा प्रमाणे पोशट्टीदादांनी आपल्या आयुष्यात संकटे झेलली, संघर्ष केला, पण स्थितप्रज्ञता सोडली नाही. दादांनी लौकिकदृष्टया काय कमावले, काय गमावले, यापेक्षा सामाजिक क्षेत्रांत त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा चिरतनठसा उमेटेवला हे महत्वाचे आहे. त्यांना प्रदिर्घ असे आयुरारोग्य मिळे ही सदिच्छा परमेश्वर चरणी व्यक्त करतो.

**– गंगाधर पांचारे भायगावकर**
सचिव,
शिक्षक व शिक्षकेतर
कर्मचारी पत संस्था
देगलूर महाविद्यालय

***

# थोर समाज सेवक, श्री पोशट्टी दादा

शिवाजीराव बोधगीरे



दिप स्तंभा प्रमाणे आम्हाला मार्गदर्शन करणारे श्री पोशट्टीदादा हे थोर समाजसेवक असल्याचे त्यांच्या कार्यानेच सिध्द झालेले आहे. ४ जानेवारी १९१५ रोजी दादांचा जन्म एक मागसवर्गीय कुटुंबात झाला असला आणि त्या वेळच्या बिकट परिस्थीती मुळे त्यांना फारशे शिक्षण घेता आले नसले तरिही त्यांची ज्ञान मिळविण्याची प्रगाढ लालसा आणि त्यानुषंगाने त्यांचे कडून देगलूर महाविद्यालयाचा झालेला सर्वांगीन विकास त्यांच्या समाज सेवेची पावती देणारा आहे.

देगलूर परिसरात त्यांनी शिक्षण प्रसारासाठी केलेले अपार कष्ट आणि प्रयत्नामुळे परिणाम स्वरूप त्या भागातील मागासवर्गीय दलित व बहुजन समाजातील शिक्षणा पासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना तसेच आंध्रप्रदेश व कर्नाटकातील विद्यार्थ्यांना लाभ मिळूण हजारो तरून आज पदविधर होऊ शकले. त्यानी केलेले हे कार्य अविस्मरणीय असेच आहे. श्रीमान दादांनी नुसते शैक्षणिक प्रसाराचे कार्य केले नाही तर त्या समवेत स्वातंत्र्यसंग्रामात फार महत्त्वाची भुमीका पार पाडली आणि कारावास ही भोगलेला आहे. हैद्राबाद मुक्ती संग्रामाप्रमाणेच त्यानी गोवा मुक्ती आंदोलनातही कार्य केले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी शेतकऱ्या साठी देगलूर बाजार समितीच्या सभापती पदी विराजमान झाल्यानंतर बाजार समितीच्या सर्वांगीन विकासासाठी महत्वपूर्ण भुमीका बजावली म्हणून देगलूर बाजार समितीचा नवामोढां परिसर मराठवाड्यातील एक आदर्श मोंढा परिसर म्हणून प्रसिध्द आहे या सर्व कार्यात दादांचा सिंहाचा वाटा आहे.

श्री पोशट्टीदादा जरी मागासवर्गीय जमातीत जन्माला आले तरी त्यांनी आर्यसमाजी विचार-धारेचा स्विकार करून आजतागायत तो वारसा चालवित आहेत याच माध्यमातून समाजातील अनिष्ट प्रथा घालविण्याचा आणि व्यसन मुक्तीचा दादानी परिश्रम पुर्वक प्रयत्न केलेला आहे.

श्री दादांचा ज्या मागासवर्गीय मन्नेरवारलू जमातीत जन्म झाला त्या जमातीच्या उन्नतीसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केलेले आहेत. या जमातीच्या प्रतिनिधीक संघटनेचे ते प्रदिर्घ काळ पर्यंत जिल्हा पातळीवर आणि राज्य पातळीवरील अध्यक्ष होते या संघटनेच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट रुढी व परंपरा नाहीशा करण्यासाठी गावेगांव भेटी देऊन प्रयत्न केला व समाज बाधंवात जाग्रती निर्माण करण्याचे महत्त्वपुर्ण कार्य केलेले आहे. तसेच जमातीचे प्रश्न सोडविण्यासाठी वारंवार शासनदरबारी भेटी देऊन प्रयत्न केलेले आहेत. त्यांच्या या निस्पृश सेवेस समाज बाधंव नेहमी स्मरणात ठेवतील.

श्री पोशट्टीदादांच्या जिवणांचा समग्रपणे आण एकत्रीत विचार केल्यास त्यांनी स्वातंत्र्य सैनानी म्हणून केलेले कार्य. शैक्षणीक क्षेत्रात केलेले कार्य. आर्यसमाजी विचारांतून समाज सुधारणेचे कार्य सहकार क्षेत्रात केलेले कार्य भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे निष्टांवत कार्यकर्ते म्हणून आमचे नेते आदरणीय शंकररावजी चव्हाण यांचे नेतृत्त्वाखाली केलेले कार्य इत्यादी बाबी ठळक पणे नजरेस येतात. त्यांचे जिवनकार्य आजच्या पीढीसाठी आदर्शवत आहे. श्रीमान दादांचा आणि माझा गेल्या ४० वर्षापासून संबंधआला असून त्यांचे यमवेत वेळोवेळी कार्य करण्याचे भाग्य लाभले आहे. समाजातील गोरगरीबांचे प्रश्न सोडविण्यासठी त्यांना अपार सहानुभूती वाटते त्यासाठी ८७ तळमळीने प्रयत्न करतात. तदवतच अनिष्ट रूढी पंरपरा घालविण्यासठी वजारा प्रमाणे कठोरहि होतात. श्री दादांचे बहुमुल्य असे मार्गदर्शन मला वेळोवेळी मिहत आलेले आहे. आणि या पुढील आयुष्य सुखासमृधदी चे जावो आणि दादांची शताब्दी साजरी करण्याचा योग आम्हास मिळो अशी सदिच्छा व्यक्त करतो आणि असेच पीतामहाप्रमाणे आम्हास मार्गदर्शन मिळो अशी आशाव्यक्त करतो.

**शिवाजीराव बोधगीरे – कंधार**
अध्यक्ष अखिल महाराष्ट्र मन्नरवारलू संघटन
पुणे. सरचिटणीस राष्ट्रीय कॉंग्रेस
जिल्हा शाखा नांदेड

***

# दादा-एक आदर्श व्यक्तीमत्व

**- श्रीमती अनुसयाबाई शंकरराव कळसकर**

आमचे दादा पोशट्टी लालन्ना उनग्रतवार यांनी आयुष्याच्या सुरूवाती पासून ते आज पर्यंत अनेक गोष्टींशी जिद्दीने लढा दिला. त्यांचा जन्म एक गरीब शेतकऱ्यांच्या घरात दि. ४.१.१९१५ रोजी झाला. हा दिवस खरेच देगलूरवासीयांसाठी भाग्याचा दिवस मानावा लागेल. कारण या दिवशी दादांसारखे प्रखर व्यक्तीमत्त्व त्यांना लाभले.

दादांचे सुरूवातीचे आयुष्य गरीबीच्या परिस्थिती मध्ये गेले. त्या काळात दादांना इच्छा असुन सुध्दा ते शिक्षण घेवू शकले नाहीत. दादांच्या घरची परिस्थिती फार चांगली नसली तरी ते मनाने व विचाराने लक्षाधिश आहेत. त्यामुळे त्यांनी त्यांच्या सारखे दु:ख इतरांच्या वाटयाला येवू नये म्हणून त्याने देगलूर शहरात सर्व व्यापाऱ्यांना एकत्र आणून अडत व्यापारी शिक्षण संस्थेची स्थापना करून, सर्वस्तरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिक्षणाचे द्वार मोकळे करून दिले. दादांना सुरूवातीपासून समाज कार्यात रूची असल्यामुळे स्वातंत्र्य पूर्व काळात ते तरूणांना एकत्रीत करत व स्वातंत्र्याविषयी कार्य करत. त्यासाठी त्यांनी हैद्राबाद मुक्ती संग्राम, गोवा मुक्ती संग्रामात सक्रिय भाग घेऊन देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. त्यांच्या या कार्या मुळेच आज आपण अभिमानाने हिंदू म्हणून या देशात जगत आहोत.

दादांने शैक्षणिक क्षेत्रातील अंध:कार दुर केला त्याच प्रमाणे ते माणसांना माणुस म्हणून जगण्यासाठी, त्यांच्यातील दुर्गण, व्यसनी आणि अंधश्रध्दा दुर करण्यासाठी त्यांनी इ.स. १९५०-५१ मध्ये देगलूर शहरात कै. विठ्ठलरावजी महिंद्रकर, कै. मनोहरराव होट्टलकर, कै. नरसिंगराव सोनवणे, कै. शंकरराव कळसकर, कै. नरसिंगराव कुलकर्णी, आणि कै. विठ्ठलराव सारखे यांना सोबत घेऊन आर्य समाजाची स्थापना केली. या अगोदर शहरात अनेक अंधश्रध्दचा चुकीच्या समजुती होत्या मोठमोठया सणासुदीच्या दिवशी सुध्दा लोक रेडयांचे, शेळयांचे बळी देणे, व तसेच आंतरजातीय विवाह करण्यासाठी लोक सहसहा तयार न होणे इत्यादी रूढीं मोठया प्रमाणात वाढलेल्या होत्या. मागासवर्गीय लोकांना कोणी जवळ बसू सुध्दा दिले जात नसे त्यावेळी दादांने पुढाकार घेऊन या सर्व गोष्टींना आळा घातला व गोरक्षा आंदोलन चालविले. सर्व जाती धर्माच्या लोकांना एकत्रित करून त्यांना संध्या, होम हवण, इत्यादी गोष्टी शिकवत असत. आत देखील दादा शहरातील सर्व युवकांना एकत्रित करून व्यसना पासून त्यांना दुर करण्याचा प्रयत्न करत असतात. दादांच्या प्रयत्नानेच आज देगलूर शहरात आर्य समाजासाठी जागा उपलब्ध झाली व त्यांनी त्याचे योग्य प्रकारे बांधकामही केले आहे. दादा आज आर्यसमाजाचे 'प्रधान' म्हणून काम करीत आहेत. असेच शुभकार्य त्यांच्या हातून हो व दादांना त्यांच्या ८९ व्या दिवसा निमीत्य त्यांना आयुष्यात सुख व शांती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करते.

**श्रीमती अनुसयाबाई शंकरराव कळसकर**
देगलूर

सौ. कमलबाई प्रकाशराव पाटील
बेम्बरेकर
सभापती पं.स.देगलूर

घर २५५३३४
पं.स.नि. २५५०४८
कार्यालय २५५००३

जा.क्र. दिनांक



# शुभेच्छा

*जेष्ट स्वतंत्रसेनानी पोशट्टीदादा उनग्रतवार यानी देगलूर सारख्या मागास भागामध्ये शैक्षणीक संस्था काडून या भागामध्ये ज्ञानगंगोत्री निर्माण केली, त्यामुळे या भागास शैक्षणीक, राजकीय, संस्कृतीक परिर्वतन होण्यास मदतझाली.*

*दादांच्या कार्यचा आलेख भावी पीठी समोर यावे म्हणून त्यांच्या ९० व्या वाढदिवसा निमत्यानी त्यांच्या जिवण कार्यवर आधारीत जीवनगौरव ही गौरवीका प्रकाशीत करण्यात येत आहेत त्या बद्दल हार्दिक शुभेच्छा.*

Kamal

सौ. कमलबाई प्रकाशराव पाटील बेम्बोकर
सभापती
पंचायत समिती देगलूर



ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी व माजी पंतप्रधान मा.नरसिंहराव यांच्या समवेत मा. पोशट्टीदादा. सोबत प्रा. एम.डी. कुलकर्णी प्रा. आर. के. शेट्ये प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी, व प्रा. सत्यनारायण जाजू



महसूलमंत्री मा. अशोकरावजी चव्हाण यांच्यासमवेत मा. पोशट्टीदादा एका विशिष्ट भावमुद्रेसहित !



मा. खासदार भास्कररावजी पाटील खतगावकर यांचे स्वागत करताना - दादा



हैदराबाद मुक्तिसंग्राम में सहभागी आर्य समाजियोंका सत्कार
सन्मान-पत्र
दि. १३ सितम्बर १९९८
आर्य समाज
गायत्री महायज्ञ